# कारसेवा

**डॉ. विलास जयराम पवार**

TM

ओम पब्लिकेशन

प्रकाशक
ओम पब्लिकेशन
एम- ३, पॅराडाईज टॉवर,
गोखले रोड, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२
© **विशाखा पवार**
★
प्रथमावृत्ती
फेब्रुवारी २०१२
★
लेखक
**विलास जयराम पवार**
★
अक्षरजुळणी रचना
समर्थ ग्राफिक्स
★
अक्षर जुळणी व्यवस्थापन
कीर्ती वैती
★
प्रसिध्दी व समन्वय
ओमनी पी. आर. सर्व्हिसेस
★
मुद्रण
राजमुद्रा प्रिंटर्स, ठाणे

# मनोगत

वैश्विक तापमान दिवसेंदिवस वाढतच आहे. या तापमानाच्या वेगापेक्षा जगातल्या गाडयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. खोळंबलेल्या वाहतुकीचा ताप गाडीत बसलेल्यांना व गाडीच्या बाहेर असलेल्यांना दोघांनाही सहन करावा लागतो आहे. या आधुनिक काळात वाहन असणे हा स्टेटस सिम्बल न वाटता आवश्यक गरज झाली आहे. वाहन घेणाऱ्यांना व घेण्याचा विचार करणाऱ्यांनी गाडीबद्दल, वाहतुक नियमांबद्दल, लायसन्स, परमिट, प्रदुषण यांबाबत जाणून घेण्याला सुरूवात केली आहे. सबंधीत विषयांवर अनेक तज्ज्ञांनी पुस्तके लिहीली आहेत, परंतु या पुस्तकातले माहिती मिळाल्यानंतर कुतुहल निर्माण झालेल्या वाचकांसाठी अजून काहीतरी असायला हवे आहे याची निकड वाटायला लागली यातूनच 'कारसेवा' या सदराचा जन्म झाला. वाहनांची, वाहतुक नियमांची माहिती असलेले हे महत्वपूर्ण सदर वाचकांच्या पसंतीला उतरले याचे पूर्ण श्रेय दै. लोकसत्ताचे तत्कालीन संपादक कुमार केतकर यांनाच जाते. या सदराचे नामकरण सुध्दा त्यांनीच केले होते आणि हेच सदराचे समर्पक नाव पुस्तकाचे शिर्षक म्हणून ठेवले आहे. या विषयावर लेखन करायची संधी कुमार केतकरांनी दिली यांबाबतचा महत्वपूर्ण ऋणनिर्देश करणे गरजेचे आहे. दै.लोकसत्ताच्या संपादकीय विभागाचा ऋणनिर्देश प्रकर्षाने करायला हवा. इंडियन एक्सप्रेस समुहाचे आभार आर्वजुन मानायचे आहेत.

कारसेवा पुस्तकात मोटार वाहन नियम गाडयांची तांत्रिक माहिती, लायसन्स व इतर अनेक बाबत परिवहन विभागाची सतत मदत झाली त्यांपैकी, निवृत्त परिवहन आयुक्त भा. ई. नगराळे (भाप्रसे), दिलीप जाधव (भाप्रसे) यांचा उल्लेख आवर्जुन करायचा आहे. त्याचबरोबर अतिरिक्त परिवहन आयुक्त शिरीष ठाकूर, सहपरिवहन आयुक्त सतीश सहस्त्रबुध्दे, परिवहन उपायुक्त प्र. ल. खाडे, प्रसाद महाजन, अरूण भालचंद्र, प्रा. प. अधिकारी यांचाही ऋणनिर्देश आवश्यक आहे.

त्याचबरोबर संजय ससाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा सततच्या सहकार्याबद्दल उल्लेख आवर्जुन करायला हवा आहे. भरत कळसकर, आनंद पाटील, संजय राऊत, संजय डोळे, बजरंग खरमाटे, सुभाष वारे हया सर्व उप.प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी नियमांबाबंत माहिती दिली आहे. त्यांच्या ऋणनिर्देशा बरोबर परिवहन विभागाचे मोटर वाहन अभियोक्ता प्रसाद लकेश्री यांच्या सुध्दा ऋणनिर्देश आनंदाने करायला हवा. रस्ता सुरक्षा, सुरक्षित वाहन संचलन या क्षेत्रातील तज्ज्ञ पद्माकर हेळेकर, स.गो. बिवलकर यांचे सुध्दा मला मार्गदर्शन मिळाले आहे. कारसेवा सदरात प्रश्नकर्त्यांचे नांव सदरात विचारलेल्या प्रश्नाखाली होते परंतु हे सदर पुस्तक रूपाने आपल्यापुढे येत आहे, तेव्हा लेखकाचे स्वातंत्र्य म्हणून प्रश्न संक्षिप्त करून मांडणीचे स्वातंत्र्य घेतले आहे व समस्यांची उकल आशयपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सरते शेवटी या प्रसिध्द झालेल्या सदराचे पुनर्लेखन करताना, वाचकांना लाखो धन्यवाद देऊन अक्षरजुळवणी मुद्रण; करणाऱ्या सर्वांचा ऋणनिर्देश मी आवर्जुन करीत आहे. या छोटेखानी पण महत्वपूर्ण माहिती देणाऱ्या पुस्तकात काही चुका असतील त्रुटी असतील तर अवश्य कळवाव्यात पुढील आवृत्तीत व इंग्रजीत निघणाऱ्या आवृत्तीतील त्या त्रुटी टाळता येतील.

पुन्हा एकदा वर उल्लेख केलेल्या सर्वांच्या ऋणात राहून फक्त ऋणनिर्देश करून माझ्या मनोगतला पुर्णविराम देतो.

# लेखक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | सायकल चालकांसाठी | ७ |
| २. | शिकाऊ चालकांसाठी | १० |
| ३. | मोटार वाहन कायद्याबद्दल | १२ |
| ४. | सेकंडहॅन्ड दुचाकी घेताना... | १६ |
| ५. | लायसन्स हवेच ! | १८ |
| ६. | लायसन्ससाठी कागदपत्रे व अभ्यास | २० |
| ७. | लायसन्स (अनुज्ञप्ती) | २२ |
| ८. | घर / लायसन्स बदलणार असाल तर... | २३ |
| ९. | शिकाऊ लायसन्ससाठी अटी | २४ |
| १०. | लायसन्स बाबत काही नियम | २६ |
| ११. | नॉन-ट्रान्सपोर्ट व ट्रान्सपोर्ट लायसन्स | २८ |
| १२. | मुलांसाठी लायसन्स – नियम | ३० |
| १३. | मुलांनी गाडी चालवावी ? | ३२ |
| १४. | परवाना हस्तांतरण | ३४ |
| १५. | परमिट / 'T' परमिट | ३६ |
| १६. | वाहनांची नोंदणी | ३८ |
| १७. | रस्ता सुरक्षा व सिग्नल | ४० |
| १८. | प्रवासी व माल वाहतुकीचे नियम | ४२ |
| १९. | नंबर प्लेट - नियम | ४५ |
| २०. | नंबर प्लेट कशा असाव्यात....... | ४७ |
| २१. | हव्या असलेल्या क्रमांकासाठी | ४९ |
| २२. | वाहन नोंदणी | ५१ |
| २३. | परराज्यात वाहन नोंदणी आवश्यक | ५२ |
| २४. | वाहनात बदल करायचाय... | ५३ |
| २५. | ब्रेक, इंडिकेटर वापरताना | ५५ |
| २६. | सुरक्षित अंतर | ५७ |

| | | |
|---|---|---|
| २७. | प्रखर प्रकाशझोत | ५९ |
| २८. | रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंग.... | ६१ |
| २९. | ओव्हरटेकींग = अपघात ? | ६३ |
| ३०. | पावसाळ्यात गाडी चालविताना..... | ६५ |
| ३१. | पावसाळ्यातले अपघात टाळण्यासाठी | ६७ |
| ३२. | वेगाशी स्पर्धा टाळावी | ६९ |
| ३३. | महामार्गावर अपघांताचे प्रमाण जास्त का ? | ७१ |
| ३४. | अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी | ७३ |
| ३५. | गाडीची यांत्रिक रचना | ७५ |
| ३६. | गाडीची निगा | ७७ |
| ३७. | गाडीतला बिघाड कसा ओळखायचा ? | ७९ |
| ३८. | वाहन प्रदुषण चाचणी | ८१ |
| ३९. | पीयुसी आवश्यक | ८३ |
| ४०. | प्रदुषण कसे रोखाल ? | ८५ |
| ४१. | वाहन विमा अत्यावश्यक | ८७ |
| ४२. | सुखरूप प्रवासासाठी | ८९ |
| ४३. | प्रवासासाठी चेकलिस्ट | ९१ |
| ४४. | जनावरांच्या वाहतुकीचे नियम | ९३ |
| ४५. | ''ट्रॅक्टर ट्रेलर'' चे वाहतुक नियम | ९५ |
| ४६. | कंडक्टरसाठी नियमावली... | ९७ |

# ‘कारसेवा’ - प्रयोजन

घरातून आपण बाहेर पडतो, परंतु प्रत्येकजण निर्धास्तपणे प्रवास करतोच असं नाही. विशेषतः रस्त्यातून जाताना एखादा अपघात पाहिला तर आपल्या मनात धाकधूक निर्माण होते आणि आपण प्रवास करत असलेल्या वाहनाला असं काही होणार नाही ना, अशी शंका निर्माण होते. रस्ता सुरक्षा हा जगभरातला चिंतेचा विषय! तसा आपल्याही देशात तो चिंतेचा आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाबरोबर आता प्रत्येक वाहनाची भर जगभरात कुठेतरी पडत असते. संपूर्ण जगभरात दरवर्षी पाच/सहा लाख लोक अपघातात जखमी होतात, तर त्याच्या तीस चाळी पट अपघातात कायमचे अपंग किंवा जखमी होतात. आपल्या देशात तर रोज सरासरी अडीचशे - तीनशे माणसे अपघातात मृत्युमुखी पडतात, तर रोज त्याच्या तिप्पट माणसे जखमी किंवा अपंग होतात. म्हणजे मिनिटागणिक एक व्यक्ती जखमी किंवा अपंग होत असते.

मानवी आयुष्याचे मूल्य लावता येत नाही, परंतु अंदाजे जर ठरविता आले तर जवळपास १८०० कोटी रूपयांचे नुकसान होते व हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्क्याच्या जवळ आहे. आपल्या देशातल्या लोकांना विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे जगभरात वाहनांच्या तुलनेच्या संख्येने आपल्या देशात वाहनांची संख्या १ टक्काही नाही, परंतु अपघात मात्र जगभराच्या तुलनेने जवळपास ६ ते ७ टक्क्यांपर्यंत आहेत.

स्वातंत्र्यानंतर लाखो लोक आपल्या देशात अपघातात मृत्यू पावले आहेत आणि ही लाखोंची संख्या आजमितीला १४ ते १५ लाखांपर्यंत सहज भरेल. ही अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी गोष्ट आहे. आपल्या देशात असलेल्या राष्ट्रीय हमरस्त्यांची संख्या व होणारे अपघात याकडे जरी लक्ष दिले, तरी जेवढ्या पटीत हमरस्ते त्याच्या दहापटीत अपघात असे विचित्र वाटावे, असे व्यस्त प्रमाण आहे.

आज देशभरात चांगले रस्ते झाले आहेत. आपल्या महाराष्ट्रात तर बहुपदरी द्रुतगती महामार्ग, पूल इत्यादींची भरपूर चांगल्या पध्दतीने निर्मिती झाली आहे; परंतु बेदरकार पध्दतीने वाहन हाकून, अनियंत्रित वेगाने गाडी चालवून स्वतःसहित इतरांच्या दुःखाला कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींनी आपल्या विचारात बदल घडवायला हवा. अपघात हा एक व्यक्तीचा जरी होत असला तरी संपूर्ण कुटुंब त्या व्यक्तीच्या सभोवताली असते. त्या संपूर्ण कुटुंबाला त्या अपघाताचा फटका बसतो.

रस्ता सुरक्षा विषय रस्त्याचा वापर करणाऱ्या सर्वांचा आहे. मग त्यात वाहन चालवणारे, वाहनात बसलेले, रस्त्यावरून चालणारे पादचारी (यांच्या घाईमुळे व नियमांचे पालन न केल्यामुळे अपघात होतात) रहदारी, वाहतूक नियंत्रण करणाऱ्या यंत्रणा या सर्वांचा आहे.

# सायकल चालकांसाठी

**रस्ता सुरक्षेसंदर्भात ‘ सायकल ’ अथवा ‘पादचारी’ याबाबत काही संकेत अथवा या संदर्भातील नियमांबाबत आपण मार्गदर्शन करावे. आता तर सायकलला महत्त्व येऊन त्याची नोंदणी करण्याचा विचार केला जात आहे, आपण जरा याबाबत सांगा.**



“रस्ता सुरक्षा” हा विषय रस्त्यावरून चालणाऱ्या प्रत्येकाचा आहे. रस्ता वापरणाऱ्या सर्वांनी सुरक्षेचा विषय जवळचा मानला पाहीजे. जे आपण म्हणता त्याप्रमाणे सायकल चालविण्याच्या संदर्भात मोटार वाहन कायद्यांतर्गत नियम नाहीत, परंतु शिस्त व सायकलसंदर्भात काही नियम मुंबई पोलिस कायद्यांतर्गत आहेत. पादचारी व सायकल चालविणाऱ्यांबाबत संकेत व शिस्तीबाबतचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१ सायकल रस्त्याच्या अगदी डाव्या कडेने चालवायला हवी, जेणेकरून इतर वाहनांना त्याचा अडथळा निर्माण होऊ नये.

२ सायकल समांतरपणे चालवून मैत्री दाखवायची गरज नाही. एका गटाने सायकल घेऊन जायची असेल तर एकापाठोपाठ एक अशीच सायकल चालवायला हवी.

३ सायकलला मालवाहू करून हॅण्डलला वस्तू अडकवता कामा नये.

४ सायकल एकट्याने चालविण्याचे वाहन आहे. म्हणून सायकलच्या मागच्या कॅरियरवर व पुढच्या दांडीवर कोणाला बसवू नये.

५ रहदारीतून चालताना सायकल अचानक वळवू नये. त्याचबरोबर सायकल वळवितांना कोणत्या दिशेला वळणार याचा इशारा हाताने द्यायचा असतो.

६ सायकल हे रस्त्यावरचे छोटे वाहन व सगळ्यांत जास्त धोका असलेले वाहन आहे. त्यामुळे रहदारीतून वाहतुकीच्या ठिकाणी सायकल काळजीपूर्वक चालविणे महत्त्वाचे आहे. इतरांना अडचण करणे टाळायला हवे.

७ मोठ्या रस्त्यांवर, मोकळ्या रस्त्यांवर, रस्ता मोकळा असला तरी वेडीवाकडी वळणे घेत सायकल चालविणे चुकीचे आहे. कारण मागून येणारे वाहन वेगात असेल तर दुर्घटना घडू शकते.



८ सायकलवर सर्कस करणे धोकादायक आहे. दोन हात सोडून सायकल चालविणे किंवा उभे राहून सायकल चालविणे यामुळे दुर्घटना घडून कायमचे शारीरिक व्यंग येऊ शकते.

९ समोर धावणाऱ्या ट्रकची साखळी पकडून सायकल चालविण्याचे श्रम वाचविण्याचा प्रयत्न म्हणजे अलगद मृत्यूच्या तोंडात जाण्यासारखे आहे.

सायकल चालविण्यातली मजा श्रमशक्ती व ऊर्जा निर्माण करणारी आहे. त्याचा आनंद घ्यायला हवा, परंतु शिस्तीचे पालन करूनच.

## पादचाऱ्यांसाठी नियम

आपण पादचाऱ्यांबद्दलच्या नियमाबाबत विचारले. खरं तर रस्त्यावरून जाण्याचा, रस्ता वापरण्याचा प्रथम अधिकार पादचाऱ्यांचा आहे व कर्तव्यसुध्दा पाळण्याचा अग्रक्रम त्यांचा आहे. या संदर्भात काही संकेत आहेत. त्यांचे शिस्त म्हणून पालन केल्यास फार योग्य ठरेल.

१ पांढरे पट्टे (झेब्रा क्रासिंग) असतील, तेथे रस्ता ओलांडणे. नसतील तर अगोदर उभे राहून पहिल्यांदा उजवीकडे नंतर डावीकडे, परत उजवीकडे पाहून रस्ता सावध, सावकाश ओलांडणे. ओलांडताना पळणे टाळावे.

२ वळणावर रस्ता ओलांडणे टाळावे.

३ रस्त्यावरून फुटपाथवरून चालण्याचा प्रयत्न असावा.

४ मित्रपरिवार रस्त्यात भेटला तर रस्त्यातच गप्पा मारण्याचा कार्यक्रम होतो. अशा वेळी रस्त्याच्या कडेला जाऊन बोलण्याचे सौजन्य व शिस्त दोन्ही राखाव्यात.




५ रस्त्यावरील खडे किंवा अन्य बाबींनी स्वत:ला हानी होणार नाही याची काळजी घेणे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ज्या ठिकाणी फुटपाथ नसतील अशा ठिकाणी रस्त्याच्या उजव्या बाजूने समोरून येणाऱ्या वाहनांकडे तोंड करून चालणे. त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनाची ठोकर बसणार नाही.


रस्त्याच्या डाव्या बाजूने चालणे हा नियम गाड्यांसाठी आहे. फुटपाथ नसलेल्या ठिकाणी पायी चालणाऱ्यांसाठी रस्त्याची उजवी बाजू महत्त्वाची आहे.

पादचारी व सायकलस्वार हे दोन्ही घटक रस्ता सुरक्षा पाळण्यासाठी महत्त्वाचे आहेत व त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे.


■ ■ ■

# शिकाऊ चालकांसाठी

**शिकाऊ लायसन्स असलेल्या व्यक्तीने काय करणे आवश्यक आहे? जे ‘एल’आकाराचे इंग्रजी आद्याक्षर लावायचे आहे, त्याची लांबी-रुंदी-उंची सांगाल का? रात्री वाहन चालविताना काय दक्षता घ्यावी, याबाबत जरा सांगा.**



शिकाऊ लायसन्स असलेली व्यक्ती जेव्हा वाहन चालवायला सुरूवात करते, त्या अगोदर त्या प्रत्येक व्यक्तीने सिग्नल, वाहतूक नियम इत्यादीबाबत माहिती करून घ्यायला हवी. त्याचबरोबर आपल्या शेजारी पक्के लायसन्स असलेल्या व्यक्तीला बसविणे आवश्यक आहे. दुचाकी वाहन असेल तर मागे बसलेल्या व्यक्तीकडे पक्के लायसन्स असणे आवश्यक आहे. वाहन चालविणारी व्यक्ती शिकाऊ आहे हे सांगण्यासाठी लावण्यात येणारे चिन्ह ‘L’ आकाराचे असते व ते लाल रंगात असायला हवे. त्याच्या आकाराबाबत सांगायचे तर ते पुढील प्रमाणात असायला हवे.




इंग्रजी आकाराचे एल हे अक्षर पांढऱ्या पृष्ठभागाच्या प्लेटवर लाल अक्षरात वाहनाच्या पाठीमागे व पुढे दिसेल अशा पध्दतीने लावायला हवे. त्यामुळे समोरील व मागील बाजूने बघणाऱ्या दुसऱ्या वाहनचालकाला शिकाऊ वाहनचालकाला समजून घेण्यास अडचण येणार नाही.

**दुसरा प्रश्न रात्रीच्या वाहन चालविण्याबाबत आहे. त्याबाबत पुढीलप्रमाणे सांगता येईल.**

परंतु वाहन चालविताना नेहमीच दक्षता घेणे भाग आहे. रात्रीची दक्षता जरा जास्तच घ्यायला हवी. याचे कारण असे आहे की, रात्री वाहनांची वर्दळ कमी असते,परंतु अपघातांचे प्रमाण मात्र जास्त असते. रात्री वाहन चालविण्याचे शक्यतो टाळणे हा उपाय आहे. परंतु वाहन चालवायचे असेल तर वाहनचालकाने आपल्या समोरची काच स्वच्छ करायला पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे समोरून येणाऱ्या वाहनांच्या हेडलाईटकडे पाहायचे नाही. त्यामुळे डोळे दिपतात व वाहनावरचे नियंत्रण जाऊ शकते व अशावेळी अपघात होतात. त्यामुळे वाहनचालकाने आपल्या वाहनाच्या हेडलाइटच्या प्रकाशाचा झोत जेथे पडतो, तेथे आपली दृष्टी ठेवायला हवी. समोरून येणारे वाहन अंदाजे २५ मीटर अंतरावर असताना आपल्या वाहनाचा झोत खाली ठेवायला हवा, ज्यामुळे समोरील वाहनचालकाचे डोळे दिपणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. समोरासमोर येणाऱ्या वाहनचालकांकडून अशाच प्रकारची काळजी घेतली गेली तर अपघातांचे प्रमाण घटू शकेल. रात्रीच्या वेळी रस्त्यात सहसा थांबू नये व थांबणे आवश्यक असेल तर पार्किंग लाईटचा वापर करणे गरजेचे आहे. वाहन चालविताना रात्रीची झोप येत असेल तर सुरक्षित ठिकाणी गाडी थांबवून अर्धा-एक तास झोपून मगच पुढे जावे, नाहीतर अर्धवट झोपेत किंवा गाडी चालविताना पळभराची डुलकी अपघात घडवून आणते. रात्री प्रवास करणाऱ्यांनी आपल्याबरोबरच्या वाहनचालकाकडे लक्ष द्यायला हवे. शक्यतो वाहनचालकाच्या बाजूच्या व्यक्तीने झोपू नये. रात्री वाहन चालविताना ओव्हरटेक करताना समोरून येणाऱ्या व मागून जाणाऱ्या वाहनांचा अंदाज घेऊन मगच ओव्हरटेक करायला हवे. थोडक्यात पण महत्त्वाचे असे की सुरक्षेचे नियमपालन, दक्षता, वेगनियंत्रण यामुळे रात्रीचे वाहन चालवणे सुरक्षित होऊ शकेल.

■ ■ ■

# मोटार वाहन कायद्याबद्दल

**मोटार वाहन कायदा संपूर्णपणे अभ्यासणे कठीण आहे, परंतु लक्षात राहतील व महत्त्वाची असतील, अशी कायद्याची काही कलमे सांगा.**

मोटार वाहन कायदा हा रस्त्याचा वापर करणाऱ्यांसाठी, वाहनप्रवास करणाऱ्यांचे जीवन सुसह्य बनविण्यासाठी बनलेला आहे. कायद्यातील नियमांचे पालन अपघात व हानी दोन्हीही टाळू शकतात. जागेअभावी जास्त काही नियमांची माहिती देता येणे शक्य नाही, परंतु माहिती असायला पाहिजे अशा काही काही कायद्याच्या कलमांची माहिती अवश्य देता येईल.



**कलम ३ व कलम ५** – कलम ३ नुसार ज्या वर्गाचे लायसन्स चालवायचे त्या वर्गाचे वैध लायसन्स असणे महत्त्वाचे आहे, तसेच ५ व्या कलमानुसार ज्या व्यक्तीकडे लायसन्स नाही अशा व्यक्तीला आपले लायसन्स देणे हासुध्दा गुन्हा आहे. या कलम ३ व ५ कायद्याचा भंग केल्यास दंड व शिक्षा (कैद) दोन्हीही होऊ शकतात. त्यामुळे लायसन्सविना गाडी न चालविणे व लायसन्स नसलेल्या व्यक्तीला ती न देणे हा नियम पाळायला हवा. जर नियमभंग करून एखादा अपघात झाल्यास विमा कंपन्या दाव्याची रक्कम नाकारतात.

**कलम ३९** - या कलमानुसार वाहनाची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीशिवाय कोणतेही वाहन रस्त्यावर आणता कामा नये. वाहनाची नोंदणी करण्याचे बंधन विक्रेत्यावर आहे. विनानोंदणीचे वाहन रस्त्यावर आढळल्यास त्यासाठी दंडाची शिक्षा आहे.

**कलम१२२** - नुसार रस्त्याचा वापर करणाऱ्या अन्य लोकांना अडथळा निर्माण होईल, अथवा त्याची गैरसोय होईल किंवा त्यांच्यासाठी धोका निर्माण होईल, अशा पध्दतीने वाहन उभे करता येत नाही.

**कलम १२३** - या कलमानुसार मोटारीच्या चढण्या-उतरण्यासाठी असलेल्या फळीवर, टपावर किंवा बॉनेटवर बसण्यास प्रतिबंध आहे. यासाठी मोटार वाहनचालकाला जबाबदार धरले जाते. कलम १२५ हे कलमसुध्दा १२३ सारखेच आहे. फक्त फरक एवढाच आहे की, वाहनचालकाने स्वतःला वाहन चालविताना अडथळा होईल, अशा प्रकारची वस्तू ठेवू नये, तसेच कोणा व्यक्तीला बसू अथवा उभे रहायला देऊ नये.

**कलम १२८** – दुचाकी मोटारसायकलच्या चालकाने स्वतःशिवाय अन्य एक व्यक्तीलाच जाण्यास मुभा आहे. त्यापेक्षा जास्त व्यक्तीला प्रतिबंध आहे.

**कलम १३०** – संबंधित अधिकाऱ्यांनी मागणी केली असता लायसन्स व वाहनाचे आर.सी. बुक (रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट) दाखविणे, त्यासाठी वाहन चालविताना ते सतत बरोबर ठेवणे. व्यावसायिक वाहन असेल तर वाहनाचा परवाना, योग्यता प्रमाणपत्र, कर प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

**कलम १३२** – वाहनचालकाचे कर्तव्य सांगतो - यानुसार जर स्वतःच्या वाहनामुळे अपघात झाल्यास थांबले पाहिजे, अपघातग्रस्त व्यक्तीला मदत केली पाहिजे. अपघात झाल्याची बातमी जवळच्या पोलीस स्टेशनवर २४ तासांच्या आत देणे आवश्यक आहे.

**कलम १४६** – मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १४६ / १९६ अन्वये वाहनाचा थर्ड पार्टी विमा काढणे बंधनकारक आहे. नसेल तर यासाठी दंड होतो. त्याचबरोबर वाहनाचा अपघात झाल्यास नुकसानभरपाईचा दावा करता येत नाही. मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम २०७ नुसार जर एखादी व्यक्ती विनालायसन्स गाडी चालवत असेल विमा परवाना, रजिस्ट्रेशन न करता गाडी चालवत असेल, तर अशी वाहने ताब्यात घेण्याचा अधिकार आर.टी.ओ. व पोलीस अधिकाऱ्यांना आहे. नियमांचे व कायद्याचे पालन करणे तसे सोपे आहे. रस्त्यावरील चिन्हे व सूचनांचा आदर करून, पालन करून वाहन चालविले तर नियमांचा भंग होणार नाही. परंतु कायद्याची माहिती असेल तर कायद्याचे पालनसुध्दा सोप्या रितीने होते.

जी काही मोटार कायद्याची महत्त्वाची कलमे दिली आहेत, त्यांचा आपल्या माहितीसाठी नक्की उपयोग होईल.

१ जानेवारी २०१० ते ७ जानेवारी २०१० पर्यंत आपल्या देशात 'सुरक्षा सप्ताह' म्हणून पाळला जातो. या सप्ताहानिमित्त रस्ता सुरक्षा या विषयाचे गांभीर्य सर्वदूर पसरावे असा शासन पातळीवर प्रयत्न होतो, या प्रयत्नाचा भाग म्हणूनच महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार हा सुरक्षा सप्ताह आता पंधरा दिवस पाळला जातो. परंतु जनमानसातून या विषयाचे गांभीर्य अधिक सहजपणे पोहोचवण्यासाठीच 'कारसेवा' सदर आहे.

घरातून आपण बाहेर पडतो, परंतु प्रत्येकजण निर्धास्तपणे प्रवास करतोच असं नाही. विशेषतः रस्त्यातून जाताना एखादा अपघात पाहिला तर आपल्या मनात धाकधूक निर्माण होते आणि आपण प्रवास करत असलेल्या वाहनाला तर असं काही होणार नाही ना, अशी शंका निर्माण होते.

रस्ता सुरक्षा हा तसा जगभरातला चिंतेचा विषय! आपल्याही देशात तो चिंतेचा आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाबरोबर आता प्रत्येक वाहनाची भर जगभरात कुठेतरी पडत असते. संपूर्ण जगभरात दरवर्षी पाच/सहा लाख लोक अपघातात जखमी होतात, तर त्याच्या तीस चाळी पट अपघातात कायमचे अपंग किंवा जखमी होतात. आपल्या देशात तर रोज सरासरी अडीचशे –तीनशे माणसे अपघातात मृत्युमुखी पडतात, तर रोज त्याच्या तिप्पट माणसे जखमी किंवा अपंग होतात. म्हणजे मिनिटागणिक एक व्यक्ती जखमी किंवा अपंग होत असते.

मानवी आयुष्याचे मूल्य लावता येत नाही, परंतु अंदाजे जर ठरविता आले तर जवळपास १८०० कोटी रूपयांचे नुकसान होते व हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्क्याच्या जवळजवळ आहे. आपल्या देशातल्या लोकांना विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे जगभरात वाहनांच्या तुलनेच्या संख्येने आपल्या देशात वाहनांची संख्या १ टक्काही नाही, परंतु अपघात मात्र जगभराच्या तुलनेने जवळपास ६ ते ७ टक्क्यांपर्यंत आहेत.

स्वातंत्र्यानंतर लाखो लोक आपल्या देशात अपघातात मृत्यू पावले आहेत आणि ही लाखोंची संख्या आजमितीला १४ ते १५ लाखांपर्यंत सहज भरेल. ही अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी गोष्ट आहे. आपल्या देशात असलेल्या राष्ट्रीय हमरस्त्यांची संख्या व होणारे अपघात याकडे जरी लक्ष दिले, तरी जेवढ्या पटीत हमरस्ते त्याच्या दहापटीत अपघात असे विचित्र वाटावे, असे व्यस्त प्रमाण आहे. परंतु हे आपणांस गंभीर करणारे म्हणून पुरेसे ठरावे.

आज देशभरात चांगले रस्ते झाले आहेत. आपल्या महाराष्ट्रात तर बहुपदरी द्रुतगती महामार्ग, पूल इ. बाबत भरपूर चांगल्या पध्दतीने घडले आहेत; परंतु बेदरकार पध्दतीने वाहन हाकून, अनियंत्रित वेगाने गाडी चालवून स्वतःसहित इतरांच्या दुःखाला कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींनी आपल्या विचारात बदल घडवायला हवा. अपघात हा एक व्यक्तीचा जरी होत असला तरी संपूर्ण कुटुंब त्या व्यक्तीच्या सभोवताली असते. त्या संपूर्ण कुटुंबात तो अपघाताचा फटका बसतो.

रस्ता सुरक्षा विषय रस्त्याचा वापर करणाऱ्या सर्वांचा आहे. मग त्यात वाहन चालवणारे, वाहनात बसलेले, रस्त्यावरून चालणारे पादचारी (यांच्या घाईमुळे व नियमांचे पालन न केल्यामुळे केवळ अपघात होतात) रहदारी, वाहतूक नियंत्रण करणाऱ्या यंत्रणा या सर्वांचा हा विषय आहे.

■■ ■



# सेकंडहॅन्ड दुचाकी घेताना...

***वाहनचोरी झाल्यावर विम्याकडून नुकसान-भरपाई मिळते का? अशा प्रकारचा विमा उतरविता येतो का? या संदर्भात मला माहिती हवी व दुसरा प्रश्न आहे की, मी सेकंडहॅन्ड दुचाकी विकत घेणार आहे. त्यासाठी कोणते पेपर्स लागतील? गाडी विकणारा तेथे हजर हवा का? कृपया विस्तृत माहिती द्या. मला कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला वाव द्यायचा नाही.***

सर्वप्रथम भ्रष्टाचाराला वाव न देता आपण आपले काम करणार आहात, त्याबद्दल आपले अभिनंदन. परंतु आपण योग्य कागदपत्र घेऊन योग्य अर्ज केला तर प्रादेशिक परिवहन कार्यालयात आपले काम होऊ शकेल, परंतु जर परिवहन कार्यालयाच्या बाहेर असलेल्या एजंटकडून करून (हे एजंट प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नेमलेले नसतात) घेणार असाल तर ते मागत असलेले पैसे देणे भाग आहे.



त्यामागची भ्रष्टाचाराची कार्यप्रणाली सांगणे अशक्य आहे. परंतु सुजाण नागरिक म्हणून हा सुध्दा प्रश्न आपण मांडलात यासाठी मी आपल्याला ही माहिती दिली. आपण विम्याबाबत विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगायचे तर वाहनचोरी झाल्यावर त्या नुकसानीचा अंतर्भाव विमा घेतल्यावर होतो. फक्त योग्य प्रकारचा विमा तुम्ही घेतला पाहिजे. गेल्या आठवड्यातच विम्याबाबत सांगितले होते. त्या विम्याच्या प्रकारांपैकी कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा पॉलिसी घेतली तर या पॉलिसीत चोरीला गेलेल्या वाहनाची नुकसानभरपाई मिळू शकेल. अपघात किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे वाहन पूर्णतः खराब झाल्यास किंवा अपघातात कोणत्याही प्रकारची मनुष्यहानी, वित्तहानी झाल्यास संपूर्ण नुकसानभरपाईचा अंतर्भाव या प्रकाराच्या विमा पॉलिसीमध्ये असतो.


दुसऱ्या प्रश्नानुसार तुम्हाला सेकंडहॅन्ड दुचाकी घ्यायची, तर आपण खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे :

१) अर्ज नमुना फॉर्म २९ (दोन प्रतीत) (विक्रेत्याच्या सहीनिशी)
२) फॉर्म ३० (खरेदीदार व विक्रेता यांनी सह्या केलेल्या व चॅसिस नंबरची प्रिंट चिटकविलेला.)
३) फॉर्म टीसीए.

या बरोबर पुढील प्रमाणपत्रे जोडावी लागतील :

१) पत्त्याचा पुरावा. २) ना-हरकत प्रमाणपत्र (वाहन दुसऱ्या प्रादेशिक परिवहन विभागातून खरेदी केले असल्यास), ३) वाहन परराज्यातून असल्यास, ४) वाहनात हवी असलेली सर्व वैध प्रमाणपत्रे, उदा. नोंदणी प्रमाणपत्र, विमापॉलिसी, प्रवेशकर, जकात इ. भरल्याचे प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रांची पूर्तता असेल तर आपण ती गाडी खरेदी करून त्याचे कागदोपत्री मालक होऊ शकता. यासाठी गाडी विक्रेता प्रादेशिक परिवहन कार्यालयात येण्याची गरज नाही. मात्र वर सांगितलेला अर्ज व कागदपत्रांवर त्याच्या सह्या असायला हव्यात.

■ ■ ■



# लायसन्स हवेच!

**गाडी चालवायला चांगल्या प्रकारे येते. अगदी चारचाकी, दुचाकी, टेम्पोसुध्दा. तरी मला शिकाऊ लायसन्स काढावेच लागेल का? मला पक्के लायसन्स लगेचच मिळणार नाही का? लायसन्सच्या प्रकाराबाबत, नियमांबाबत माहिती द्याल का?**

कोणतेही वाहन सार्वजनिक ठिकाणी चालवायचे असल्यास, जे वाहन चालवायचे आहे, त्याचे लायसन्स असायला हवे. कितीही चांगले वाहन चालविता येत असले तरी त्याचे वैध लायसन्स असायलाच हवे. लायसन्सशिवाय गाडी चालविणे गुन्हा आहे. पक्के लायसन्स लगेचच मिळेल का, असे विचारले आहे. त्याचे उत्तरसुध्दा 'नाही' असेच आहे. कारण नियमांमध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. नियमानुसार प्रथम शिकाऊ लायसन्स काढावे लागेल आणि ३० दिवसांनंतर त्याची चाचणी परीक्षा द्यावी लागेल. आपल्याला गाडी चालविता येते, याबाबतची परीक्षा मोटारवाहन अधिकारी (आर.टी.ओ.) घेतात व त्यानंतर लायसन्स दिले जाते.

लायसन्स प्रकार आपण विचारले आहेत. तर लायसन्सचे दोन प्रकार आहेत. १) नॉन ट्रान्सपोर्ट लायसन्स (खाजगी वाहन), २) ट्रान्सपोर्ट लायसन्स (भाडोत्री वाहन). नॉन ट्रान्सपोर्ट लायसन्स मिळविण्यासाठी आर. टी. ओ. कार्यालयात होणाऱ्या शिकाऊ व पक्क्या लायसन्सची चाचणी परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते. नॉन-ट्रान्सपोर्ट लायसन्स असेल तर ते ट्रान्सपोर्टच्या गाडीसाठी वैध नाही. उदा. खाजगी गाडी असेल तर भाडोत्री गाडीसाठी ते लायसन्स वैध ठरणार नाही. ट्रान्सपोर्ट लायसन्स मिळविण्याकरीता आर. टी. ओ. मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र मिळवावे लागते. त्याशिवाय पक्क्या लायसन्सची चाचणी परीक्षा देता येत नाही.

जड वाहनाचे (हेवी व्हेईकल) लायसन्स मिळविण्याकरीता वाहनचालकाकडे हलके मोटर वाहन चालविण्याचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असायला हवा. लायसन्सच्या नियमांबाबत सांगायचे झाले तर सर्वप्रथम लायसन्स असल्याशिवाय वाहन चालवू नये. शिकाऊ लायसन्स असणाऱ्या वाहनचालकांस सोबत पक्के लायसन्स असणारी व्यक्ती प्रशिक्षक म्हणून असायला हवी व त्याचबरोबर वाहनावर 'L' असा बोर्ड गाडीच्या पुढे-मागे प्रदर्शित केल्याखेरीज वाहन सार्वजनिक ठिकाणी चालविता येणार नाही.

शिकाऊ लायसन्स मिळाल्यानंतर ते सहा महिने विधिग्राह्य असते. विधिग्राह्यता संपल्यानंतर ते एकदाच नुतनीकरण करून घेता येते. ट्रान्सपोर्ट लायसन्सची विधिग्राह्यता मिळविलेल्या दिवसापासून तीन वर्षे असते. वाहनाचे लायसन्स हे एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते. कारण ते ज्याकडे असते, त्याच्याकडे जबाबदारीचे भान असते. किंबहुना त्यांनी ते ठेवायला पाहिजे. सुरक्षित वाहन चालविण्यासाठी व आपल्यामुळे कोणाचीही सुरक्षितता धोक्यात येणार नाही, असा लायसन्सधारी वाहनचालक आदर्श ठरतो.

■ ■ ■

# लायसन्सबाबत माझे काही प्रश्न आहेत.

**(१) आंतरराष्ट्रीय लायसन्स काढण्यासाठी काय अटी आहेत? (२) माझे लायसन्स हरवले आहे ते परत मिळू शकेल का?**

ज्या देशांशी आपल्या देशाचा करार झाला आहे, त्या देशात वाहनचालकास वाहन चालक परवाना (International Driving Permit) देण्यात येतो. त्याला आंतरराष्ट्रीय लायसन्सपेक्षा परमिट (परवाना) हा शब्द वापरला जातो. या परवान्याची विधिग्राह्यता एका वर्षासाठी असते. ज्या क्षेत्रात आपण राहतो, तेथील आर. टी. ओ. कडे हा अर्ज करायला हवा. फक्त अर्ज करताना लायसन्स व पासपोर्ट यावरील पत्ता सारखाच असायला हवा. पत्ता बदलला असेल तर संबंधित कार्यालयातून तो बदलून घ्यायला हवा. या आंतरराष्ट्रीय वाहन चालक परवाना (IDP) साठी अर्ज करताना सोबत पासपोर्ट साईज तीन फोटो व फी भरावी लागेल.

आपला दुसरा उपप्रश्न आहे तो लायसन्स हरविल्याबद्दल. मूळ लायसन्स जर खराब झाले किंवा हरविले असल्यास, त्याचा विहीत नमुन्यातील फॉर्म भरून अर्ज करावा लागतो. लायसन्स खराब झाले असल्यास ते सोबत जोडावे. लायसन्स हरविले असल्यास तसा पोलीस अहवाल सादर करावा लागतो. सोबत दोन छायाचित्रे जोडावी लागतील. ठरलेली फी भरून लायसन्सची दुय्यम प्रत (Duplicate Licence) मिळविता येऊ शकेल.

■ ■ ■

# लायसन्ससाठी कागदपत्रे व अभ्यास

**शिकाऊ व पक्क्या लायसन्सबाबत कोणते कागदपत्र लागतात, त्याची काही तयारी करावी लागते का?** लायसन्स मिळविण्यासाठी काही **अभ्यास असतो का?**

लायसन्स मिळवण्याअगोदर कोणतेही वाहन सुरक्षित चालवेन असा विश्वास निर्माण करायला हवा. १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या कोणत्याही सक्षम व्यक्तीला (ट्रान्सपोर्ट वर्गाव्यतिरिक्त) इतर कोणत्याही प्रकारच्या वाहनांचे लायसन्स मिळविता येते. आपण वास्तव्य करीत असलेल्या क्षेत्रातील परिवहन कार्यालयात जाऊन आपण शिकाऊ लायसन्स अर्ज करून मिळविता येईल. त्यासाठी कोणत्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल, याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) पत्त्याचा पुरावा : यामध्ये टेलिफोन बिल, लाईट बिल, मतदार ओळखपत्र, पारपत्र (पासपोर्ट), जीवन विमा पॉलिसी या कागदपत्रांवरील पत्ता, पत्त्याचा पुरावा द्यायला पुरेसा पडतो.

२) वयाचा दाखला : शाळा सोडल्याचा दाखला (लिव्हिंग सर्टिफिकेट) जन्मतारखेचा दाखला, एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा कोणतेही प्रमाणपत्र नसल्यास जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) यांचा दाखला आवश्यक असतो.

३) वैद्यकीय प्रमाणपत्र फक्त ट्रान्सपोर्ट लायसन्सकरिता दिलेल्या नमुन्यात लागेल.

४) तीन फोटोग्राफ लागतात.

शिकाऊ लायसन्स मिळविण्याकरिता थोडयाफार प्रमाणात तयारी करावी लागतेच. राज्यात अनेक परिवहन

कार्यालयांतून आता संगणकीय चाचणी घेतली जाते. या चाचणीत अनेक प्रश्न विचारले जातात. त्यामध्ये वाहतुकीचे सर्वसाधारण नियम असतात. रस्त्यावरील चिन्ह ओळखणे. रस्त्यावरील चिन्ह (रोड साईन) आपल्याला आर. टी. ओ. कार्यालयात उपलब्ध होतील. त्याचे पठण करून लक्षात ठेऊन प्रश्न विचारणाऱ्या अधिकाऱ्यांचे समाधान करता येऊ शकेल. पुढे काही वाहतुकीचे सर्वसाधारण नियम आहेत. ते आत्मसात केल्यास चाचणी देणे सोपे जाईल.

कलम ११२- वाहनचालकाने वेगमर्यादा भंग करू नये.

कलम ११३- भारक्षमतेचे उल्लंघन करून वाहतूक करू नये.

कलम ११९- वाहतूकचिन्ह, सिग्नल यांचे उल्लंघन करू नये.

कलम १२१-वाहन चालविताना योग्य इशारे वापरावेत.

कलम १२२-वाहन धोकादायक स्थितीत उभे करू नये.

कलम १२८- दुचाकीवर एकापेक्षा अधिक व्यक्ती घेऊन प्रवास न करणे.

कलम १२९- हेल्मेट न घालता दुचाकी चालविणे.

कलम १३४- अपघात घडल्यानंतर माहिती २४ तासांच्या आत पोलिसांना कळविणे व अपघातग्रस्तांना योग्य मदत करणे.

कलम १८५- दारू किंवा अंमली पदार्थांच्या नशेत वाहन चालविणे.

याशिवाय महाराष्ट्र मोटार वाहन नियम २५० अनुसार वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर करू नये इ. नियम लक्षात ठेवल्यास यशस्वीपणे उत्तीर्ण होता येईल व शिकाऊ लायसन्स मिळेल.

शिकाऊ लायसन्स घेतल्यानंतर ३० दिवस पूर्ण झाल्यानंतर पक्क्या लायसन्ससाठी चाचणी घेता येईल. त्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे पुढीलप्रमाणे लागतील –

१) शिकाऊ लायसन्स, २) छायाचित्र – तीन प्रतींत, ३) ट्रान्सपोर्ट लायसन्ससाठी ड्रायव्हिंग स्कूलमधील प्रशिक्षण प्रमाणपत्र, ४) ज्या वाहनाची चाचणी देणार आहात त्या वाहनाची प्रमाणपत्रे, ५) पत्त्याचा व जन्मतारखेचा पुरावा, ६) चाचणी फी व लायसन्स फी.

पक्क्या चाचणीचा अभ्यासक्रम थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे: १) आरशाची आखणी, २) वाहन सरळ चालविणे, गियर बदलणे, वाहन थांबविणे, पुन्हा सुरू करणे इ., ३) वाहन पाठमोरे (रिव्हर्स) चालविणे, ४) ॲक्सिलेटर, क्लच, गियर, ब्रेक यांचा वापर याचबरोबर वाहतूक चिन्हे, वाहतूक सिग्नल इ. विचारणासुध्दा केली जाते.

या सर्वांचा अभ्यास करून, नियम आत्मसात करून लायसन्स मिळविता येते. फक्त एकच गोष्ट लक्षात हवी की, हे लायसन्स जबाबदारी पेलणाऱ्या व्यक्तीलाच मिळते, त्याचा आदर करायला हवा.

■ ■ ■

# लायसन्स (अनुज्ञप्ती)

**मी काही महिन्यांपूर्वी दुचाकीचे लर्निंग लायसन्स काढले होते व कायस्वरूपी लायसन्स काढायला आर.टी.ओ. च्या एजंटकडे दिले होते. परंतु हा एजेंट अनेक दिवस दिसला नाही. या दरम्यान माझ्या लर्निंग लायसन्सची मुदत संपली. अखेर मला पुन्हा लर्निंग लायसन्स काढायला लागले. यासंदर्भात आर.टी.ओ. कारवाई करू शकतात का?**

आपण जबाबदार सुशिक्षित नागरिक आहात, त्यामुळे मोटारवाहन कायद्याचे काही सोपे नियम आहेत. आपण ते आर.टी.ओ. कार्यालयात गेल्यावरसुध्दा आढळतील. आपण पक्के लायसन्स काढायला दिलेत, असे आपण सांगता, त्याचप्रमाणे आपण त्याची 'फी' सुध्दा त्या एजंटकडे दिली.परंतु आपली फसवणूक झाली आहे. एवढेच तूर्तास सांगून काही गोष्टी आपल्याला माहितीसाठी सांगतो. त्या म्हणजे, आर.टी.ओ. कार्यालयात जे एजंट आहेत, असं सांगून फिरणारे मुळातच आर.टी.ओ.ने नेमलेले नसतात तर तुमचे-आमचे काम लवकरात लवकर करून देणारे खऱ्या अर्थाने त्रयस्थ, परंतु मध्यस्थासारखे काम करतात. आर.टी.ओ. त्यांच्यावर कायद्याने काय कारवाई करणार ? दुसरी गोष्ट अशी की, ठाणे आर.टी.ओ. कार्यालयात आता लायसन्स स्मार्ट कार्ड स्वरूपात दिले जाते, त्यामुळे तुम्ही प्रत्यक्षात हजर राहिल्याशिवाय, तुमचा फोटो घेतल्याशिवाय मिळणार नाहीच, परंतु पक्के लायसन्स काढण्यासाठी वाहन चालवून चाचणी घ्यावी लागते. त्यामुळे शिकाऊ लायसन्स एजंटकडे देऊन पक्के लायसन्स मिळण्याची वाट पाहणे योग्य नाही. कोणत्याही आर.टी.ओ. कार्यालयात अधिकाऱ्यांकडे थेट संपर्क साधून आपल्या समस्यांचे निराकरण करण्याचा मार्ग केव्हाही प्रशस्तच आहे. त्यामुळे तुमच्या प्रश्नामुळे एक धडा मात्र सर्वांना अवश्य मिळू शकेल की, कायदेशीर गोष्टी बेकायदेशीर पध्दतीने अथवा अज्ञानाचा आधार घेऊन करायला नको.

■ ■ ■

# घर/लायसन्स बदलणार असाल तर...

**आमची दोन घरे आहेत. एक वसई, ठाणे जिल्हा येथे आणि दुसरे मुंबईमध्ये आहे. आमच्याकडे असलेली गाडी 'एम ०४' या नोंदणी क्रमांकाने नोंदलेली आहे. आम्ही वसईचे घर विकून मुंबईत राहणार आहोत. तर आम्हांला आमच्या गाडीची नोंदणी मुंबईत परत करायला लागेल का?**

तुम्ही नोंदणी केलेली गाडी राज्यातल्या एका शहरातून दुसऱ्या शहरात जाणार आहे. त्यामुळे या गाडीची पुनर्नोंदणी करायची गरज नाही व त्या नोंदणी क्रमांकात बदलसुध्दा होणार नाही. परंतु मूळ वाहनमालक आपण आहात आणि सद्यस्थितीत ते वाहन आपण चालवित आहात व आपल्या राहण्याचा पत्ता आपण बदलणार आहात तर बदललेला पत्ता नोंदणी प्राधिकरणाला (आर. टी. ओ.) कळवायला हवा. तशा पध्दतीची नोंद आपण आपल्या



नोंदणी बुकात (आर. टी.ओ.) करून घ्यायला हवी. त्याचबरोबर लायसन्सवरील पत्तासुध्दा बदलून घ्यायला लागेल. मूळ लायसन्स जर विभागाच्या बाहेरचे असेल तर पूर्वीच्या कार्यालयाकडून संबंधित लायसन्सचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

■ ■ ■

# शिकाऊ लायसन्ससाठी अटी

**काही प्रश्न एका संदर्भात विचारायचे आहेत, त्यापैकी १) चारचाकीचे शिकाऊ लायसन्स घेतले आहे. हे लायसन्स मुंबईला घेतले आहे. मला आता नोकरीनिमित्त दिल्लीला जायचे आहे. तेथे ते चालेल का? २) मला चष्मा आहे दृष्टी क्षमता लायसन्स घेताना कितपत गरजेची आहे?**

आपण विचारले आहे. त्या प्रश्नांपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' आहे. आपण जरी मुंबईला लायसन्स (शिकाऊ) काढले असेल तरी ते संपूर्ण भारतात वैध आहे. फक्त यासाठीचे नियम आहेत ते मात्र आपण पाळायला हवेत.

वाहन शिकत असताना वाहनाच्या मागे व पुढे 'चालक शिकाऊ आहे' हे कळविणारा बोर्ड लावणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपले आजूबाजूचे वाहनचालक सावधगिरी बाळगून गाडी चालवू शकतात. पुढे दि्लेल्या 'चिन्हाची' आकृती वाहनाच्या पुढे व मागे लावायला हवी आहे (L).

दुचाकी वाहनचालक शिकाऊ असेल तर त्याच्या मागच्या सीटवर व चारचाकी वाहनांमध्ये शेजारील सीटवर वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारी पक्के लायसन्स असलेली व्यक्ती बसणे आवश्यक आहे. सहा महिने शिकाऊ लायसन्स वैध असते. शिकाऊ लायसन्स मिळाल्यापासून ३० दिवसांनंतर व सहा महिने अगोदर पक्क्या लायसन्ससाठी चाचणी देता येऊ शकते.

या अटींचे पालन शिकाऊ लायसन्सधारक करू शकला नाही तर त्याचे लायसन्स अवैध ठरू शकते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे (L) आकाराची पाटी लावणे बंधनकारक आहेच.

आपण विचारलेल्या दुसऱ्या दृष्टीक्षमतेच्या प्रश्नासंदर्भातला प्रश्न आहे. त्या संदर्भात सांगता येईल की, ज्या व्यक्तीला २५ मीटर अंतरावर उभ्या असलेल्या गाडीचा नोंदणी क्रमांक वाचता येईल, त्या व्यक्तीला लायसन्स द्यायला काहीही हरकत नाही. वैद्यकीय भाषेत लायसन्स प्राप्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तीची दृष्टी ६/६ असली पाहिजे. ही दृष्टी चष्मा वापरून असली तरी चालेल, त्यामुळे आपला चष्मा जरी असला तरी दृष्टीक्षमतेबाबत आपण ही पूर्तता करीत असाल तर आपल्याला लायसन्स मिळण्यास हरकत नसावी. परंतु त्याचबरोबर कलर ब्लाइंडनेस

लायसन्स इच्छुक व्यक्तीला (रंगांधळेपणा) नसावा. कलर ब्लाइंडनेस याचा अर्थ रंग ओळखता आले पाहिजे. लाल, हिरव्या रंगातील फरक जर ओळखता आला नाही तरी त्यांचा रंग आंधळेपणा सिध्द होऊन जाईल.

रंगांधळेपणा हा आजार लायसन्स मिळवू पाहणाऱ्या व्यक्तीला जर असेल तरी त्याला लायसन्स देता येणार नाही. अर्जदाराच्या शारीरिक पात्रतेसाठी अर्ज भरावा लागतो. व शारीरिक अपात्र असतानादेखील जर कोणी आपण पात्र आहोत असे घोषित करणे हा गंभीर गुन्हा फौजदारी कारवाई करायला लावू शकतो.

आपण निश्चितपणे शिकाऊ लायसन्स अटींचे पालन करून दिल्लीला वापरा व मुदतीत त्याचे पक्के लासन्स करून घ्या.

■ ■ ■

---

# मूक-बधिरांना लायसन्स?

**बहिऱ्या व मुक्या माणसाला लायसन्स मिळते का व मिळत असेल तर कसे ?**

लायसन्स मिळविणाऱ्या सर्वच लोकांना कागदपत्रांची पूर्तता करावी लागते, परंतु आपण विचारलेल्या प्रश्नानुसार संपूर्ण मुक्या व बहिऱ्या माणसांना लायसन्स दिले जात नाही; जर हे बहिरे / मुकेपण आंशिक किंवा थोड्या प्रमाणात असेल तर त्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक व त्याचबरोबर यासाठी प्राधिकृत केलेल्या संस्थेकडून तसे वैद्यकीय प्रमाणित केले जात असेल तर प्रादेशिक परिवहन निरीक्षक खातरजमा करून त्यांना लायसन्स देण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेऊ शकेल: परंतु रहदारी, वाहतूक यांच्या दृष्टीने इतर व स्वत: बहिरी-मुकी व्यक्ती यांसाठी ते धोकादायक ठरू शकेल. काही वेळा काही व्यक्तींना श्रवणयंत्र वापरून ऐकू येते, अशा व्यक्तींबाबतसुध्दा वैद्यकीय प्रमाणित दाखला व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केलेली खातरजमा यावर आधारून लायसन्स देण्याचा विचार होऊ शकेल.

■ ■ ■

# लायसन्सबाबत काही नियम

**मोटारसायकल चालवित असल्यामुळे त्याचे लायसन्स आहे. मला मोटारगाडीचे लायसन्स घ्यायचे आहे, तर मला काही वेगळी कागदपत्रे द्यावी लागतील का?**



सर्वप्रथम मी आपणाला सांगतो की, मोटारगाडीचे दुसरे वेगळे लायसन्स आपल्याला घेता येणार नाही. कारण लायसन्सधारक एकावेळी एकापेक्षा जास्त लायसन्स बाळगू शकत नाही. त्यामुळे नवीन वाहनाचे लायसन्स मिळाल्यास त्याची नोंद पूर्वीच्याच लायसन्समध्ये करावी लागते. त्यामुळे आपल्या मोटारसायकलच्या लायसन्समध्ये नवीन वर्गाची नोंद घेता येऊ शकेल. त्यासाठी नवीन मोटार वाहनाचे लायसन्स मिळविताना फॉर्म नं. ४ ऐवजी फॉर्म नं. ८ मध्ये अर्ज करावा लागतो. हा फॉर्म भरल्यानंतर त्या फॉर्मसोबत पूर्वीचे लायसन्स, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडावे लागतील व या सर्वांची पूर्तता केल्यानंतर आपल्या जुन्या लायसन्सवरच आपल्या कार लायसन्सची नोंद होईल, परंतु ही नोंद होताना लर्निंग लायसन्स, पक्क्या लायसन्ससाठी द्यावी लागणारी चाचणी ही द्यावीच लागणार.

**मी नुकतीच साठ वर्षे पूर्ण केली आहेत. परंतु एक माहिती म्हणून प्रश्न विचारतो आहे, अनेक प्रयत्नांनी लायसन्स मिळते. त्या लायसन्सचा पत्ता बदलला किंवा लायसन्स गहाळ झाले तर काय करायचे? किंवा लायसन्सचे निलंबन करता येते का? व त्यासाठी कोणते गुन्हे करू नयेत, यासाठी आपण आजपर्यंतच्या सदरात माहिती दिली नाहीत** तरी कृपया **आपण ती आता द्यावी.**

लायसन्सधारकाला पत्ता बदलायचा असेल तर साध्या कागदावर अर्ज करून पत्ता किंवा बदलाचा नाव तपशील व पुराव्याची कागदपत्रे सादर करावीत. पत्ता जर आर. टी. ओ. च्या

विभागाबाहेरचा असेल तर पूर्वीच्या कार्यालयाकडून संबंधित लायसन्सचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागते. जर लायसन्स गहाळ झाले, हरवले तर 'एलएलडी' अर्जाच्या विहीत नमुन्यात अर्ज करावा लागतो. खराब झालेले लायसन्स जमा करावे लागते व हरविले असल्यास तसा पोलीस अहवाल सादर करावा लागतो. आपण लायसन्स निलंबित होण्यास कारण ठरणारे कोणते गुन्हे आहेत, याची विचारणा केली आहे, त्या संदर्भात पुढे माहिती देत आहे :

१) वाहनांची चोरी करणे, २) प्रवाशांचे सामान चोरणे, ३) ड्रायव्हिंग करताना दुर्लक्ष होईल असे कार्य करणे, ४) प्रवाशांचे अपहरण करणे, ५) मोटार वाहनातून प्रमाणापेक्षा जास्त माल वाहून नेणे, ६) प्रतिबंधित मालाची वाहतूक करणे, ७) वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणे, ८) मालवाहू वाहनात प्रवाशांची वाहतूक करणे, ९) अपघाताच्या वेळी लायसन्सधारकाने करावयाच्या कर्तव्याचे पालन न करणे, १०) प्राधिवृगत अधिकाऱ्याने वाहन थांबविण्यास इशारा देऊन वाहन न थांबविणे, ११) प्रवाशांशी गैरवर्तणूक करणे, १२) प्रवासी वाहनात धूम्रपान करणे, १३) वाहतुकीस अडथळा होईल अशा रितीने वाहन सोडून देणे, १४) दारू किंवा अंमली पदार्थ सेवन करून वाहन चालविणे, १५) प्रवासी भाडे घेण्यास नकार देणे, १६) अधिकृत भाड्यापेक्षा जास्त भाड्याची मागणी करणे इ. या गुन्ह्यामुळे लायसन्सचे निलंबन किंवा कायमस्वरूपीसुध्दा रद्द केले जाऊ शकतात. आपण विचारलेल्या माहितीचा आपण निश्चित प्रचार-प्रसार कराल, म्हणून आपल्याला ही माहिती विस्तृत प्रमाणात सांगितली आहे.



■ ■ ■

# नॉन-ट्रान्सपोर्ट व ट्रान्सपोर्ट लायसन्स

**नॉन-ट्रान्सपोर्ट लायसन्स व ट्रान्सपोर्ट लायसन्स म्हणजे काय? यातील फरक आपण स्पष्ट करून सांगितल्यास लायसन्ससंदर्भात माहिती होऊ शकेल.**

आपण म्हणता त्याप्रमाणे ड्रायव्हर आपसात विचारतात की, लायसन्स ट्रान्सपोर्ट की नॉन-ट्रान्सपोर्ट, परंतु या संदर्भात सर्वसामान्य जाणून घेत नाहीत. आपल्याला जाणून घ्यायच्या हेतूने माहिती पुढीलप्रमाणे देत आहे.

ट्रान्सपोर्ट लायसन्स याचा थोडक्यात सोपा अर्थ म्हणजे भाडोत्री वाहनाचे लायसन्स; नॉन- ट्रान्सपोर्ट लायसन्स म्हणजे खाजगी वाहनाचे लायसन्स. खाजगी वाहने, ज्याचा व्यावसायिक उपयोग होत नाही, अशी वाहने. या सर्वांसाठी नॉन-ट्रान्सपोर्ट लायसन्सची आवश्यकता असते. एखादी कार व अन्य गाडी फक्त व्यक्तिगत स्तरावर खाजगी स्वरूपात वापरायची तर त्याला ट्रान्सपोर्ट लायसन्सची गरज नसते, परंतु याच प्रकारातले वाहन व्यावसायिक स्वरूपात वापरायचे असेल तर मात्र ट्रान्सपोर्टचे लायसन्स असणे आवश्यक आहे. आर.टी.ओ. कार्यालयातून घेण्यात येणा-या शिकाऊ व पक्कया लायसन्सची चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर नॉन ट्रान्सपोर्ट लायसन्स मिळू शकते. ट्रान्सपोर्ट लायसन्स काढायचे असेल तर मात्र आर.टी.ओ. मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूलमधून प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र असल्याशिवाय पक्क्या लायसन्ससाठी चाचणी देता येत नाही. ट्रान्सपोर्ट लायसन्समध्येही दोन प्रकारांत विभागणी झालेली आहे. १) हलके वाहन चालक लायसन्स २) जड व मध्यम वजनाची जड वाहने याच्या चालकांचे लायसन्स. आपण जो वर्ग लायसन्सचा घेतला आहे, त्या वर्गाची वाहने चालविणे वैध ठरते.



जड वाहनाचे ट्रान्सपोर्ट लायसन्स मिळविण्याकरिता हलके मोटारवाहन चालविण्याचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही वाहनाचे उदा. कार, जीप इ. यांचे ट्रान्सपोर्ट लायसन्स मिळविण्याकरिता वयाची २० वर्षे पूर्ण असणे आवश्यक असते. नॉन -ट्रान्सपोर्ट वाहनाचे लायसन्स मात्र १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या चालकास मिळू शकेल व २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर हा चालक ट्रान्सपोर्ट वर्गातील लायसन्ससाठी अर्ज करू शकेल.

काही जड वाहने ज्वालाग्राही पदार्थांची माल-वाहतूक करतात. त्या प्रकारच्या वाहनचालकांना लायसन्स मिळविल्यानंतर ज्वालाग्राही पदार्थांच्या सुरक्षित वाहतुकीविषयीचे तीन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे यदाकदाचित काही अपघात घडल्यास वाहनचालकाला त्या परिस्थितीला सामोरे जाणे सोपे होते. ज्वालाग्राही पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाच्या ट्रान्सपोर्ट लायसन्सची विधिग्राह्यता फक्त एक वर्षाची असते. एक वर्षानंतर अशा वाहनाच्या चालकांनी एक दिवसाचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे लायसन्स नूतनीकरण करणे आवश्यक असते.

आपण घेतलेल्या या माहितीबरोबर जर अशा प्रकारचे लायसन्स आपण काढणार असाल तर आर.टी.ओ. कार्यालयात अधिक नियमांची माहिती जरूर करून घ्या.

■ ■ ■



# मुलांसाठी लायसन्स – नियम

**माझी मुलगी आता बारावीच्या परीक्षेला बसणार आहे. क्लाससाठी जाणे-येणे करायला तिला दोनचाकी वाहन घ्यायचे आहे. त्यासाठी तिला लायसन्स मिळू शकेल का? त्यासाठी काही नियम असेल तर सांगा.**

आपण आपल्या मुलीचा वयोगट सांगितलेला नाही, परंतु ती जर १६ वर्षांखालील असल्यास तिला मोटारवाहन चालविता येणार नाही, परंतु तिचे वय जर १६ वर्षांवरील असेल तर तिला अर्थातच १६ ते १८ वर्षाखालील व्यक्तीस ५० सी. सी. पेक्षा कमी इंजिन क्षमता असणारी वाहन चालविण्याचे लायसन्स मिळविता येते. इंजिनच्या क्षमतेची चौकशी मोटारवाहन डीलर्सकडे होऊ शकेल. १६ ते १८ वयोगटातल्या मुलांना लायसन्स देण्यासाठी मात्र आई-वडिलांची संमती आवश्यक आहे. त्याकरिता लायसन्सला अर्ज करणाऱ्या मुलांच्या पालकांनी लायसन्स ॲथॉरिटीसमोर प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.



**आमच्या घरात मोटारगाडी सर्वजण चालवितात. आमच्या दोन्ही मुलांना आम्ही गाडी चालवायला शिकविले आहे. त्यांचे लायसन्स काढण्यासाठी मोटार ट्रेनिंग स्कूलमध्ये पाठवावे लागेल का?**

आपल्या मुलांना आपण मोटारगाडी चालवायला शिकविले हे चांगले आहे, पण रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने आपण त्यांना मोटारवाहन नियमांची माहिती दिली आहे का? वाहतुकीचे नियम आपण त्यांना सांगितले आहेत का? मोटारगाडी चालविता येणे महत्त्वाचे नाही तर नियम व कायद्याचे पालन करणेदेखील महत्त्वाचे आहे. मोटारगाडी चालवायला शिकताना सुरूवातीला शिकाऊ लायसन्स काढणे गरजेचे आहे. नंतरच पक्के लायसन्स मिळू शकेल. त्यामुळे आपल्या

मुलांना सर्वप्रथम शिकाऊ लायसन्स काढावे लागेल. नंतर त्यांना पक्के लायसन्स मिळू शकेल. लायसन्स मिळण्यासाठी मोटार ट्रेनिंग स्कूलमध्ये जाणे गरजेचे नाही. जर आपण राहता त्या भागामध्ये आपल्या माहितीमध्ये एखादे मोटार ट्रेनिंग स्कूल असेल जे मोटार वाहन नियमांची, वाहतूक नियमांची माहिती आपल्या मुलांना तेथे प्रशिक्षण अवश्य द्या. त्यामुळे त्यांनी योग्य नियम शिकून गाडी चालवून लायसन्स मिळविले तर आपल्याला आनंद होईल व ते गाडी चालविताना आपली काळजीदेखील दूर होईल.

**आम्ही ठाण्यात राहतो. माझा मुलगा १९ वर्षांचा आहे. त्याचं टू व्हीलर लायसन्स आहे. ते ठाण्यात काढले आहे. तो आमच्या नातेवाईकांकडे गुजरातला जाणार आहे. तिथे त्याचं लायसन्स चालेल का?**

आपल्या मुलाचे लायसन्स हे संपूर्ण देशात चालू शकेल. लायसन्सला अशी मुदतीची वैधता आहे. तशीच ती देशात वाहन चालविण्याची वैधता आहे. प्रत्येक राज्यात असलेल्या मोटारवाहन नियमांची माहिती घेऊन जर वाहन चालविले तर कोणत्याही नियमांचा भंग होणार नाही. त्यामुळे ते जरी ठाण्यात काढले असेल तरी ते गुजरातमध्ये नक्की चालू शकेल.

**माझ्याकडे चारचाकी वाहनाचे लायसन्स आहे तर मी दुचाकी वाहन चालवण्यासाठी लायसन्स काढायची गरज आहे का?**

दुचाकी व चारचाकी हे दोन्ही वाहन प्रकार वेगळे आहेत. चारचाकी वाहन चालविण्याचे लायसन्स जर हलक्या वाहनासाठी असेल तर त्या लायसन्सवर फक्त हलक्या वाहनाची गाडी चालविता येईल. त्या लायसन्सवर जड वजनाची गाडी चालविता येणार नाही. त्याचप्रमाणे जर टू व्हीलर चालवली तरी तो कायद्याच्या दृष्टीने विनालायसन्स गाडी चालवतो असा होऊ शकते. त्यामुळे ज्या वर्गासाठी लायसन्स काढले आहे, त्या वर्गासाठीच त्याचा वापर झाला पाहिजे. कारण अगदी सर्वसाधारणपणे प्रत्येक वाहनवर्गाची क्षमता व विशेषताः वेगळी असल्यामुळे त्या त्या वर्गाचे लायसन्स असणे महत्वाचे ठरते.

■ ■ ■

# मुलांनी गाडी चालवावी?

**उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. काही ओळखीच्या लोकांनी या सुट्टीत मुलांना गाडी चालवायला शिकविण्याचा निर्णय घेतलाय. मुलांनी गाडी चालविण्याच्या कायदेशीर बाबी काय आहेत? जाणून घ्यायचे आहे.**

आपण जो प्रश्न विचारला आहे ती वस्तुस्थिती आहे आणि दुर्दैवही. सध्याच्या स्पर्धेच्या युगात वेग सर्वांना हवा आहे. आपल्या मुलाला गाडी चालविता येते हे भूषण मिरविणाऱ्या पालकांची संख्या वाढत आहे. असा विचार करणाऱ्या पालकांना आपण आपल्या मुलांच्या जीविताशी खेळत असल्याची कल्पनाच नसते. शाळा, क्लास, मित्रांकडे जाण्यासाठी आपल्या (किशोरवयीन) मुलांना गाडी घेऊन देणारे पालक हे सामाजिक गुन्हेगार आहेत, असंच म्हणावं लागेल, तसेच असे करणे म्हणजे एक गुन्हाच आहे. आज आधुनिकतेची जोड मिळून अनेक नवनवीन वाहने बाजारात येत आहेत. किशोरवयीन मुलांना विशेषतः दुचाकी वाहनाचे जास्त वेड असते. मुलांचा हट्ट पुरवण्यासाठी पालक त्याला दुचाकी घेऊन देतात. या संदर्भात आपण विचारल्याप्रमाणे कायदा काय सांगतो हे महत्त्वाचे ठरते.



कोणत्याही प्रकारचे खाजगी वाहन चालविण्यासाठी, मोटारगाडी, मोटारसायकल इत्यादींसाठी किमान वय १८ वर्षे पूर्ण असायला हवे. या नियमाला अपवाद आहे तो दुचाकीचा नियम आणि तेसुध्दा ५० सीसीपेक्षा कमी असलेल्या दुचाकीसाठी (सी सी ही वाहनाची इंजिन क्षमता मोजता येण्याचे परिमाण आहे). ५० सीसीपेक्षा कमी क्षमता असलेले दुचाकी वाहन चालविण्यासाठी १६ ते १८ वयोगटातील मुला-मुलींना लायसन्स मिळू शकते. ५० सीसीसारखी

दिसणारी दुचाकी पालक मुलांना घेऊन देतात हे बेकायदेशीर आहे. छोट्या दिसणाऱ्या परंतु ६० सीसी क्षमतेच्या दुचाकी चालविणे १६ ते १८ वयोगटातल्या मुलांच्या दृष्टीने चूक आहे. १६ ते १८ वयोगटातल्या मुला-मुलींना लायसन्स मिळविण्यासाठी (५० सीसी) पालकांनी संबंधित आर.टी.ओ. कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांसमोर अर्जावर सही करून संमती देणे आवश्यक आहे.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या आपल्या मुलाला चारचाकी गाडी चालवायला देताना त्याला योग्य पध्दतीचे प्रशिक्षण मिळेल याची दक्षता घ्यायला हवी. शेजारी पक्के लायसन्स असलेल्या प्रशिक्षकाने चालकाला शिकाऊ लायसन्सवर गाडी चालविता येणार नाही, याची जाणीव करून द्यायला हवी आहे. गाडी चालवायला शिकताना मागे व पुढ 'L' या इंग्रजी अक्षराची पाटी लावणे आवश्यक आहे. अपघाताच्या वाढत्या समस्या, सुरक्षित ड्रायव्हिंग, वाहतुकीचे नियम, संयमीपणा याबाबत अधूनमधून पालकांनी पाल्यांशी जाणीवपूर्वक चर्चा करायला हवी.

मुलांचे लाड करणे गरजेचे आहे, ते करायला पाहिजेत. परंतु मुलांना वाहन चालविण्यास देताना योग्य ती काळजी बाळगणे अत्यावश्यक आहे. नियम व कायद्याचे भान राखून पालकांनी पाल्याचे लाड पुरवायला हवेत. पालकांचा डोळा चुकवून एखादा मुलगा शाळेत वाहन घेऊन जात असेल तर शिक्षक वर्गाने विद्यार्थ्याला ताकीद द्यायला हवी. मुलांना वाहन चालविता आलेच पाहिजे, परंतु प्रत्येक गोष्ट योग्य वेळी करणे सोयीस्कर ठरते, तसेच वाहनानुसार वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावरच मुलांच्या हाती वाहन द्या, अन्यथा एखादे वेळी पालकांना भीषण अपघातासारख्या कटू प्रसंगाला सामोरे जावे लागेल.

■ ■ ■



# परवाना हस्तांतरण

**रिक्षा व टॅक्सी परवान्यांचे हस्तांतरण कसे केले जाते ? परवान्यावरील वाहन बदलायचे असेल तर काय करायचे ?**

परवाना एका नावावरून दुसऱ्या नावावर हस्तांतरित करता येत नाही. काही वेळा दुसऱ्याचा परवाना घेऊन रिक्षा, टॅक्सी चालवल्या जातात. परंतु हा परवाना (परमिट) दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर हस्तांतरण करता येत नाही. त्यामुळे आपल्या प्रश्नानुसार परवान्याचे हस्तांतरण करता येत नाही. अन्यथा परवाना विक्रीचे व ते नावावर करून घेण्याचे प्रकार वाढले असते. परंतु परवानाधारकाचा मृत्यू झाल्यास संबंधित परवाना ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटी यांच्या परवानगीने परवानाधारकाच्या वारसांच्या नावे हस्तांतरित करता येतो. याकरिता वारसदाराने परवानाधारकाच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे.



रिक्षा व टॅक्सी यांच्या परवानाधारकाचा मृत्यू झाल्यास परवान्याचे हस्तांतरण करण्याकरिता परवानाधारकाच्या वारसाने दोन महिन्यांच्या आत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे (Regional Transport Authority) परवानाधारकाच्या मृत्यूबाबत माहिती द्यावी. ही माहिती इंट.डी.टीआर (Int. D.tr) या फॉर्ममध्ये भरून द्यावी.

वारसाला परवाना हस्तांतर करून घेण्यासाठी तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे गरजेचे आहे. या हस्तांतरास कोणाची हरकत असल्यास किंवा नाही हे स्पष्ट करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात एन. डी. (N.D) या नमुन्यात नोटीस प्रसिध्द करावी लागते. ही प्रसिध्द केलेली

नोटीस व वारसदाराच्या छायाचित्राच्या दोन प्रतींसह अर्ज करावा लागतो. अशाप्रकारे पूर्ण तपशिलासह केलेल्या अर्जावर ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटी निर्णय घेते व त्यानंतर परवान्याचे हस्तांतरण केले जाते आणि मूळ परवान्यावर वारसाच्या नावाची नोंद करण्यात येते. हा परवाना हस्तांतरित करताना कार्यवाहीच्या वेळी वारस असलेल्या व्यक्तीने प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक आहे. परवाना वारसदाराच्या नावे करणे ही अगदी सोपी पद्धत आहे. परिवहन प्रादेशिक अधिकारी याबाबत कार्यवाहीसाठी निश्चित मदत करू शकतात.

आपण परवान्यावरील वाहनाच्या बदलाबाबत विचारले आहे. तर पुढे स्पष्ट केलेल्या परिस्थितीमध्ये आपण वाहन बदलू शकाल. परवान्यावरील वाहन आपण विकले किंवा परवान्यात नमूद असलेले वाहन जुने झाल्यास किंवा अन्य काही कारणांमुळेसुध्दा वाहन बदलता येते. याकरिता योग्य नमुन्यात अर्ज करावा लागतो व वाहनावर कर्ज असल्यास मात्र संबंधित बँकेचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. मूळ परवान्यावर ज्या वाहनाची बदलानंतर नोंद करायची आहे ते बदली वाहन मूळ वाहनाच्या बनावटीचे असावे लागते. परवानाधारकाने हा परवाना, परवाना कार्यालयामध्ये जमा केला असेल अथवा तपासणीच्या वेळी पोलीस अधिकारी अथवा मोटार वाहन अधिकारी किंवा कोर्ट यांनी तपासणीकरिता ताब्यात घेतल्यास त्यांनी दिलेली पोच पावतीचा तात्पुरता परवाना म्हणून वापर केला जातो. हा तात्पुरता परवाना ठरावीक कालावधीसाठी वापरला जाऊ शकतो. परवानासंदर्भात प्रश्नांची उत्तरे आपल्याला बहुतेक मिळाली असावीत, त्याप्रमाणे आपण योग्यप्रकारे कार्यवाही करावी.

■ ■ ■



# परमिट / ‘ T ’ परमिट

***आमचा प्रश्न आहे की, ट्रक, लॉरी यांच्यामागे जे एनपी लिहिलेले असते, त्याचा अर्थ नॅशनल परमिट असा आहे, हे माहीत आहे. परंतु त्याबाबतची माहिती हवी. त्याचबरोबर ‘टी ’परमिटबद्दलसुध्दा माहिती द्यावी. परवाना (परमिट) म्हणजे काय हे सुध्दा थोडक्यात सांगावे.***

***तुम्ही विचारलेल्या नॅशनल परमिटच्या प्रश्नाबाबत माहिती पुढीलप्रमाणे आहे :***

राष्ट्रीय माल वाहतूक परवाना-नॅशनल परमिट हा गाडी ज्या राज्यात नोंदली गेली आहे, ते राज्य व बाहेरील राज्यात माल वाहतूक करण्यासाठी विशिष्ट अटींचे बंधन घालून दिला जातो. असा परवाना कमीत कमी चार राज्यांकरिता किंवा संपूर्ण भारतात ये-जा करण्यासाठी दिला जातो. परवाना कोणत्या राज्यात नोंदवायचा आहे, हे मालकाच्या इच्छेप्रमाणे ठरविले जाते. दोन ॲक्सलपेक्षा कमी ॲक्सल असणाऱ्या वाहनांना १२ वर्षे वयापर्यंत तर दोनपेक्षा अधिक ॲक्सल असणाऱ्या वाहनांना १५ वर्षे वयापर्यंत राष्ट्रीय परवाना दिला जातो. ‘टी’ म्हणजे टूरिस्ट परमिट. वेगवेगळ्या राज्यात धार्मिक स्थळे असतात. तेथे पर्यटकांची वाहतूक विनाखंड होण्यासाठी, पर्यटक वाहन परवाने दिले जातात. अशा परवाना मिळणाऱ्या वाहनांना केंद्रीय मोटार वाहन नियम १२८ प्रमाणे सर्व नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. हे ‘ टी ’ परमिट तीन राज्यांकरिता किंवा संपूर्ण भारतातसुध्दा दिले जाते.

अशा अनेक प्रकारचे परवाने दिले जातात. यामध्ये माल वाहतूक परवाना, विशेष परवाना, कंपनी वाहतूक परवाना, आंतरराज्य मार्ग वाहतूक परवाना हे वेगळे परवान्याचे प्रकार आहेत. त्या अगोदर परवाना म्हणजे नेमके काय याबाबत माहिती करून घेऊ या.

कोणतेही परिवहन वाहन, त्याला आवश्यक असलेली वाहन चालविण्याची परवानगी असल्याशिवाय वाहनधारक चालवू शकणार नाही. ही परवानगी म्हणजेच ‘परमिट’. परिवहन वाहन म्हटले तर त्याला परवान्याची गरज लागणारच, त्याशिवाय ते परिवहन वाहन होणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य, केंद्र सरकार यांची परिवहन वाहने, रूग्णवाहिका, शववाहिनी, तीन हजार किलोंपेक्षा कमी नोंदणीकृत वजन असलेल्या वाहनांना परवान्याची गरज नसते. वाहतूक परवान्याचे १) टप्पा वाहतूक परवाना, २) कंत्राटी वाहतूक परवाना असे दोन प्रकार आहेत. टप्पा वाहतूक परवाना असलेले वाहन कोणत्याही पूर्वनियोजित कराराशिवाय दोन ठिकाणांमधील मार्गावर सर्व प्रवाशांची वाहतूक करता येते. यात एस. टी. व महानगरपालिका नियंत्रित प्रवासी वाहनांचा समावेश होतो. कंत्राटी वाहतूक परवाना असणाऱ्या वाहनांना टप्पा

पध्दतीने प्रवाशांची वाहतूक करता येत नाही. रिक्षा, टॅक्सी, मोटारकॅब, पर्यटक वाहने, मालवाहू वाहने यांना देण्यात येणारे परवाने कंत्राटी पध्दतीचे असतात. टप्पा पध्दतीने प्रवाशांची वाहतूक म्हणजे प्रवाशांना नियोजित ठिकाणी उतरविणे व त्या ठिकाणी घेणे, अर्थात त्याला बस थांब्यावर गाडी थांबवून प्रवाशांची ने-आण करणे म्हणतात. ज्या गोष्टींसाठी परिवहन वाहनांना परवाना दिला जातो, त्यासाठीच तो परवाना वापरला जायला हवा. उदा. मालाची वाहतूक करणे अपेक्षित आहे, माणसांची नाही. त्याचबरोबर ज्वालाग्राही पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना अधिक बंधनकारक अटी घालून परवाना देण्यात येतो. अशा वाहनांवर ज्वालाग्राही पदार्थाची माहिती द्यावी लागते, किंबहुना ते बंधनकारकच आहे. अशा नियम व अटींवरच वाहनाच्या परवान्याची वैधता टिकते, अन्यथा परवाना रद्दबातलदेखील करता येतो.

■ ■ ■

# रिक्षा परवाना हस्तांतरण

**आमच्या ओळखीच्या, मित्र असलेल्या रिक्षा ड्रायव्हरचा मृत्यू झाला आहे. त्याच्या रिक्षाचेपरमिट आता रद्द होणार का? त्याचे ट्रान्सफर होणार का? त्याच्या कुटुंबासाठी ते गरजेचे आहे. कृपया मार्गदर्शन करावे.**

कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा वाहतूक परवाना दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित होत नाही, परंतु एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास मात्र ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटीच्या परवानगीने परवानाधारकाच्या वारसांच्या नावे हस्तांतरित करता येतो. याकरिता वारसदाराने परवानाधारकाच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. परवानाधारकाच्या वारसाने २ महिन्यांच्या आत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे सदर मृत्यूबाबत माहिती द्यावी. ही माहिती फॉर्ममध्ये भरून द्यावी लागते.

मात्र वारसदारास संबंधित परवान्यावर इतर कोणत्याही व्यक्तीची हरकत नसल्याचे स्पष्ट होण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रात विशिष्ट नमुन्यात नोटीस प्रसिध्द करावी लागते. असा अर्ज मिळाल्यानंतर ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटीतर्फे परवान्याचे हस्तांतर करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येते व मूळ परवान्यावर वारसाच्या नावाची नोंद घेण्यात येते. अशा प्रकारचा परवाना हस्तांतरण कार्यवाहीच्या वेळी वारस प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक आहे. या संदर्भातील अधिक साहाय्य व मार्गदर्शन आवश्यक असेल तर प्रादेशिक परिवहन विभागातील सहाय्यक परिवहन अधिकारी करू शकतील.

■ ■ ■

# वाहनांची नोंदणी

**वाहनांची नोंदणी (रजिस्ट्रेशन) करणे गरजेचे आहे का? त्याची जबाबदारी कोणती आहे? वाहन नोंदणीबद्दल थोडक्यात माहिती द्याल का?**

केंद्रीय मोटार वाहन नियम ४२ अन्वये ही जबाबदारी वाहन खरेदीदार-विक्रेते या दोघांचीही आहे. कोणतेही वाहन विकल्यानंतर संबंधित विक्रेत्याने (डीलर ) त्या वाहनाची तात्पुरती किंवा पक्की नोंदणी केल्याखेरीज ते वाहन खरेदीदाराच्या ताब्यात देताच येत नाही.त्याचबरोबर खरेदीदाराला वाहन तात्पुरती पक्की नोंदणी केल्याशिवाय वाहनाचा वापर करता येत नाही. त्यामुळे वाहन खरेदीदार व विक्रेता या दोघांचीही ती संयुक्त जबाबदारी आहे.

या वाहनाची नोंदणी दोन वर्गामध्ये करता येते: १) खाजगी (Non-Transport) (२) भाडोत्री (Transport). खाजगी वाहनांचा वापर स्वतःच्या खाजगी कामासाठी केला जातो. या प्रकारातल्या वाहनांना विशिष्ट वाहतूक परवाना व योग्यता प्रमाणपत्र यांची आवश्यकता असते. मोटार-सायकल, कार, जीप, शेतीचा ट्रॅक्टर, अपंगाचे वाहन इ. वापर खाजगी प्रकारच्या वाहन प्रकारात येतो.

भाड्यासाठी अर्थात भाडे घेऊन धंद्यासाठी वापर केल्या जाणाऱ्या वाहनांना 'ट्रान्सपोर्ट' वाहन म्हणून वाहन परवाना व योग्यता प्रमाणपत्र यांची आवश्यकता असते. मोटार कॅब, ट्रक, टेम्पो, टॅक्सी कॅब, कंपनी बस, रिक्षा, टॅक्सी, प्रवासी बस इ. वाहनांचा अंर्तभाव ट्रान्सपोर्ट प्रकारातल्या वाहनांत होतो.

या वाहनांची नोंदणी किती काळपर्यंत विधिग्राह्य असते हेसुध्दा जाणून घ्यायला हवे.

खासगी वाहनांची नोंदणी विधिग्राह्यता १५ वर्षांसाठी असते. पंधरा वर्षांनंतर वाहनांची पुनर्तपासणी करून नोंदणीची विधिग्राह्यता पुढील पाच वर्षांसाठी वाढविता येते.

भाडोत्री नवीन वाहनांची नोंदणी दोन वर्षांसाठी विधिग्राह्य असते. या मुदतीनंतर दरवर्षी वाहनांची पुनर्तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करून नोंदणीचा कालावधी वाढविला जातो. वाहनांची तात्पुरती नोंदणी करून वाहन ताब्यात घेतले जाते; ही तात्पुरती नोंदणी फक्त

सात दिवसांसाठी असते; परंतु योग्य कारण असेल तर ही नोंदणीची विधिग्राह्यता एक महिन्यापर्यंत वाढविता येते.

नवीन वाहनांची नोंदणी करताना तात्पुरती नोंदणीची मुदत संपायच्या आत वाहन पक्क्या नोंदणीकरिता नोंदणी अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक आहे. ज्या वाहनांची तात्पुरती नोंदणी केली नाही अशा वाहनांची सरळ विक्रेत्यांमार्फत पक्की नोंदणी केली जाते. नोंदणीसाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे पुढील आहेत :

१) विक्री प्रमाणपत्र

२) रोडवर्दीनेस व बॉडी बिल्डरचे प्रमाणपत्र

३) विधिग्राह्य विमा पॉलिसी

४) वाहनाचे खरेदी बिल

५) तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र

६) पॅन नंबर

७) वाहन आयात असेल तर कस्टम विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र

८) ट्रॅक्टर व ट्रेलर वाहनांकरिता शेतकरी असल्याचे तहसीलदाराचे प्रमाणपत्र

९) वाहनाची बॉडी, वाहन परराज्यातून घेतल्यास प्रवेश कर भरल्याची पावती

१०) वाहन खास महानगर क्षेत्रातील असल्यास जकात कर भरल्याची पावती

११) वाहन खास अपंगांसाठी असेल तर मूळ कंपनीचे तसे प्रमाणपत्र

१२) पत्त्याचा पुरावा (टेलिफोन, वीज बिल, विमा पॉलिसी, पासपोर्ट इ.)


या सर्व प्रमाणपत्रांची पूर्तता करून घेतल्यानंतर या वाहनाचा कर वसूल केला जातो. नंतरच वाहनांची नोंदणी केली जाते व वाहनास नोंदणीक्रमांक दिला जातो. मग हा नोंदणीक्रमांक त्या वाहनाच्या नंबरप्लेटवर विसावला जातो आणि हा क्रमांक त्या वाहनाची ओळख ठरली जाते. नोंदणीसाठी आवश्यक वाटणाऱ्या बहुतेक बाबींबद्दल माहिती दिलेली आहे. वाहन खरेदी करताना त्याचा वापर निश्चितच होईल, याबाबत डीलर आणि वाहन नोंदणी अधिकाऱ्यांकडूनसुध्दा अनेक बाबी समजावून घेता येतील.

■ ■ ■

# रस्ता सुरक्षा व सिग्नल

**माझा प्रश्न सिग्नलबाबत आहे. लाल दिवा लागल्यावर थांबायचं हे माहीत आहे. परंतु काही वेळेला पिवळा दिवा चालू-बंद होत राहतो याचा अर्थ काय, जरा सिग्नलबाबत सांगाल तर माझा गोंधळ दुर होईल.**

सर्वप्रथम रस्ता सुरक्षेसंदर्भातल्या महत्त्वाच्या बाबीबद्दल आपण विचारले याबाबत मी आपले अभिनंदन करतो ! सिग्नलसंदर्भात अनेकांचे गोंधळाचे वातावरण होते, परंतु निव्वळ अज्ञान प्रकट करणे आवडत नसल्यामुळे हा गोंधळ तसाच कायम राहतो. आपल्या प्रश्नामुळे याचे उत्तर निश्चित सर्वांना माहिती देऊ शकेल.



रस्त्यावरील सिग्नलच्या दिव्यांचा क्रम हा ठरलेला असतो. हा क्रम हिरवा, पिवळा, लाल, हिरवा या क्रमाने लागतो. एखाद्या चौकात हिरव्या दिव्यानंतर पिवळा लागतो. याचा अर्थ 'थांबण्यासाठी तयार राहा' असा आहे. यानंतर झेब्रा क्रॉसिंगच्या अलीकडची सर्व वाहने थांबवायची असतात; परंतु थांबारेषेजवळ गाडी येताच सिग्नल क्रॉस करण्याचा अट्टाहास करू नये. सर्वसामान्यपणे बेशिस्त ड्रायव्हर पिवळा दिवा दिसला की वेग वाढवून लाल दिव्याअगोदर सिग्नल पार करतात. चौकात असा प्रकार झाल्याने अन्य बाजूच्या गाड्या चौक पार करताना अनेक भीषण अपघात झालेले आहेत, असे असूनसुध्दा सिग्नलजवळ थांबायचे नाही या अट्टाहासामुळे काही वाहनचालक स्वत:बरोबर इतरांचा जीव धोक्यात घालतात. हे अत्यंत चूक आहे. चौकात पिवळा दिवा लागताच आपल्यामागील वाहनाचा अंदाज घेऊन आपले वाहन थांबवायचे असते.

तुम्ही पिवळा दिवा चालू-बंद होत असेल तर काय करायचे विचारले, त्याबाबत आपणास सांगता येईल की, काही ठिकाणी क्रॉसरोड असतात, रेल्वेक्रॉसिंग असतात अशा ठिकाणी जर

रहदारी तुलनेने कमी असेल तर ट्रॅफिक सिग्नल बसविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्या ठिकाणी चालू बंद होणाऱ्या पिवळ्या किंवा लाल दिव्याचा वापर होतो. चालू-बंद पिवळा दिवा दिसल्यानंतर 'वाहनाची गती कमी करून सावधानपूर्वक पुढे जा' असा त्याचा अर्थ होतो. परंतु लाल दिवा चालू-बंद असा दिसला तर वाहन पूर्णतः थांबवून वाहतुकीचा अंदाज घेऊन मगच पुढे जावे असा नियम आहे.

काही वेळेला चौकात लाल दिवा लागलेला असतो, परंतु वाहतूक पोलीस आपल्याला पुढे जाण्याचा इशारा देत असेल, तर मात्र अवश्य त्या वाहतूक पोलिसाचा निर्देश मानायचा आणि त्यानुसारच वाहनाची दिशा ठरवायची.

सिग्नल हे आपल्यासाठी सुरक्षितता देतात, त्याचबरोबर ते आपल्याला सुशिक्षित करतात. त्यासाठी आपण सुसंस्कृत असल्यामुळे ते पाळणे महत्त्वाचे आहे.

■ ■ ■



# प्रवासी व माल वाहतुकीचे नियम

**रिक्षा, टॅक्सी ही वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांसाठी काय नियम आहेत, त्याचबरोबर प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या बसेस, फक्त माल वाहून नेणारे वाहन लोकांची वाहतूक करतात, यासाठी काही नियम असतील तर सांगा. जेणेकरून सर्वसामान्यांना याबाबत माहिती मिळून ते कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मदत करू शकतील.**




कायद्याने अनेक बाबींचा विचार केला आहे. प्रवाशांच्या सोयीचा तर योग्य पध्दतीने विचार केला आहे. आपण म्हणता तसे जर सर्वांनी कायदा जाणून घेऊन त्याचा आग्रह धरला तर अनेक बेकायदेशीर कृत्यांना आळा बसू शकेल. सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीय माणूस रिक्षा टॅक्सीमधून प्रवास करताना ज्या थोड्याफार अडचणी येतात, त्या दूर व्हायलाच पाहिजेत.

या हेतुनेच त्यांच्या संदर्भातले नियम, त्याचबरोबर रिक्षाचालक, टॅक्सीचालकांच्या कर्तव्याबाबत सांगणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात माहिती पुढे देत आहे.

१ रिक्षा / टॅक्सीचालकांनी आपले वाहन सुस्थितीत व स्वच्छ ठेवायला हवे.

२ भाडे जवळचे आहे ही सबब भाडे नाकारण्यासाठी चालणार नाही.

३ प्रवाशांशी सौजन्याने वागायला हवे.

४ आसन क्षमता असेल त्यापेक्षा जास्त प्रवासी घेऊ नयेत.

५ प्रवाशांना इच्छित स्थळी जवळच्या मार्गाने पोहोचविले पाहिजे व दरपत्रकाप्रमाणे (टेरिफ) भाडे घ्यायला पाहिजे. शेअर प्रमाणे भाडे आकारण्याच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहनात बसवू नयेत.

६ प्रवाशांनी जे स्थळ सांगितले असेल त्या ठिकाणीच पोहोचविले पाहिजे. मध्येच सोडता येणार नाही.

७ वाहन रांगेत उभे करून रांगेतून येणाऱ्या प्रवाशांची वाहतूक करायला हवी. लोकांना धक्का मारून आकर्षित करून त्यांना प्रवास करायला भाग पाडू नये.

८. यदाकदाचित वाहनाला अपघात झाल्यास त्याची माहिती २४ तासांच्या आत पोलिसांना कळवून अपघातग्रस्तांना योग्य ती मदत करायला हवी.

रिक्षा-टॅक्सीबरोबर बसेसमधूनसुध्दा प्रवाशांची वाहतूक होते. त्या वाहनचालकांसाठीचे नियम खालीलप्रमाणे आहेत.

१ वाहनचालकांनी धूम्रपान करू नये.

२ प्रवाशांना हाक मारून आकर्षित करू नये, वाहनांसाठी दिलेल्या परवाना अटी व शर्तींचे पालन करणे.

३ वाहनचालकाने आपल्या शेजारी अडचण होईल अशाप्रकारे प्रवाशांची, प्राण्यांची वाहतूक करू नये.

४ आपले वाहन चांगल्या स्थितीत ठेवावे व प्रवाशांशी सौजन्याने वागावे.

५ बसमधून प्रवासी उतरताना वा चढताना धोकादायक पध्दतीने वाहन चालवू नये.

६ बसमध्ये प्रवासी असताना इंधन भरू नये.

७ वाहन प्रवास चालू असताना बंद पडले तर प्रवाशांना ठरलेल्या ठिकाणी पोहोचवायची व्यवस्था करायला हवी, अन्यथा उरलेल्या प्रवाशांचे भाड्याचे पैसे प्रवाशांना परत करायला हवेत.

८ प्रवास करताना प्रवाशांना उशीर होईल, असे कृत्य जाणूनबुजून करू नये.

९ रल्वे क्रॉसिंगजवळ काळजी घ्यायला हवी.

१० प्रवाशांना हाक मारून आकर्षित करू नये.

११ अपघात घडल्यास २४ तासांच्या आत जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये माहिती दयावी व अपघातातील जखमींना मदत करायला हवी.

## • मालवाहतुक वाहनासाठी नियम •

मालवाहतूक करणाऱ्या गाडीतून फक्त मालाची व संबधित कामगारांचीच वाहतूक करायला हवी. त्यासाठी जे नियम आहेत ते पुढीलप्रमाणे:

१ वाहनांतील माल खराब होऊ नये किंवा रस्त्यात पडू नये यासाठी काळजी घ्यावी.

२ परवाना अटींचे व नियमांचे पालन करावे.

३ वाहनांत काही बिघाड असेल तर ते चालवू नये.

४ वाहन सुस्थितीत ठेवून जाणूनबुजून विलंब टाळवा.

इतरांना अडथळा होईल अशा प्रकारचा माल वाहनांत भरू नये. माल वाहतुक वाहनातुन प्रवासी अथवा माणसांसाठी क्षमतेपेक्षा जास्त कामगारांची वाहतुक करू नये. यासाठी हलके मोटारवाहन व अवजड वाहनातून अनुक्रमे ३व ६ पेक्षा जास्त कामगार वाहतुकीस बंदी आहे. प्रवासी बस, रिक्षा /टॅक्सी, मालवाहू बसेस या सर्वांसाठी प्रवाशांची काळजी घेऊन नियम बनविलेले आहेत. अपघात घडल्यास २४ तासांच्या आत पोलिसांना कळविणे व अपघातग्रस्तांना मदत करणे सक्तीचे आहे. हे व इतर नियम आपल्या सर्वांच्या, प्रवाशांच्या सोयीचे आहेत.

आपण म्हणता तसा या नियमांचा आग्रह धरायला पाहिजे व रस्ता सुरक्षेसाठी आपणही मनापासून प्रयत्न करायला हवा.

■ ■ ■

# नंबर प्लेट – नियम

**प्रत्येक गाडीची ओळख म्हणून नंबर प्लेट लावलेली असते, परंतु वेगवेगळ्या अक्षरांत, आकारांत नंबरप्लेट असते, याबाबत नेमका कायदा काय आहे? नियमानुसार प्लेट कशी असावी? तसेच पिवळी प्लेट व पांढरी प्लेट याबाबतही सांगा.**




नंबरप्लेट ही गाडीची ओळख आहे, हे अगदी बरोबर आहे. यासाठीच मोटार वाहन नियम १९८९ च्या ५० व ५१ कलमांन्वये गाडीवर नंबरप्लेट कोठे असायला पाहिजे. त्या नंबरप्लेटचे आकारमान काय असावे, हे निर्धारित केले आहे. त्यानुसार ती नंबरप्लेट नसेल तर मात्र दंड होऊ शकतो. नंबरप्लेटच्या संदर्भातले काही नियम थोडक्यात माहितीसाठी देत आहे.

खाजगी वाहन असल्यास पांढऱ्या रंगावर काळ्या रंगाची अक्षरे व अंक असायला हवेत तर व्यवसायिक वाहनांसाठी पिवळ्या रंगावर काळी अक्षरे व अंक असावेत. व्यावसायिक वाहनांच्या उजव्या व डाव्या बाजूला नंबर लिहिणे बंधनकारक आहे.

प्रवासी वाहने उदा. रिक्षा, टॅक्सी, कॅब इ. वाहनांच्या आतील बाजूस प्रवाशांना वाचता येईल असा वाहन क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

काही वेळेला वाहनावर मराठी बाण्यात देवनागरीत नंबर लिहिलेला असतो. राज्याची अस्मिता म्हणून राज्यभाषेत लिहणे ठीक आहे, पण दुसऱ्या राज्यातून आलेल्या गाड्यांची नंबर प्लेट त्या त्या राज्याच्या भाषेत असेल तर गोंधळ उडण्याची शक्यता आहे. जर देवनागरी लिपीतच नंबर लिहायचा असेल तर MH43 V2340 क्रमांक एम एच ४३ व्ही २३४०

असा लिहिला गेला पाहिजे. महा. ४३ व २३४० असा लिहिता येणार नाही. अशाप्रकारे लिहिणे बेकायदेशीर आहे. वाहनाच्या नंबर प्लेटवर काही वेळेला वेगवेगळ्या प्रकारचे नक्षीकाम केलेले आढळते. चित्रकलेचे अनेक नमुने या नंबर प्लेटवर रेखाटले जातात. नोंदणी क्रमांकाचे नक्षीकाम करून ' दादा ' सारखी अक्षरे काढली जातात. त्यासाठी ४१४१ किंवा ४७४७ हा नंबर मिळविण्यासाठी चढाओढ होते , परंतु हा नोंदणी क्रमांक सहज वाचता येईल म्हणजे प्रत्येक अक्षराचे मोजमाप दिले गेले आहे, त्यानुसार असायला हवा. त्याचबरोबर नोंदणी क्रमांकाच्या प्लेटवर कोणत्याही प्रकारचा मजकूर नको. आपल्या आवडत्या व्यक्तींची, दैवतांची नावे, आपल्या पदमानाचा उल्लेख नंबर प्लेटवर असतो. अशा प्रकारचा कोणताही मजकूर नंबर प्लेटवर लिहिणे बेकायदेशीर ठरते, त्याबरोबर नोंदणी क्रमांकाचा एखादा अंक छोटा किंवा मोठा लिहिला जातो आणि तेसुध्दा चुकीचे आहे, कारण नंबर प्लेट ही सहजासहजी लांबून वाचता आली पाहिजे, सहजासहजी म्हणजे स्वच्छ सूर्यप्रकाशात पंचवीस मीटर अंतरावर सहज वाचता येईल इतपत ती सुस्पष्ट असायला पाहिजे. त्याबरोबर मोटार वाहन नियम क्रमांक २३८ नुसार वाहनांची नंबर प्लेट नेहमी स्वच्छ ठेवणे बंधनकारक आहे.




वाहनांच्या नोंदणी क्रमांकावरून एखादे वाहन अनुचित घटनेत वापरले गेले अथवा अपघातग्रस्त झाले किंवा अपघाताला कारण झाले तरी ओळखता येते, त्यामुळे हा नोंदणी क्रमांक जर नंबर प्लेटवर योग्यप्रकारे सुस्पष्ट असेल तर यंत्रणेला ते वाहन शोधून काढता येणे शक्य होते. याबाबत कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होत नाही हे खरे आहे.

■ ■ ■

# नंबर प्लेट कशा असाव्यात .........

**वाहनांच्या ज्या नंबर प्लेट आहेत या पांढऱ्या, पिवळ्या रंगाच्या का असतात, त्या संदर्भात काही नियम असेल तर जाणून घ्यायचे आहेत. त्याचबरोबर या पाट्यांवर डिझाईन इ. काढले जाते ते कायदेशीर आहे का? याबाबत सांगा.**

कोणत्याही प्रकारचे वाहन असेल म्हणजे दुचाकी, चारचाकी व इतर कोणतेही 'वाहन' या संज्ञेत येणारे. वाहतुकीचे साधन केंद्रीय मोटारवाहन नियम १९८९ च्या नियम ५० अन्वये विहित केलेले आहे. त्यानुसार या नमुन्यात पाट्या कशा असाव्यात, यासंदर्भात माहिती दिली आहे, त्यानुसार त्या त्या रंगाची पाटी नोंदणी क्रमांकासहित सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविताना वाहनावर लावलीच पाहिजे. नोंदणी क्रमांकामध्ये वरच्या रेषेमध्ये राज्याची सांकेतिक अक्षरे व प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा सांकेतिक क्रमांक लिहिलेला असायला हवा. नंतर नोंदणी क्रमांक जो वाहन नोंदणी करताना मिळालेला असतो तो लिहिला पाहिजे.




कायद्यानुसार नोंदणी क्रमांकातील अक्षरे कोणत्या रंगाची असायला हवीत, त्याचा पृष्ठभाग कोणत्या रंगाचा असायला हवा, यासंदर्भात माहिती दिलेली आहे. आपण माहिती जाणून घेत आहात, त्यासाठी ही माहिती देत आहे. (१) खाजगी वाहने (यात दुचाकी, कार इ. येतात) यांचा पाटीवरील पृष्ठभाग हा पांढऱ्या रंगाचा असायला हवा व अक्षरे व अंक काळ्या रंगात असायला हवे. (२) व्यावसायिक वाहने (यांत ट्रक ,टेम्पो, टॅक्सी इ.) यात नोंदणी पाटीवरील

पृष्ठभाग हा पिवळा असायला हवा व त्यावरील अक्षरे ही काळ्या रंगाची असायला हवीत. (३) तात्पुरती नोंदणी केलेल्या वाहनांच्या नोंदणी क्रमांक पाटीचा पृष्ठभाग पिवळा तर अक्षरे लाल रंगाची असावीत. त्याच्याबरोबर ही वाहने वाहन विक्रेत्याच्या ताब्यात असतात. तेव्हा त्या वाहनांच्या नोंदणी पाटीचा पृष्ठभाग लाल असतो व अक्षरे पांढऱ्या रंगाची असतात. व्यावसायिक अथवा भाडोत्री वाहनांचा नोंदणी क्रमांक वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूंवरसुध्दा प्रदर्शित होणे बंधनकारक आहे. टॅक्सी, रिक्षा, बस अशा प्रवासी वाहनांना प्रवासी बसलेल्या जागेतून दिसेल अशा ठिकाणी नोंदणी क्रमांक प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

हा नोंदणी क्रमांक २५ मीटर अंतरावरून वाचता येईल इतका ठळक असायला पाहिजे, हा दंडक आहे व तो सर्व प्रकारच्या वाहनांना बंधनकारक आहे.

आपण विचारलेल्या प्रश्नात नोंदणी क्रमांक पाटीवर वेगवेगळ्या नक्षीकामाबाबत कायदेशीरपणा विचारला आहे तर त्याचे उत्तर अशा प्रकारचे नक्षीकाम नोंदणी क्रमांकाच्या पाटीवर करणे पूर्ण गैर आहे व तो कायद्याने गुन्हा आहे. कोणत्याही व्यक्तीची आपल्या आवडत्या व्यक्तीची अथवा स्वतःचेदेखील नाव नोंदणी क्रमांकाच्या पाटीवर लिहिणे गुन्हा आहे.

■ ■ ■



# हव्या असलेल्या क्रमांकासाठी

**अनेक वेळा वाहनांच्या नोंदणीच्या वेळी आकर्षक क्रमांक दिले जातात, असे वर्तमानपत्रातून वाचले आहे. हे क्रमांक नोंदणीपेक्षा जास्त पैसे आकारून दिले जातात, हे वाचनात आले आहे. असे क्रमांक कोणालाही जास्त पैसे भरून मिळतात का? त्यासाठी काही ओळख किंवा एजंट घ्यावा लागतो का? आकर्षक नोंदणी क्रमांक मिळविण्याबाबत जरा मार्गदर्शन कराल का?**

प्रत्येक वाहनाला नोंदणी करताना क्रमांक दिला जातो. अनुक्रमणिकेप्रमाणे येणारा क्रमांक देताना मोटार वाहन विभाग जादा पैसे आकारत नाही; परंतु एखाद्या वाहन नोंदणी करणाऱ्यास एखादा विशिष्ट क्रमांकच हवा असेल तर मात्र त्या विशिष्ट क्रमांकासाठी अधिकृत शुल्क भरून हवा असलेला क्रमांक राखीव करता येतो.




असा आकर्षक नोंदणी क्रमांक कोणात्याही वाहनचालकास वाहन नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी पूर्ण केल्यावर मिळू शकतो. फक्त या क्रमांकसाठी जे काही अधिकृत शुल्क आहे ते मात्र भरावे लागते. यासाठी कोणाचीही ओळख असण्याची गरज नाही. प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांच्या कार्यालयात जाऊन या संदर्भातील माहिती घेऊन आकर्षक क्रमांकाला आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करता येऊ शकते. यासाठी कोणत्याही एजंटाची आवश्यकता नाही. जर तो आकर्षक क्रमांक उपलब्ध असेल तर आपल्याला मिळू शकेल.

मोटार वाहन नोंदणीसाठी आकर्षक क्रमांक राखीव केल्यानंतर मात्र एका महिन्याच्या आत वाहनाची नोंदणी करणे आवश्यक आहे, नाहीतर एका महिन्यानंतर आकर्षक क्रमांक राखीव राहणार नाही व भरलेले शुल्कसुध्दा पुन्हा मिळणार नाही.

आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी शुल्काबाबतची माहिती पुढे देत आहे : दोनचाकी (टू व्हीलर) वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक मिळविण्याकरिता पाच हजार रुपये व इतर वाहनांकरिता १० हजार रुपये शुल्क भरावे लागते.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम ५४ अ नुसार या आकर्षक क्रमांकाची यादी केली गेली आहे. या यादीशिवाय दुसरा कोणताही विशिष्ट क्रमांक (वाढदिवसाची तारीख किंवा अंकशास्त्रानुसार हवा असलेला क्रमांक) हवा असेल तर दोनचाकी वाहनांकरिता दोन हजार रुपये तर इतर वाहनांना चार हजार रुपये शुल्क भरावे लागते; परंतु असा क्रमांक चालू नोंदणी क्रमांकापासून जास्तीत जास्त पुढील एक हजार क्रमांकापर्यंतचा असावा. फक्त वाहन नोंदणी करताना या संदर्भात जाणून घेऊन अधिक माहिती आवश्यक असल्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयातून घेणे आवश्यक आहे.

**मी पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. मी चौदा महिन्यांपूर्वी शिकाऊ (लर्निंग) लायसन्स काढले होते. तर ते मला आज वापरता येईल का? त्याला एक्सपायरी वेळ असते का?**

शिकाऊ लायसन्स प्राप्त केल्यानंतर फक्त सहा महिन्यांसाठी ते विधिग्राह्य असते. आपल्या बाबतीत ही मुदत संपली आहे. त्यामुळे आपण पुन्हा शिकाऊ लायसन्स काढावे व ३० दिवस पूर्ण झाल्यावर पक्क्या लायसन्सला अर्ज करून चाचणी देऊन पक्के लायसन्स घ्यावे लागेल. विधिग्राह्यता संपलेले लायसन्स वापरणे याचा अर्थ लायसन्स नसणे असाच होतो व लायसन्सशिवाय गाडी चालविणे हा गुन्हा आहे.

■ ■ ■

# वाहन नोंदणी

**माझी एक कार आहे व दुचाकी गाडी आहे व त्याची नोंदणी आम्ही औरंगाबादमध्येच केली आहे. परंतु दोन-तीन वर्षांत माझी महाराष्ट्रात अन्यत्र बदली होत असते. राज्यातल्या वेगवेगळ्या शहरांत गाडी चालविण्यासाठी वेगळी नोंदणी करावी लागते का? एका शहरात नोंदणी केलेली गाडी राज्यातल्या दुसऱ्या शहरात चालविणे चूक आहे का?**

आपण स्पष्ट प्रश्न विचारला आहात. त्या प्रश्नानुसारच मला आपल्याला उत्तर द्यायचे आहे. आपली दोन्ही वाहने आपण औरंगाबादमध्ये नोंदणी केलेली आहेत. परंतु, जर आपला पत्ता कायमस्वरूपी बदलणार असेल तर मात्र प्रादेशिक परिवहन कार्यालयाला कळवावे लागेल. ही वाहने जर औरंगाबादमध्ये चालणार असतील तर त्यांना औरंगाबादेतला बदललेला पत्ता परिणामकारक नाही. फक्त वापर करण्याचा पत्ता बदलावा लागेल. परंतु अन्य कोणत्याही प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अखत्यारीत आपली बदली झाली असेल, तेथे मात्र ३० दिवसांच्या आत आपण ज्या कार्यालयात नोंदणी केलेली आहे. तेथून ना – हरकत प्रमाणपत्र आपण बदली झालेल्या विभागाच्या कार्यकक्षेतील प्रादेशिक परिवहन कार्यालयात नवीन वास्तव्याच्या पुराव्यासह २९ क्रमांकाचा फॉर्म भरून दिल्यानंतर आपण आपले वाहन त्या शहरात चालवू शकाल.

वर सांगितलेला अर्ज तीन प्रतींत असतो. एक प्रत अगोदरच्या कार्यालयात, दुसरी प्रत नवीन कार्यालयात द्यावी लागते व तिसरी आपल्याकडे राहील व पत्ता बदलल्यानंतर तशी रीतसर परवानगी आपल्याला प्रादेशिक परिवहन कार्यालय देईल. या सर्वांसाठी कार्यालयात फक्त २५/- रू. फी भरावी लागते.

आपण परराज्यात, दुसऱ्या एखाद्या राज्यात नोंदणी केलेली गाडी चालविणे चूक आहे का विचारले आहे; तर त्याचे उत्तर हेच आहे की, केंद्रीय मोटार वाहन कायदा हा सर्व देशभरात लागू आहे. त्यासाठी आपल्या बदललेल्या निवासाचा पत्ता हा त्या त्या राज्यातील परिवहन विभागाची जबाबदारी असलेल्या कार्यालयात बदलला जाणे आपल्याच सोयीचे ठरते, अन्यथा आपल्या गाडीवरचा नोंदणी क्रमांक, वेगळेपण आपण लक्षात आणून देऊन वाहतूक व्यवस्था पाहणाऱ्या पोलिसांकडून विचारणा होऊ शकते. त्यासाठी अशा प्रकारची कार्यवाही आपल्याला करावी लागते, अन्यथा दिरंगाई आणि दंड या दोहोंनाही आपण पात्र ठरतो.

■ ■ ■

# परराज्यात वाहन नोंदणी आवश्यक

**परराज्यातून आलेल्या वाहनांच्या नोंदणीबाबत माहिती द्यावी.**

एका राज्यात नोंदणी केलेले वाहन एखाद्या दुसऱ्या राज्यात एका वर्षापेक्षा जास्त काळ राहणार असेल, तर ज्या राज्यात ते राहणार आहे तेथील नोंदणी प्राधिकरणाकडे (आर. टी. ओ.) नवीन नोंदणीकरिता अर्ज करणे आवश्यक आहे. ही नवीन नोंदणी करताना मूळ नोंदणी अधिकाऱ्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र लागते. त्याचबरोबर त्या वाहनावर कर्ज असल्यास संबंधित फायनान्स कंपनीचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असते. त्याच्यासोबत जी प्रमाणपत्रे जोडावी लागतात, त्याची यादी पुढीलप्रमाणे आहे:

१) मूळ नोंदणी प्रमाणपत्र (आर.सी.बुक)
२) कर प्रमाणपत्र (टी.सी. बुक)
३) मूळ नोंदणी अधिकाऱ्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र
४) चालू स्थितीतील विमा प्रमाणपत्र
५) विधिग्राह्य प्रदुषण प्रमाणपत्र
६) वाहन चोरीचे नाही व कागदपत्रे बनावट नाहीत हे घोषित करणारे वाहनमालकाचे प्रमाणपत्र
७) संबंधित नोंदणी कार्यालयातून वाहन चोरीचे नसल्याचा ना हरकत शेरा
८) नवीन वाहन खरेदी करून ३० महिन्यांच्या आत असेल तर ज्या राज्यातून ते नोंदणी झाले आहे, तेथून आपल्या राज्यात येताना प्रवेश कर भरल्याचा दाखला आवश्यक आहे. या सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यावर नोंदणी होणाऱ्या वाहनाची तपासणी केली जाते. जर त्यात काही त्रुटी नसतील तर त्याची पुनर्नोंदणी करता येते व राज्यातील नोंदणीक्रमांक देण्यात येतो.

पुनर्नोंदणी झाल्यानंतर वाहन चोरीचे अथवा बनावटीचे असल्याचे आढळून आल्यास संबंधित नोंदणी कार्यालयातून या वाहनाची नोंदणी रद्द होऊ शकते. वाहन नवीन खरेदी केले असेल अन्यथा वापरलेले वाहन कोणाकडून खरेदी करायचे असेल या सर्वांची नोंदणी आवश्यक आहे. किंबहुना कायदेशीर वाहनमालक होण्यासाठी ते आवश्यक आहे. परराज्यातून येणाऱ्या वाहनाच्या नोंदणीबाबत घाई करून उपयोग नाही. आर. टी. ओ. अधिकारी वाहनांची तपासणी करताना वाहनांचा मूळ सांगाडा (चॅसीस), मूळ इंजिन क्रमांक या कागदपत्रांची पडताळणी करून मूळ नोंदणी कार्यालयाकडून गुप्त अहवाल मागविला जातो. हा कालावधी जास्तीत जास्त ४५ दिवसांचा असतो व यात काही त्रुटी आढळल्या नाहीत तर ते वाहन नोंदणीकृत होत असते. त्यामुळे लागणाऱ्या या वेळेला विलंब न बोलता वाहनाच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेला हा कायदेशीर वेळ आहे. या दरम्यानच्या काळात ज्या राज्यात आपण वाहननोंदणी करत आहोत, तेथील रस्ता सुरक्षेचे नियम जाणून घ्यायला सुरुवात करायला हवी.

# वाहनात बदल करायचाय...

**एकदा वाहन विकत घेतल्यानंतर त्याच्यात बदल करता येतो का? कोणत्या बदलासाठी परवानगी घ्यावी लागते? तसेच इंधनात बदल करायचा असेल, तर काय करावे लागेल?**

मोटार वाहनाच्या मूळ रचनेत किंवा वाहनाचा मूळचा जो सांगाडा आहे. त्याच्या मूळ स्वरूपात फरक होत असेल तर ती मोटार वाहनातील बदल समजतात. वाहनाचे इंजिन, चॅसिस व इंधन प्रकार यामध्ये बदल करायला असला तर संबंधित नोंदणी अधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक आहे. अनेक वेळ चित्रपटात आपण पाहतो की, वेगवेगळ्या गाडयांचे पार्ट्स घेऊन एक वेगळीच गाडी बनविली जाते. खरं तर वेगवेगळ्या वाहनांचे इंजिन, चॅसिस एकत्र करून कोणत्याही मोटार वाहनाची निर्मिती करता येत नाही. एल. पी. जी. (Liquid Petroleum Gas), सी. एन. जी. (Compressed Natural Gas), बॅटरी, सौर ऊर्जा या इंधनाचा वापर नोंदणी अधिकाऱ्याच्या परवानगीनेच करावा लागेल. एलपीजी व सीएनजी किट्स हे शासनमान्य अधिकृत संस्था उदा. एआरएआय (ARAI) किंवा व्हीआरडीई (VRDE) यांच्याकडून प्रमाणित असणे आवश्यक आहे. वाहनात बदल करायचा असेल तर त्यासाठी अर्जाचा नमुना आहे, त्या अर्जाबरोबर काही प्रमाणपत्रे द्यावी लागतातः (१) वाहनावर कर्ज असल्यास फायनान्सरचे ना-हरकत प्रमाणपत्र, (२) इंजिन व चॅसिस खरेदी केल्यास बिल, (३) ज्या इंजिनात बदल करायचे त्या इंजिन व चॅसिसची मोजमापे, (४) इंजिन किंवा चॅसिस परराज्यातून आणले असल्यास प्रवेशकर भरल्याचे प्रमाणपत्र. याबरोबर योग्य ती फी भरून वाहनात बदल करण्याची परवानगी मिळवावी लागते. वाहनाच्या चॅसिसमध्ये बदल केला असल्यास त्या वाहनास नोंदणी कार्यालयाकडून प्रादेशिक चॅसिस नंबर (Regional Chassis No.) दिला जातो. असा नंबर वाहनावर पंच करून उमटविला जातो. वाहन तपासणीसाठी सादर करावे लागते. पुनर्तपासणीनंतर असा बदल ग्राह्य ठरतो. बदल केलेले नवीन इंजिन किंवा चॅसिसचे क्रमांक यांची मूळ नोंदणी प्रमाणपत्रामध्ये (R. C. Book) नोंद केली जाते. हा बदल अधिकृत समजला जातो. वाहनात अधिकृतपणे केलेला बदल कोणत्याही कायदेशीर अडचणी निर्माण करत नाही.

*आम्ही ठाण्यात राहतो. आमची सोसायटी तशी शांतच असते, पण गेल्या काही दिवसांपासून काही टवाळ तरुण मुले मोटारसायकलचे चित्रविचित्र हॉर्न वाजवत गाड्यांचा मोठा*

*आवाज करून आमची शांतता भंग करीत आहेत. या ध्वनिप्रदुषणाला आळा घालण्यासाठी काही नियम आहेत का ? काहीवेळा अधूनमधून चारचाकी गाड्यांचा मोठा आवाज होतो. याबाबत आवाजाच्या मर्यादेबाबत तक्रार कोठे करायची, याबद्दल जरा माहिती द्या.*

आपल्यासारख्या समस्या अनेकांना भेडसावत आहेत. `धूमसारख्या', `बाईक स्टंट' चित्रपटामुळे तरुणांना अशाप्रकारची हौस निर्माण झाली आहे. परंतु शांतता भंग पावते, याची जाणीव या तरूणांना करून द्यायलाच हवी.

मोटार वाहनामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनीवर कायदेशीर बंधन घालण्यात आले आहे.

आवाजाच्या मर्यादित पातळीपेक्षा वाहनांनी जास्त आवाज निर्माण केल्यास तो आवाज प्रदुषणाखाली गुन्हा ठरतो. कोणत्याही वाहनावर इलेक्ट्रिक किंवा भारतीय मानक विभाग यांनी प्रमाणित केलेल्या हॉर्नव्यतिरिक्त इतर हॉर्न वापरता येत नाही. कर्कश्श आवाज व इतर विचित्र आवाज काढणाऱ्या हॉर्नचा वापर करता येत नाही. सायलेन्सरशिवाय कोणतेही वाहन चालविता येणार नाही. ध्वनिप्रदुषण वाहनांकडून होऊ नये म्हणून नियम आहे. आपण याबाबत आपल्या भागातील वाहतूक पोलीस, आरटीओ यांना आशा प्रदूषण करणाऱ्या गाड्यांचे नंबर देऊन कारवाई करण्याची विनंती करा. आपण वाहनाच्या आवाजाची मर्यादा विचारली त्याबाबत मोटार वाहन नियम १२० (२) नुसार दोनचाकी पेट्रोल वाहने यांसाठी ८०dB, (डेसिबल-आवाजाची मर्यादा मोजण्याचे परिमाण), कार, तीनचाकी पेट्रोल वाहने, दोनचाकी डिझेल वाहने ८२dB, डिझेलवरिल जीप, हलकी परिवहन वाहने, रिक्षा ८५ dB, परिवहन वाहने (४,००० ते १२,०७० कि. ग्रॅ.वजनाची) ८९ dB, परिवहन वाहने (१२,००० कि. ग्रॅ. पेक्षा अधिक) ९१ dB.

या कमाल आवाज मर्यादा वाहनांबाबत ठरलेल्या आहेत. याचा आधार घेऊन आपण तक्रार करू शकाल.

■ ■ ■

# ब्रेक, इंडिकेटर वापरताना

**प्रत्येक यंत्राबाबत सुरक्षित राहता यावे यासाठी सूचना असतात. सुरक्षित वाहन चालविण्यासाठी काही सूचना असतील तर त्या थोडक्यात सांगा.**

वाहन सुरक्षित चालवावे यासाठी अनेक नियम आहेत. कारण वाहन एक असं यंत्र आहे, जे एकाच वेळी अनेकांच्या उपयोगी पडू शकते. तसेच इजासुध्दा पोहोचवू शकते. त्यामुळे सुरक्षेचे नियम, सुरक्षेच्या सवयी लावून घ्यायला हव्यात. काही सूचना आहेत त्याचे पालन सुरक्षित वाहनचालकासाठी उपयोगी पडू शकते. वाहन चालू करताना कोणते कपडे वापरले जातात.याकडेसुध्दा लक्ष द्यायला हवे. कमी हालचाल होईल, असे घट्ट कपडे किंवा सैलसर घोळदार कपडे यामुळे सुरक्षेचे परिमाणे मोडली जाऊ शकतात. (विशेषतः दुचाकी चालविताना) वाहनात इंधनसुध्दा तपासले गेले पाहिजे, त्यासाठी आपल्याला जेवढे अंतर जायचे, तेवढे अंतर सहज जाऊन परत येता येईल, इतक्या इंधनाची तजवीज करता आली पाहिजे.

प्रत्यक्षात वाहन चालू केल्यावर, ते चालविताना एक हात खिडकीवर किंवा गियरवर ठेवून एका हाताने स्टिअरिंग पकडणे टाळावे (चारचाकी वाहन चालकांसाठी) हॅण्डल सोडून सर्कस करण्याचे प्रयत्न दुचाकीस्वारांनी टाळावे. मोबाईलचा वापर ड्रायव्हिंग करताना केला जातो. कायद्यातून सुटका होण्यासाठी हेडफोनचा वापर केला जातो, अशा वेळी कायद्यातून सुटका होऊ शकते, परंतु अपघाताची गाठ पडू शकते. कारण मोबाईलवरील संवादाकडे आपले लक्ष केंद्रित होतेच, व एका वेळी बोलण्याच्या संदर्भातले निर्णय व वाहन चालविताना आवश्यक असलेल्या हालचालींबाबत निर्णय घेताना मेंदूची गल्लत निश्चितपणे होऊ शकते. त्यामुळे मोबाईल संभाषण व वाहन चालविणे या क्रिया एकत्रितपणे टाळणे भाग आहे. आपल्यासमोरचा वाहनचालक चूक करू शकेल या सावधतेने गाडी चालवायला हवी, त्यासाठी सुरक्षित अंतर आपल्या व पुढच्या वाहनात ठेवून आरशांचा वापर मागील वाहनाची स्थिती पाहण्यासाठी करता येऊ शकतो. रस्ता ही स्पर्धेची जागा नाही. त्यामुळे आपल्या मागचा वाहनचालक आपल्याला मागे टाकून, आपल्याला चिडवून पुढे जात असेल तर त्याला खुशाल जाऊ द्यावे.

स्वतः शांत राहावे. ज्यावेळी ओव्हरटेक करायचे असेल, त्यावेळी जरा जरी शंका आली तरी करू नये, जास्त लांबी असलेल्या वाहनांना ओव्हरटेक करताना विशेष काळजी घ्यायला हवी. मोकाट प्राणी काही वेळा रस्त्यावर फिरत असतात. त्याबाबत जास्त सावधानता हवी. कारण प्राणी लहरीपणाने आपल्या जाण्याची दिशा बदलू शकतात. आपली तब्येत बरी नसेल तर वाहन चालविणे टाळावे.

इंडिकेटरचा वापर करताना योग्य संदेश देता येईल अशा प्रकारचा इशारा दिला पाहिजे. इंडिकेटर (दिशादर्शक) दाखविण्याची एक चांगली सवय आहे. वळणाच्या वेळी, थांबण्याच्या वेळी वा इतरांना पुढे जाऊ देण्याबाबतचे इशारे, सुरक्षित वाहनचालकाला सुसंस्कृतसुध्दा बनवतात. आपल्या मागील वाहन जर वारंवार हेडलाइट देत असेल तर तो इशारा समजून त्यास पुढे जाण्यास जागा द्यावी, परंतु हे करताना समोरून जर वाहन येत असेल तर तसा इशारा मागील वाहनांना जरूर करावा. ब्रेकचा वापर जा ज्या वेळी अतिमहत्त्वाचा प्रसंग नसेल तर सौजन्याने करावा. सर्वप्रथम हळुवार ब्रेकनंतर थोडा जास्त नंतर अगदी सहजपणे ब्रेक दिल्यास गाडीत बसलेल्यांना धक्का लागणार नाही. काही वेळा वाहन अतिवेगात चालवून नंतर ब्रेक दाबून थांबवले जाते. त्यामुळे इंधन जास्त वापरले जाते. घाटात उतारावर गाडी न्यूट्रल करून चालविली जाते, त्यामुळे वाहनाची ब्रेक लागण्याची क्षमता कमी होते व त्यामुळे ब्रेकवर ताण येऊन ते निकामी होऊन दुर्घटना होऊ शकते. यासाठी ब्रेकचा वापर विशेषतः उतारावर असताना गाडी गियरमध्ये असतानाच करायला हवा. काही वेळा गाडी पाण्यातून गेल्यास (पावसाळ्यात) ब्रेकची तत्परता कमी होते; त्यामुळे पाण्याबाहेर आल्यानंतर गाडी हळूहळू दाबले की ब्रेक लागतो की नाही याबाबत अंदाज घेता येतो व ब्रेक लागेपर्यंत गाडी हळूहळू चालवत हळूहळू ब्रेक दाबण्याची क्रिया चालू ठेवायला पाहिजे.

या सर्वांबरोबरच सर्वांत मोठा ब्रेक हा मनाचा असतो. त्यामुळे सुरक्षित वाहन चालविताना सुरक्षेसाठीच्या सूचना स्वनियंत्रित पाळायला हव्यात. त्या कायद्याच्या भीतीने नाही तर स्वतःला सुरक्षित ठेवून इतरांच्या सुरक्षेसाठी पाळायला हव्यात, तसाच प्रयत्न करायला हवा आहे.

■ ■ ■

# सुरक्षित अंतर

**ओव्हरटेक करताना दोन वाहनांतील अंतर किती असावे, तसेच हे अंतर मोजण्याची काही परिमाणे आहेत का?**

अपघात घडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टींमध्ये सर्वाधिक प्रमाणात वाहनचालकांकडून घडलेल्या चुकाच जबाबदार असतात. बेजबाबदारपणे ओव्हरटेक करणे ही त्यापैकी सर्वांत मोठी चूक... असे अपघात हे समोरासमोर टकरीमुळे (Head on Collision) होत असल्यामुळे अपघातात दगावण्याची शक्यता जास्त असते. ओव्हरटेक करताना समोरच्या वाहनातील व आपल्या वाहनातले अंतर याचे भान असायलाच हवे. यात कसूर म्हणजे अपघाताची शक्यता हे समीकरणच आहे.



अनेक वेळेला वाहनाला वाहन खेटूनच चालविले जाते. त्यामुळे पुढे असलेल्या वाहनाने ब्रेक दाबल्यावर मागचे वाहन त्याला जाऊन धडकणारच. त्यामुळे त्यामध्ये सुरक्षित अंतर असणे आवश्यक आहे. कारण ब्रेक दाबल्या दाबल्या जागेवर उभे राहणारे वाहन अजून बनायचे आहे. कारण ब्रेक दाबल्यानंतर गाडी थांबण्याची एक यांत्रिक प्रक्रिया असते आणि या प्रक्रियेला लागणारा वेळ अपघात घडण्यास पुरेसा असतो. कारण ब्रेक दाबल्यानंतर वेगात असलेल्या वाहनाला थांबण्यासाठी जे आवश्यक अंतर लागते, तेवढे जर दोन वाहनांमध्ये नसेल तर मात्र अपघात टाळला जाऊ शकत नाही.

वाहनचालकाला एखादी प्रतिकूल स्थिती दिसली की आपल्या शारीरिक संदेशवहनाला म्हणजेच मेंदू ते मज्जारज्जू, त्याद्वारे पायाला आदेश मिळेपर्यंत किमान एखादा सेकंद जातो व

प्रत्यक्षात ब्रेक दाबल्यानंतर यांत्रिक प्रक्रिया घडून वाहन पूर्णपणे जागेवर थांबण्यास तीन-चार सेकंद जातात. वाहन ब्रेक दाबून थांबविण्याचा निर्णय व प्रत्यक्षात वाहन थांबणे या दरम्यानचा जो काळ आहे, त्या काळात काहीही अनुचित घडू शकते. यामध्ये वाहनाचा वेग जर जास्त असेल तर अंतर अधिक लागते. त्यातही वाहनाची ब्रेक क्षमता चांगल्या दर्जाची असेल तर हे अंतर व्यवस्थित पार पाडले जाऊ शकेल.

आपण विचारलेल्या प्रश्नात अंतर किती हे विचारले आहे. त्यामुळे अंतर काय असायला हवे हे सांगणे भाग होते. समीकरण सांगायचे झाले तर आपल्या वाहनाच्या लांबीइतके अंतर असायला हवे. उदा. आपल्या वाहनाची लांबी ४ मीटर असेल व आपण ६० कि. मी. वेगात जात असू तर (६०÷१५×४=१६ मीटर) १६ मीटर हे सुरक्षित अंतर असायला पाहिजे. आपल्याकडे अनेक वाहनचालक हे अशिक्षित आहेत. (दुर्दैवाची बाब आहे.) दुसरी गंभीर बाबसुध्दा आहे. ती म्हणजे अनेक वाहनांचे स्पीड दाखवणारे मीटरसुध्दा बरोबर काम करणारे नसते. त्यामुळे वर ज्या पध्दतीचे समीकरण आहे, जे त्यांना उपयोगी पडत नाही; परंतु अंतर मोजायला, समजायला उपयोगी पडेल असा जागतिक स्तरावर मानला गेलेला व पाळला जाणारा 'दोन सेकंदांचा नियम' मात्र सर्वांना उपयोगी पडू शकेल. दोन सेकंदांचा नियम-आपल्यापुढील समोरचे वाहन एखाद्या स्थिर वस्तूला (विजेचा खांब, झाड, मैलाचा दगड किंवा एखादा फलक) ओलांडून जाईल, तेव्हा 'एक हजार एक आणि एक हजार दोन ' म्हणेपर्यंत आपले वाहन त्या स्थिर वस्तूच्या समोर असेल तर आपण मध्ये ठेवलेले अंतर सुरक्षित समजता येईल. प्रतिकूल हवामान उदा. रात्र, पावसाळा इ. वेळी हे अंतर चार सेकंदाचे ठेवले पाहिजे म्हणजे सलग दोन वेळा 'एक हजार एक आणि एक हजार दोन ' असे म्हटले पाहिजे. या नियमाला दोन सेकंदांचा नियम म्हणण्याचे कारण असे की, आपण एक हजार एक, एक हजार दोन असे शब्द उच्चारतो, तेव्हा बरोबर घड्याळात दोन सेकंद लागतात. हा नियम ' सोनेरी नियम ' म्हणून जागतिक स्तरावर प्रसिध्द असण्याचं कारण हे की या नियमाच्या पालनामुळे दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर राहते. त्यापेक्षा जास्त अंतर असेल तरी केव्हाही चांगलेच, परंतु किमान दोन सेकंदांच्या मोजणी परिमाणाइतपत अंतर असायलाच हवे. हा नियम मात्र सर्वांना समजू शकेल असाच आहे, तर त्याची अंमलबजावणी आजपासून करायला काय हरकत आहे!

■ ■ ■

# प्रखर प्रकाशझोत


**अनेक वेळा महामार्गावर, रात्रीच्या वेळी गाडी चालविताना समोरच्या गाडीने प्रखर प्रकाशझोत वापरल्याने डोळे दिपले जातात, अशा वेळी काय करायचे ? असा प्रकाशझोत वापरणे कायद्याच्या दृष्टीने योग्य आहे का?**

आपण विचारलेल्या प्रश्नात कायद्याच्या दृष्टीने विचारलेले आहे तर त्याबाबत सांगता येईल की, प्रत्येक वाहनचालकाने दुसऱ्या कोणत्याही वाहनचालकाला त्रास होईल, असे वर्तन गाडी चालविताना करू नये, असे अभिप्रेतच आहे. वाहनचालकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमातून एक गोष्ट वारंवार मांडली जाते की, रस्त्यावर एक वाहनचालक हा दुसऱ्या वाहनचालकाचा मार्गदर्शक असतो, कारण महामार्गावर सिग्नल व इतर वाहतूक नियंत्रणाच्या बाबी तुरळकच आहेत. त्यामुळे प्रत्येक माहितीच्या बाबीसाठी वाहनचालकाला दुसऱ्या वाहनचालकावर अवलंबून राहावे लागते. तुम्ही विचारलेल्या नियमाबाबतचा प्रश्न, तर त्याचे उत्तर असे की रात्रीच्या वेळी वाहने २५ मीटर अंतरावर असताना दोन्ही चालकांनी जवळचा प्रकाशझोत वापरणे आवश्यक आहे. अनेक वाहनचालक अशिष्ट वर्तनात वाकबगार आहेत. समोरून येणाऱ्या वाहनाने प्रकाशझोत तीव्रपणे टाकल्याने विरोधी दिशेच्या वाहनाने तसाच प्रकाशझोत दाखवून परपस्परांचे डोळे दिपवल्याने झालेल्या अपघातांची संख्या अनेक आहे. त्यातील काही अपघात हे अत्यंत भीषण आहेत. काहीवेळा गाडीचे सुशोभीकरण करण्याच्या हव्यासात चार-चार हेडलाईट्स



लावले जातात, त्यामुळे समोरच्या वाहनचालकाचे डोळे दिपविण्याचा चंग बांधलेल्या वाहनचालकाची गाडी म्हणजे जीवघेणे पेटते यंत्रच म्हणायला पाहिजे. कारण प्रखर झोत वाहनचालकाच्या डोळ्यांवर पडल्यावर त्याचे डोळे दिपले जाऊन त्याला अंधारी आल्याचा भास होऊन त्याचा स्टिअरिंगवरचा ताबा सुटू शकतो. या प्रकाशझोत टाकण्यामध्येसुध्दा एकाने आपल्यावर प्रकाशझोत टाकला म्हणून त्याच्यावर प्रकाशझोत टाकून धडा शिकविण्याचा प्रयत्न केला जातो.

ही धडा शिकवण्याची वृत्ती परस्परांना घातक ठरू शकते. या संदर्भात अनेक वेळा रस्ता सुरक्षाविषयक कार्यक्रमात चर्चा झाल्या आहेत. आपल्या डोळ्यांवर अचानक प्रखर प्रकाश पडल्याने डोळे पटकन बंद होतात. प्रकाशझोतात पाहण्याचा प्रयत्न केला तरी डोळ्यांसमोर अंधारी येते. या परिणामातून बाहेर पडायला सर्वसामान्य माणसाला चार सेकंद लागतात. त्यामुळे या वेळात गाडी जर ७० किलोमीटर वेगात धावत असेल तर जवळपास ८० मीटर अंतर ती कापू शकेल. या अवधीत कोणतीही अनुचित घटना घडू शकते.



यावर एकच उपाय म्हणजे प्रखर प्रकाशझोताने डोळे दिपल्यानंतर आपल्या वाहनाची गती बंद करून वाहन रस्त्याच्या डाव्या बाजूस थांबवावे. प्रकाशझोताने डोळे दिपवण्याची सवय आपल्याबरोबरच्या वाहनचालकाची असेल किंवा कुटुंब सदस्याची, इष्टमित्राची असेल तर ही सवय सोडण्यासाठी या विषयाचे गांभीर्य त्यांना निश्चित लक्षात आणून द्यायला हवे. त्यामुळे भविष्यातील कटु प्रसंग टाळले जातील.

■ ■ ■

# रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंग......

**रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंग टाळावे का? ड्रायव्हिंग टाळता येत नसेल तर मग काय करायचं ?**

ड्रायव्हिंग रात्रीचे असेल किंवा दिवसाचे असेल, योग्य ती सावधगिरी गरजेची असतेच. बहुसंख्य लोकांना रात्री ड्रायव्हिंग करायला आवडत नाही. त्यांना त्यामध्ये धोका अधिक वाटतो. या बाबीकडे आपण एका दृष्टिकोनातून पाहिले तर आपली कामाची ठिकाणे, ऑफिस ही दिवसाच चालू असतात. त्यावेळी वाहनांची वाहतूक दिवसाउजेडी जास्त असते. परिणामतः रात्री वाहनांची रहदारी कमी असते, म्हणजे २० ते २५ टक्क्यांपर्यंतच असते; परंतु असं असतानासुध्दा अपघाताचे प्रमाण आपल्याला दिवसा होणाऱ्या अपघातांपेक्षा रात्रीचे जास्त आढळून येते. याला अनेक कारणे आहेत. त्यामध्ये ड्रायव्हरचा दृष्टिदोष हेसुध्दा मोठे कारण असू शकते. त्याचबरोबर रात्रीच्या ड्रायव्हिंगच्या वेळी आपले मानसिक व शारीरिक ताजेतवानेपणसुध्दा महत्त्वाचे आहे. कारण ड्रायव्हिंग करताना आवश्यक असलेला ताजेतवानेपणा आपल्यात नसेल, थकवा-आळस असेल तर मात्र त्या वेळी केलेल्या ड्रायव्हिंगमुळे समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे रात्रीचे ड्रायव्हिंग पर्याय असेल तर टाळलेले चांगलेच; परंतु अत्यावश्यक काम असेल तर मात्र ते काम रात्रीचे ड्रायव्हिंग करून करायला काही भीती न ठेवता करायचे. फक्त काही आवश्यक काळजी मात्र घ्यायची.



रात्रीचे ड्रायव्हिंग करताना समोरून येणाऱ्या वाहनाच्या हेडलाईटकडे मात्र कधी पाहायचे नाही. त्यामुळे आपले डोळे दिपून आपला स्टिअरिंगवरचा ताबा सुटू शकतो. त्यामुळे आपल्या वाहनाच्या हेडलाईटचा प्रकाश रस्त्यावर जेथे पडतो, तेथे आपली दृष्टी असायला हवी. रस्त्याची डावी बाजू पाहून, डाव्या कडेचा अंदाज घेऊन आपण वाहन चालवायला हवे. समोरील वाहनाचा ड्रायव्हर आपल्या वाहनाच्या प्रकाशझोतामुळे दिपून जाऊ नये म्हणून वाहन २५ ते ३० मीटर अंतरावर असताना आपल्या वाहनाचा प्रकाशझोत खाली ठेवावा. काही वेळा 'इगो' प्रॉब्लेममुळे एकमेकांवर थेट प्रकाशझोत टाकले जातात, पण अशा वेळी लक्षात घ्यायला हवे की, समोरच्या वाहनाच्या ड्रायव्हरचे डोळे दिपले तर आपल्यालाच त्याचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे रस्त्यावर इगो टाळायला हवा. सर्वांत सोपी गोष्ट रात्रीच्या ड्रायव्हिंगच्या वेळी करायची म्हणजे वाहनाच्या समोरील काच स्वच्छ ठेवावी. त्यासाठी वायपर व पाणी याचा वापर करावा. प्रवासाला सुरूवात करताना काच स्वच्छ पुसून घ्यावी. रात्री ग्रामीण भागातून प्रवास करताना एक गोष्ट अजून लक्षात ठेवायची, ती म्हणजे काही वेळा समोरून येणाऱ्या वाहनाची एक हेडलाईट दिसते, त्यावरून ते वाहन मोटार सायकल वाटते; परंतु हा अंदाज चुकीच्या पद्धतीने लावल्याने अनेक अपघात झाले आहेत. त्यामुळे हेडलाईट बिघडलेला व एकच हेडलाईट चालू असलेले वाहन ट्रक-कार काहीही असू शकते. रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंग करताना झोप येते असे वाटले तर गाडी सुरक्षित ठिकाणी उभी करून अर्धी झोप काढून पुढे इच्छित स्थळी जाणे केव्हाही चांगले. कारण स्टिअरिंगवरील एका डुलकीने पुढचा प्रमाद घडू शकतो. त्यामुळे झोप उडविण्याचा प्रयत्न करूनही झोप उडत नसेल तर झोप घेण्याचा प्रयत्न चांगला; परंतु वाहन सुरक्षित जागी घेऊनच. रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला काही कारणामुळे वाहन थांबवायला लागले तर आठवणीने आवर्जून वाहनाची पार्किंग लाईट लावायला पाहिजे. योग्य ती काळजी व सुरक्षेचे नियम व सूचनांचे पालन केले तर रात्रीचे ड्रायव्हिंग समस्या निर्माण करणार नाही.



■ ■ ■

# ओव्हरटेकींग = अपघात ?

***मी अनेक वर्षे ड्रायव्हिंग करतो. अनेक वेळा मी अपघात 'ओव्हरटेकिंग 'करण्यामुळे झालेले पाहिले आहेत. या ओव्हरटेकिंगबद्दल काही नियम किंवा सूचना आहेत का? दुसरा प्रश्न असा की, वाहनांची वेगमर्यादा किमान / कमाल किती असावी याबाबत काही नियम आहेत का?***

तुमचं निरीक्षण योग्य आहे. ओव्हरटेकिंगबाबत निम्म्या पेक्षा अधिक ड्रायव्हर चुका करताना आढळतात व अशा अपघातात समोरून धडक बसल्यामुळे अनेकजण दगावतात. हे होऊ नये म्हणून परिवहन विभाग, परिवहन विभागाचे अधिकारी अनेक पुस्तके – लेख प्रसिध्द करतात. ओव्हरटेकिंग करताना कोणती काळजी घ्यायची याबाबत त्या संकलित माहिती-नियमांचा वापर करून सांगता येईल.

- ओव्हरटेक करताना तो फक्त उजव्या बाजूनेच करायचे. जर पुढील ड्रायव्हर उजवीकडे वळणार असेल, वळत असेल तर मात्र ते करायचे नाही.
- ओव्हरटेक करताना समोरील वाहन किती अंतरावर आहे, याचा अचूक अंदाज घ्यायला हवा. ओव्हरटेक करावे की नाही अशी द्विधा मन:स्थिती असेल तर ओव्हरटेक करूच नये.
- ज्या वाहनाला ओव्हरटेक करायचे आहे, त्याच्या लांबीचा, वेगाचा अंदाज घ्यायला हवा. कारण काही वाहने लांबलचक असल्यामुळे त्यांच्या पुढे जाण्यास जास्त वेळ लागतो. हा अंदाज अचूक घेता आला पाहिजे.
- जिथे ओव्हरटेक नको असे चिन्ह असेल अशा ठिकाणी ओव्हरटेक करू नये. उदा. डोंगरमाथा, अरूंद पूल, काही ठिकाणी रस्त्यावर सलग पांढरा किंवा पिवळा पट्टा मारला असेल अशा ठिकाणी.
- ओव्हरटेक करायचे त्या वाहनचालकाला सावध करून किंबहुना ओव्हरटेक हा आपल्या बाजूच्या, पाठच्या, समोरच्या वाहनाशी हाताने, लाईटने, हॉर्नने संवाद साधून करायला हवे.

- ज्या वाहनाला ओव्हरटेक करायचे आहे ते वाहन आरशात दिसेपर्यंत त्या वाहनाला पुढे आपल्या लेनमध्ये आणायचे नाही. याचा परिणाम असा होतो की, ज्या वाहनाने आपल्याला ओव्हरटेक करायला दिले आहे, त्याच्याच पुढे गाडी ओव्हरटेक करून डावीकडे लगेच आणली जाते. त्यामुळे पुढे जाऊ दिलेले वाहन, पुढे जाऊ देणाऱ्या वाहनाला समस्या निर्माण करून प्रसंगी अपघात घडवून आणते.
- काही ठिकाणी काही रस्ते डावीकडून मुख्य रस्त्याला मिळतात, अशा ठिकाणी ओव्हरटेक करू नये. कारण त्यामुळे रस्त्याने येणारे वाहन दिसणार नाही व अपघात होण्याची शक्यता निर्माण होईल. नियम व सूचनांबरोबर व्यक्तिगत सुधारणा, विचारसुध्दा महत्त्वाचा आहे. आपल्याला ओव्हरटेक केलेल्या वाहनाला अहंपणाने ओव्हरटेक करण्याचा विचार झटकायला हवा. आपल्यापुढे जाणारा ड्रायव्हर आपल्यापेक्षा श्रेष्ठ का ? असे वाटून घ्यायला नको. कारण ड्रायव्हिंग करताना 'विवेक' हा सद्‌गुणच महत्त्वाचा आहे. प्रत्येक अपघात आपल्या स्वतःच्या चुकीने होतो असं नाही. बहुतांश वेळी तो दुसऱ्याच्या चुकीने होतो. त्यामुळे दुसरा चुकी करेल या कल्पनेने वाहनचालन करणे, ओव्हरटेक करणे महत्त्वाचे आहे. आपण विचारलेल्या वेगमर्यादा प्रश्नाबाबत सांगता येईल की, कायद्याने वाहनवार वेगमर्यादा ठरवून दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे:
  - हलके वाहन (कार, जीप) – ठरावीक अशी मर्यादा नाही.
  - दुचाकी वाहन – ५० ताशी कि. मी.
  - टॅक्सी – रिक्षा – ६५ ताशी कि. मी.
  - अवजड वाहने – ६५ ताशी कि. मी.
  - टेम्पो / प्रवासी बस – ६५ ताशी कि. मी.
  - ट्रक / ट्रेलर वाहन – ५० ताशी कि. मी.

कायद्याने वेगमर्यादा जरी ठरली असली तरी वेगमर्यादा आजूबाजूची परिस्थिती यानुसारच ठरवली पाहिजे.

■ ■ ■

# पावसाळ्यात गाडी चालविताना...

**सहा महिन्यांपूर्वीच गाडी चालवायला शिकलो आहे व मुंबई-ठाण्यात मारूती झेनने प्रवास करतो. माझ्या गावी रायगड जिल्ह्यातसुध्दा जातो. परंतु आता पावसाळा जवळ आला आहे. तसा गाडी चालविण्याचा हा पहिलाच पावसाळा. तर मला आपल्याकडून मार्गदर्शन हवंय की, पावसाळ्यात गाडी चालविताना कोणती काळजी घ्यावी ?**

पावसाळ्यात गाडी चालविण्यासंदर्भात ज्या काही काळजी घ्यायच्या गोष्टी आहेत, त्या तुम्हांलाच नाही तर सर्वांसाठी आहेत. अगदी निष्णात ड्रायव्हरलासुध्दा. कारण चूक कोणी केली ? नवख्या ड्रायव्हरने की सराईत, हा प्रश्न अपघात घडताना विचारला जात नाही. त्यामुळे दक्षता सर्वांनीच घ्यायला पाहिजे. सर्वसाधारण पावसाळ्यातच जास्त अपघात होतात, हा समज तितकासा खरा नाही. कारण हे अपघात पावसाळ्याच्या सुरूवातीलाच जास्त घडतात. पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद सर्वांना हवासा वाटतो. परंतु वाहनचालकांच्या दृष्टीने पहिल्या पावसातला हलगर्जीपणा धोकादायक ठरू शकतो. पावसाच्या अगोदर रस्त्यावर सांडलेले ग्रीस, ऑईल, चिखल यांच्या निसरड्या मिश्रणाने वाहन घसरण्याची शक्यता असते. रस्ता ओला व निसरडा झाल्याने जोरात ब्रेक दाबला किंवा स्टिअरिंग अचानक हलवून ॲक्सिलेटर वाढविल्यास वाहन घसरते. त्यामुळे पावसाळ्यात दोन गाड्यांच्या मध्ये अंतर ठेवावे. ते नेहमीच ठेवावे, पण पावसाळ्यात जास्त ठेवावे. कारण ब्रेक दाबल्यानंतर गाडी थांबायला थोडा अवधी लागतो. गाडीच्या समोरील काचेवरही दव जमा झाल्याने अंधुक दिसते.

गाडी पावसाळ्यात घसरते आहे असे दिसत असेल, तर ज्या रस्त्यावरून जाताना ज्या दिशेने वाहन घसरते त्याच दिशेला स्टिअरिंग फिरवा. जर उजव्या बाजूला घसरत असेल तर उजव्या बाजूला, परंतु हे त्वरितच. याबाबत तज्ज्ञ ड्रायव्हरचा सल्ला निश्चितच घ्या. मुसळधार पाऊस दिवसा पडत असेल, तेव्हा हेडलाईटचा वापर दिवसासुध्दा करावा. पावसाळ्यात रस्त्यावरून जाणाऱ्या पादचारी, दुचाकीस्वार, सायकलस्वार यांची काळजी घ्यावी. कारण पावसात भिजण्यापासून वाचण्याच्या विचारात ते वाहनासमोर अचानक येऊन अपघात घडू शकतो याची

दक्षता घ्यावी. त्यासाठी पावसाळ्यात गाड्यांचा वेग मर्यादित व संतुलित ठेवावा. त्याचबरोबर रस्त्यावरील खडड्े, गटारांची उघडी तोंडे यांत गाडीचे चाक अडकू शकते. त्याची काळजी घेत मुख्य रस्त्यापासून वाहन रस्त्याच्या कडेला फुटपाथच्या बाजूने चालवू नये.

पावसाळ्यात शहरात पाणी साचणे किंवा महामार्गावरून जाताना नदी-नाल्यांना पूर येणे किंवा पुलावरून पाणी जाणे या प्रसंगांना तोंड द्यावे लागते. त्यावेळी अनेक प्रकारची दक्षता घेऊन वाहन चालवायला हवे. उदा. पुलावरून पाणी वाहत असेल व 'गार्डस्टोन' सुध्दा पाण्यात बुडाला असेल तर या पाण्यातून गाडी न चालविणे स्वतःच्या जीविताच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. एरवीसुध्दा पाण्याच्या खोलीचा अंदाज घेऊन वाहन सुरक्षित जाईल याची काळजी घ्यायला हवी. गाडीच्या सायलेन्सरमध्ये पाणी शिरल्यावर इंजिन बंद पडते, ते टाळण्यासाठी ॲक्सिलेटर थोडा दाबून ठेवायला पाहिजे व त्यावेळी वाहन वेग रोखण्यासाठी क्लच दाबून ठेवायला हवा. पाण्यात वाहन नेण्यापूर्वी शक्यतो पहिल्या गियरमध्ये ठेवून पाण्यात वाहन असताना गियर न बदलण्याची दक्षता घ्यायला हवी. वाहन पाण्यातून बाहेर आल्यावर हळूहळू वारंवार ब्रेक दाबला की ब्रेक लायनर व ड्रम यांच्यामधील पाण्याचा निचारा होऊन ब्रेक परत सुस्थितीत येऊ शकतील. पावसाळी वातावरणात काही ठिकाणी मोठया प्रमाणात धुक्याचे वातावरण तयार होते. अशा ठिकाणी रस्त्यावरून जाताना वाहनाचा वेग कमी करून फॉग दिव्यांचा (सर्वसाधारण हेडलाईटने धुक्यात दिसत नाही) वापर करावा. या दिव्यांच्या उजेडाने धुक्यात गाडी रस्त्यावरून चालवणे शक्य होते. या सर्व दक्षतेबरोबरच पावसाळ्यात रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून काही वेळा हेतूपुरस्सर पादचारी, दुचाकीस्वार यांच्यावर पाणी उडविण्याचा प्रकार काही वाहनचालक करतात, तोसुध्दा निंदनीय आहे. असं न करण्याची जबाबदारी सूज्ञ वाहनचालक घेतातच, पण जर ती कोणी घेत नसेल तर ती घेण्याची गरज आहे. या दक्षतमुळे मग सर्वार्थाने सर्वांनाच पावसाळ्याचा आनंद मनमुराद लुटता येईल.



■ ■ ■

# पावसाळ्यातले अपघात टाळण्यासाठी

**पावसाळ्यात अपघात जास्त घडतात का? दिवसभरात अपघात कोणत्या काळात होऊ शकतात? त्यामागे काही कारणे असतील तर सांगा म्हणजे जागरूक राहता येईल.**

पावसाळ्यात 'अपघात' होण्यास कारण ठरणारी परिस्थिती काही प्रमाणात असते; परंतु पावसाळ्यात अपघात जास्त होत नाहीत, असा समज अनेकांच्या मनात आहे, जो चुकीचा आहे. कारण 'अपघात' घडतो, तेव्हा अनेक कारणे जबाबदार असतात. मुळातच अपघात बहुतांशी प्रमाणात कोणत्याही प्रकाराने होतात, हे पाहिले तर त्याची कारणेसुध्दा लक्षात येऊ शकतील. काही वेळेला वाहन अचानक पेट घेते, उलटते किंवा वाहन घसरते असा अपघात



वाहनाला होतो. यात पुन्हा हा अपघात का झाला याची वेगळी कारणमीमांसा करता येते. दोन वाहनांची परस्पर समोरासमोर टक्कर होते (Head on Collision), तर काही वेळा एखादे वाहन दुसऱ्या वाहनाला मागून धडक देते (Rear End Collision). दोन वाहनांच्या बाजू परस्पर एकमेकांना घासल्याने होणारी धडकसुध्दा (Sidewise Collision) अपघातांना कारण ठरते. हे झाले दोन वाहनांच्या बाबत. वाहनाची धडक पादचाऱ्याशी होऊनसुध्दा अपघात होतो, तर काहीवेळा वाहन ही धडक विजेचा खांब, भिंत, कधीकधी पुलाचे कठडेसुध्दा वाहनांची धडक लागून तुटतात आणि वाहनालासुध्दा इजा पोहोचते. अपघातांच्या या प्रकारात आपण पाहिले तर प्रत्यक्षात पाऊस कोठेही कारणीभूत ठरत नाही. किंबहुना अपघात घडण्यास एकमेव कारणच असू शकेल, असंसुध्दा नसते.

पावसाळ्यात अपघात होतात याची काही कारणे आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर वाहतुकीमुळे येणारी धूळ. कच्च्या रस्त्यावरून पक्क्या रस्त्यावर आल्यावर टायरला लागलेली

धूळ यामुळे मुख्य रस्त्यावर चिखल होतो. हा चिखल रस्त्याच्या बाजूला साईड पट्टीवर जमा होतो. या चिखलामुळे वाहनाने ब्रेक दाबला तर तो कमी क्षमतेने लागतो व वाहनांची त्यामुळे घसरण होते व ड्रायव्हरचा स्टिअरिंगवरील ताबा त्यामुळे सुटतो. मग अपघात होण्याची शक्यता निर्माण होते. वाहनांचे टायर गुळगुळीत झालेले असतील तर अशाप्रकारचे अपघात पावसाळ्यात खात्रीने होतातच.

आपल्याकडे तिन्ही ऋतूंत अपघात होतात. ते जास्त पावसाळ्यात होतात असे नाही. कारण पावसात ज्या कारणामुळे अपघात होतात, तसेच हिवाळ्यातसुध्दा धुके साठल्यामुळे समोर चालणाऱ्या वाहनाचा वेग व अंतर याचा अंदाज लवकर व अचूक येत नाही. रस्त्यावर दव पडल्यामुळे रस्त्यावर वाहन घसरण्याची शक्यता वाढते त्यातही धुक्यात फॉग लाईटशिवाय वाहन चालविल्याने अपघाताची संख्या वाढते.

उन्हाळ्यात जेथे डांबरी रस्ते आहेत, तेथे रस्त्यावर डिझेल ऑईल पडल्यामुळे अतितापमानामुळे डांबर वितळून घसरण निर्माण होते आणि वाहनाच्या घसरणीची शक्यता वाढते. यात जर वाहन अशा रस्त्यावर वेग मर्यादित न ठेवता चालत असेल तर अपघात होतात. थोडक्यात सांगायचे तर पावसाळाच नाही; तर अपघात कोणत्याही ऋतूत होण्याची कारणं थोडीफार वेगळी असतात एवढेच.

आपण विचारलेल्या प्रश्नामध्ये दिवसाच्या कोणत्या काळात अपघात होतो, याचे उत्तर आहे रात्रीच्या काळात! रात्रीच्या वेळेत वाहतूक कमी असूनसुध्दा अपघात होण्याची टक्केवारी जास्त असते. रात्रभर प्रवास करून दिवसभर काम करता येईल किंवा रात्रीत झोपेत प्रवास करून वेळ जाईल, अशा प्रकारची वृत्ती त्यामागे असते. त्यामुळे वाहनचालकाला जागरण, त्याला झोप न मिळणे, त्यात वाहनांच्या दिव्याचा प्रकाश यामुळे रात्रीच्या अपघातांची संख्या वाढते. त्यामुळे रात्रीचा प्रवास टाळणेच सोयीचे ठरते. सकाळ-संध्याकाळ या दरम्यानच्या काळात प्रकाश-अंधार असा संधिप्रकाश असतो, तेव्हासुध्दा वाहनचालकाचा अंदाज चुकतो व अपघात होतात. दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान जेवणामुळे येणाऱ्या सुस्तीमुळे वाहनावरचे नियंत्रण उडाल्यामुळे अपघाताची शक्यता वाढते. दिवसाच्या चोवीस तासांच्या काळात अपघात होण्याची कारणे चर्चा केलेली आहेत. त्याकडे लक्ष दिले तर अनेक अपघात थांबवले जाऊ शकतात. त्यासाठी जागरूक राहायलाच हवे.

■ ■ ■

# वेगाशी स्पर्धा टाळावी

**बहुसंख्य विदयार्थी, तरुण मंडळी बेफामपणे दुचाकी चालवितात. त्याबाबत मार्गदर्शन व नियमांबाबत माहीती द्यावी.**

दुचाकी स्वारांबाबत अनेक वेळा प्रश्न निर्माण होत असतात. त्यात वाहनांच्या गर्दीतून वाट काढणारे, वेगाशी स्पर्धा करणारे इ. अनेकजण आढळतात. परंतु रस्ते अपघाताच्या संख्येकडे लक्ष दिले तर दुचाकीस्वारांचे अपघात जास्त प्रमाणात घडत असतात. याचे कारणही तसेच आहे.दुचाकीस्वाराच्या शरीराला कसलेच संरक्षण नसते, त्यातही हेल्मेटचा वापर करण्याचा कंटाळा केला तर संपूर्ण शरीराचा कोणताही भाग अपघातामध्ये दुखावू शकतो. चारचाकी वाहनांमध्ये तोल सांभाळण्याचा प्रश्न नसतो. त्याचबरोबर चारचाकी वाहनांमध्ये शरीराला पुरेसे संरक्षण मिळालेले असते. विशेषतः शहरात दुचाकी अपघाताचे प्रमाण इतर वाहनांच्या अपघातांपेक्षा अनेक पटीने जास्त आहे आणि या अपघातात दगावण्याची शक्यताही अधिक आहे.



यामुळे दुचाकीस्वारांनी नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. अपघाताला कारण ठरणाऱ्या अनेक गोष्टी टाळायला हव्यात. बसण्याच्या स्थितीपासून गाडी चालिविण्याच्या पध्दतीपर्यंत त्याचबरोबर वाहतुकीचे संकेत न पाळणे यासंदर्भात लक्ष पुरविले पाहिजे, काही नियम व माहिती त्याचबरोबर जास्त वेगाने वाहन चालविल्याने शरिरातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन डीहायड्रेशन होऊ शकते. त्यासंदर्भात काही थोडक्यात मुद्दे मांडत आहे. मुळात दुचाकी वाहनचालकाच्या बसण्याच्या स्थितीपासून सुरुवात करायला हवी. अनेकजण पाठीला कुबड काढून पाय फाकवून किंवा एका बाजूला जास्त भार देऊन बसतात. या अशा बसण्याने मानेचे, पाठीचे व माकडहाडांच्या सांध्याचे विकार उद्‌भवतात. त्यामुळे पाय शरीराच्या जवळ ठेवून पाठीचा कणा ताठ ठेवून दुचाकीस्वाराने

नेहमी गाडी चालविताना बसायला हवे. रात्रीच्या वेळी प्रवास करायचा असेल, विशेषतः महामार्गावरून प्रवास करायचा असेल तर रात्री गाडीच्या दिव्यांच्या प्रकाशात सहज दिसू शकतील असे कपडे घालावे. त्यामुळे अन्य वाहनांना दुरून समोरून येणारा-जाणारा दुचाकीस्वार दिसण्यास मदत होऊ शकेल. महिला काही वेळा पंजाबी ड्रेस व ओढणी अथवा काही पायघोळ कपडे घालून दुचाकी चालविणार असतील तर ओढणीची गाठ मारून अथवा आपले पायघोळ कपडे गाडीच्या चाकात अडकणार नाहीत, याची काळजी घेऊनच बसायला हवे. दुचाकीस्वारांनी वेगावर नियंत्रण ठेवायला हवे. कारण अनियंत्रित वेग हा अपघाताला पूर्णपणे कारण ठरू शकतो. दुचाकी वाहनांसाठी कायद्याने निर्धारित केलेली वेगमर्यादा जास्तीत जास्त ताशी फक्त पन्नास किमी आहे. त्यामुळे वेगाची मर्यादा ओलांडून कायद्याचे उल्लंघन होऊ शकते.



वेग नियंत्रणाबाबतची ही माहिती आवश्यक आहे. दुचाकी चालविताना रस्त्यावरील येणाऱ्या वळणांचा अंदाज घेऊन गाडी चालिविणे महत्त्वाचे आहे. वळणांवर अपघात होऊन अनेकांनी आपले प्राण गमावले आहेत. वळणांवर नियंत्रित वेग ठेवून शक्यतो गाडी हळू चालवावी व पुढच्या गाडीला मागे टाकायचा मोह टाळावा, दुचाकी वाहन चालकांना ब्रेक दाबून थांबायचे असेल अथवा वेग कमी करायचा असेल तर दोन्ही चांकाचे ब्रेक्स् एकाच वेळी दाबावे. फक्त मागच्या ब्रेकचा वापर करण्याची सवय धोकादायक ठरते. त्यामुळे वाहन घसरू शकते. ब्रेक कधीही जोरात करकचून न दाबता ब्रेकवरील दाब हळूहळू वाढवत ते दाबावे. दुचाकीला आरसा साडीगार्ड, मडफ्लॅप या कायद्याने बंधनकारक आहेत. त्या लावून घेतल्या पाहिजेत. त्याचबरोबर टायर झिजले असतील तर ते बदलावेत. कारण दुचाकीसाठी गुळगुळीत टायर फार धोकादायक आहेत. हेल्मेटचा वापर कंटाळवाणा असला तरी करणे महत्त्वाचे आहे. अखेर दुचाकीस्वारांनी आपल्या जीविताची काळजी घेऊन सुरक्षित प्रवास करणे महत्त्वाचे आहे.

■ ■ ■

# महामार्गावर अपघातांचे प्रमाण जास्त का?

**महामार्गावर अपघात जास्त होतात, यासाठी काही ठरावीक कारण आहे का? शहरातल्या अपघातांत सुध्दा वाढ होत आहे. त्यामागची काही कारणे, त्रुटी याबाबत सांगा.**

महामार्गावर जास्त अपघात होतात, ही तुमची माहिती बरोबर आहे; परंतु तुम्ही जी कारणे विचारली ती काही सांगता येणार नाहीत. कारण महामार्गावरचे अपघात वेगवेगळ्या परिस्थितीत घडतात. यामागचे कारणच सांगायचे तर बहुतांश अपघातांमध्ये ते सांगितले जाते ते म्हणजे 'बेपर्वा चुका'. महामार्गावर मोकळा रस्ता मिळाल्यावर मोकळे अंगण मिळाल्यासारखे चालक गाडीचा वेग वाढवतो. ॲक्सिलेटरवरचा दाब वाढवतो. मग तो अतिवेगाने इच्छित स्थळी जाण्याऐवजी धोक्याच्या ठिकाणी जातो. एकदा का वेगावरचे नियंत्रण गेले की त्यानंतर छोटीशी चूक, गाडीत होणारा अचानक बिघाड ओव्हरटेकिंग करताना केलेली घाई, स्टिअरिंगवरचा ताबा सुटणे अशा कोणत्याही कारणांनी वा अन्य कारणांनी अपघात घडून येतो. त्यामुळे महामार्गावर बेपर्वा चूक टाळणे म्हणजे वेगावर नियंत्रण ठेवून लक्षपूर्वक गाडी चालविणे. समोरून येणारी गाडी आपल्या पुढची-मागची गाडी अपघात करू शकेल इतपत प्रसंगी सावधानता बाळगली तर महामार्गावर अपघातांची संख्या कमी होईल व त्यामागची कारणेसुध्दा उद्‌भवणार नाहीत. महामार्गावर होणाऱ्या अपघातांकडे प्रत्येक व्यक्तीने लक्ष द्यायची गरज आहे. कारण महामार्गावरील अपघातांची वाढणारी संख्या चिंताजनक आहे. आपल्या देशात रस्त्यांची लांबी लक्षात घेतली



तरी महामार्गावरील अपघातांचा वाटा लक्षणीय ठरेल. काही वेळा महामार्गावरील खड्डे व महामार्ग बांधताना योग्य दक्षता घेतली गेली नाही असे सांगितले जाते; परंतु अतिशय खाच-खळगे असलेले महामार्ग आता जवळपास नाहीतच, तरी अपघातांचे प्रमाण वाढलेलेच आढळून येते. त्यामुळे योग्य त्या नियमांचे पालन करून गाडी सावधतेने महामार्गावर चालवणेच महत्त्वाचे आहे.

शहरांतील अपघातांच्या वाढीबाबत व त्यामागील अनेक त्रुटींबाबत आपण अनेकदा चर्चा, सुध्दा करतो ते म्हणजे रस्त्यावर पादचारी चालतात, फुटपाथवर विक्रेते बसतात, मग गाड्या कोठून जाणार ? अशा वेळेला गाड्यांचा धक्का पादचाऱ्याला लागून अपघात होणे, गाड्यांच्या गर्दीत अंदाज न आल्याने वाहने एकमेकांना धडकणे, त्याचबरोबर मोटार-सायकल, रिक्षा यांचे नियमांचे पालन न करता चालविणे, मोटारसायकल चालविताना हेल्मेटचा वापर न करता चालविणे यामुळे तर किरकोळ अपघातसुध्दा जिवावर बेततात. बेदरकारपणे मोटारसायकल चालविणे, मोटारसायकल चालविताना निरनिराळे हातवारे व मस्ती करणे हे प्रकार अपघाताला कारणीभूत ठरतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसांठी म्हणून हे विस्तृतपणे सांगितले आहे. हे तुम्ही आपल्या मित्रमंडळींना सांगावे ही अपेक्षा आहे. महानगरपालिका, नगरपालिका वाहतुकीला योग्य ठरतील अशा बाबींकडे दुर्लक्ष करताना दिसतात. उदा. रस्त्यावर दिव्यांचा प्रकाश नसणे, फुटपाथ नसणे, रस्त्यावरील अतिक्रमणे जोपासणे इ. कारणांकडे लक्ष दिल्यास शहरातील अपघातसुध्दा कमी होतील. त्याचबरोबर लोकशिक्षणसुध्दा गरजेचे आहे. हे तुम्ही युवा मंडळी चांगले करू शकाल.



■ ■ ■

# अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी

**प्रवास करताना रस्त्यावर अनेक वेळा आपण अपघात पाहतो. त्या अपघातात जखमींना वेळेवर उपचार मिळाले तर अनेकांचे प्राण वाचू शकतात हे माहीत असूनसुध्दा त्या जखमींना मदत करायला मन घाबरते. कारण माणुसकी दाखवायला गेलो तर पंचनामा, साक्ष इत्यादी गोष्टींचा ससेमिरा लागतो. जखमींना मनापासून मदत करणाऱ्यांना आपण काय सल्ला द्याल?**

जखमींना मदतकरायला आपल्याला माणुसकी, गहिवर आठवतो हे एका सूज्ञ नागरिकाचे लक्षण आहे. आपण ज्यामुळे ससेमिरा लागतो असं सांगताय त्या प्रकारची वस्तुस्थिती आता नाही.



आपल्या विचाराच्या अनेक नागरिकांना हा प्रश्न पडत होता. अनेक खटल्यांतून हा प्रश्न समोर आला होता की, जखमींना उपचार अगोदर द्यायचे की पोलीस पंचनामा इत्यादी औपचारिकता अगोदर करायच्या? या संदर्भात सुप्रीम कोर्टाच्या माननीय न्यायधीशांनी एका निकालाद्वारे स्पष्ट केले आहे. न्यायाधीश रंगनाथ मिश्रा व जी. श्री. ओझा (रिट पिटिशन १९८९/ए.आय.आर. २०३९) यांनी निकालात स्पष्ट केले आहे की, अपघातग्रस्तांना वैद्यकीय मदत मिळणे याला सर्वांत अगोदर प्राधान्य द्यावे. पोलीस पंचनामा किंवा इतर औपचारिकता पार पाडण्यासाठी वेळ दवडण्याची गरज नाही. जखमींना वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी निव्वळ औपचारिकता बाळगण्याची गरज नाही, असे सुप्रीम कोर्टाने निकालात स्पष्ट करताना डॉक्टरांनीसुध्दा अपघातग्रस्त व्यक्तींना / जखमींना रूग्णालयात दाखल करून घेताना अथवा त्यांना वैद्यकीय सुविधा पुरविताना औपचारिकतेचा आग्रह सोडावा, असे नमूद केले आहे. त्यामुळे एखाद्या जखमीला वेळेवर उपचार मिळून त्याचे प्राण वाचवण्यास

मदत या निकालाने मिळाली आहे. याचे कारण हे आहे की, अपघातात जखमी झालेल्यांना अपघात झाल्यानंतर पहिल्या तासात मिळालेली मदत अपघातग्रस्त रूग्णाला अत्यवस्थ होण्यापासून वाचवू शकते.

आपण विचारल्याप्रमाणे आपल्याला ज्यावेळी अशा प्रकारचा अपघातग्रस्त रूग्ण दिसलाच तर आपण त्यासाठी निश्चित त्याला मदत करा. हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. केवळ कायद्याची अथवा कायदेशीर बाबींना भीती अथवा अडथळा वाटत असेल तर ते तसं नाही. कारण सुप्रीम कोर्टाने उपरोल्लेखित नियमांमुळे तुम्ही जखमींना मदत केल्याने तुम्हाला पोलीस स्टेशनला फेऱ्या मारण्याची अथवा कोर्टात साक्षीला जाण्याची आवश्यकता भासणार नाही. आपल्या वाहनाने चुकून जर कोणा व्यक्तीला अपघातग्रस्त बनवले तरी त्या अपघातग्रस्त व्यक्तीला योग्य ती वैद्यकीय मदत देऊन ताबडतोब जवळच्या पोलीस स्टेशनला खबर दिली पाहिजे. रस्त्यावरील होणाऱ्या अपघातांमुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने बळींची संख्या वाढते आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय अनेकांचे प्राण वाचवू शकेल. त्याचबरोबर आपण नागरिकांनीसुध्दा आपल्या नागरी कर्तव्याचे भान राखून जखमींना मदत करण्याची तत्परता दाखवली पाहिजे.




■ ■ ■

# गाडीची यांत्रिक रचना

**मला माहिती हवी की, वाहनांतले यांत्रिक दोष कसे समजून घ्यायचे. याबाबत काही मार्गदर्शन कराल का? गाडीची निगा कशी राखायची, याबाबतसुध्दा कृपया सांगा.**

वाहनातल्या यांत्रिक दोषामुळे अनेक वेळा अपघात झालेले आढळून आले आहेत. वाहनाची दैनंदिन देखभाल करताना लक्षात येणारे दोष दूर करायला हवेत. त्यासाठी मेकॅनिकचा सल्ला महत्त्वाचा ठरतो, परंतु वाहनाच्या रचना व कार्यपध्दतीबाबत थोडसं जाणून घेतलं तर वाहनातले यांत्रिक दोष आपल्याला समजू शकतील.

**फ्युएल सिस्टिम–** ही यंत्रणा हवा व इंधन यांचे योग्य मिश्रण इंजिनाला पुरविते. हे मिश्रण जोपर्यंत योग्य पध्दतीने, योग्य प्रमाणात पुरविले जाते तोपर्यंत ही यंत्रणा व्यवस्थित कार्य करते.



**लुब्रिकेशन सिस्टिम** – वंगणाचे कार्य सर्वांना माहीत आहे. वाहनाच्या भागांनासुध्दा वंगण महत्त्वाचे आहे. कारण वाहन चालवताना वाहनाच्या अनेक भागांचे घर्षण होत असते. हे घर्षण कमी करण्यासाठी ही यंत्रणा कार्य करते.

**कूलिंग सिस्टिम -** या यंत्रणेत रेडिएटर, वॉटर पंप, फॅन, फॅनबेल्ट इ. भागाचा समावेश होतो. या यंत्रणेद्वारे हवा-पाणी अथवा कूलंट यांच्या साहाय्याने इंजिनाचे तापमान नियंत्रित केले जाते, अन्यथा वाहनाचे तापमान वाढून ते रस्त्यातच बंद पडते. त्यामुळे वाहनाच्या कूलिंग सिस्टिमची निगा, काळजी घेणे महत्त्वाचे ठरते.

**स्टिअरिंग सिस्टिम –** गाडी कोणत्या दिशेला वळवायची याचे कार्य ही यंत्रणा करते. ही महत्त्वाची यंत्रणा असल्यामुळे या भागाची देखभाल करायलाच पाहिजे व त्यात काही दोष निर्माण तर झाले नाहीत ना याबाबत समजून घ्यायला हवे.

**ट्रन्समिशन सिस्टिम** – यामध्ये क्लच, गियर, प्रोपेलर शाफ्ट व डिफेरेंशियल याचा समावेश होतो. वाहनातली ही यंत्रणा इंजिनाची ताकद चाकांपर्यंत पोहोचवते.

**सस्पेन्शन सिस्टिम –** रस्त्यावर गाडी चालताना जे हादरे बसतात त्याचे प्रमाण कमी करायचे काम ही यंत्रणा करते. यात पाटे (स्प्रिंग्ज), शॉक ॲब्सॉर्बर भागांचा समावेश होतो व त्याची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. या यंत्रणेत बॅटरी, स्टार्टर, डायनॅमो, इलेक्ट्रिकल सिस्टीम, अल्टनेटर कॉइल व दिवे इ. समावेश असतो. वाहनातील ही महत्त्वाची यंत्रणा असल्यामुळे ती सतत कार्यक्षम ठेवायला पाहिजे.

**ब्रेकिंग सिस्टिम–** मेकॅनिकल, हायड्रॉलिक, एअर, एअर ॲसिस्टेड हायड्रॉलिक असे प्रकार आहेत. या यंत्रणेचे महत्त्व जास्त आहे. ही यंत्रणा कार्यक्षम असेल तरच वाहन चालविणे शक्य आहे. या सर्व यंत्रणेची माहिती वाहनांतील दोष समजून घ्यायला मदत करू शकेल. या प्रकारच्या यंत्रणेत दोष असणे व त्या दोषांसहित वाहन चालविणे म्हणजे अपघाताला स्वतःहून आमंत्रण देण्यासारखे आहे.

वाहनाच्या सर्व यंत्रणा व्यवस्थित काम करीत असतात, त्याच वेळी वाहन सुरळीत चालते. यांत्रिक दोष असलेले वाहन रस्त्यावरून चालविणे मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९० अन्वये गुन्हा ठरतो. या गुन्ह्याला त्या वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) रद्द करण्याचा अधिकार मोटारवाहन निरीक्षकाला आहे. वाहनाची निगा कशी राखायची याबाबत आपली विचारणा आहे तर आपण गाडी खरेदी केल्यापासून उत्पादकांनी कोष्टक दिलेले असते, त्याप्रमाणे त्याची निगा राखायची. गाडीत काही दोष आढळले तर वाहन नादुरूस्त होऊन बंद पडेपर्यंत वाट न पाहता ती दुरूस्त करून घेतली पाहिजे. यदाकदाचित वाहन नादुरूस्त झाल्यास त्याची सर्वतोपरी दक्षता घेऊन सगळ्या प्रकारचे दोष निराकरण करून घेतले पाहिजेत. गाडीच्या नियमित देखभालीसाठीसुध्दा पैसे बाजूला काढले पाहिजेत. अशा प्रकारे नियमित देखभाल होत असल्यास अचानक मोठा खर्च गाडीसाठी उद्‌भवत नाही. त्याचबरोबर वाहन यांत्रिक दोषाने अपघातग्रस्त होण्याची शक्यता दुरावते. सरतेशेवटी गाडीच्या निगेबाबत, आपण आपली निगा राखतो त्याचप्रमाणे गाडीची निगासुध्दा प्राधान्याने राखायला हवी.

■ ■ ■

# गाडीची निगा

**गाडीचे काही छोटे-मोठे दोष ओळखण्यासाठी, वाहनांच्या यं त्रणेबाबत, त्याची निगा राखण्यासंदर्भात माहिती सांगावी.**

आपण जो प्रश्न विचारला आहे तो खरंच महत्त्वाचा आहे. कारण ही प्रवृत्ती आहे. अतिशय वाढणारी प्रवृत्ती आहे हे खेदाने नमूद करावेसे वाटते, कारण गाडी बंद पडेपर्यंत त्या गाडीच्या दुरूस्तीकडे न पाहणे म्हणजे एक घातक कारण ठरू शकते. कारण गाडी एक यंत्र आहे आणि यंत्रात अचानक बिघाड झाला तर अनेकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, असे जरी झाले नाही तरी अचानक बिघाड निर्माण झाल्यावर मोठ्या खर्चाला सामोरे जावे लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वेळच्या वेळी गाडी तपासली गेली तर गाडीची स्थितीसुध्दा चांगली राहून तिच्या वापराचे सुख मिळू शकते. मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे यंत्र




असल्यामुळे अचानक बिघाड होतो, परंतु हा बिघाड होताना तशा सूचना आपल्याला मिळत असतात. वाहन चालविताना त्यातील बदलाकडे अथवा चित्रविचित्र आवाज होत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नये, तर त्यासाठी उपाययोजना करायला हवी. थोडक्यात, गाडीच्या यंत्रणेबाबत सांगायचे तर ब्रेकबद्दल सांगता येईल. हा अतिशय महत्त्वाचा गाडीचा भाग आहे. ब्रेक पॅडल दाबताना ते तळापर्यंत कधीही दाबले जायला नको. ते तळापर्यंत दाबले गेले तर ब्रेक यंत्रणा अकार्यक्षम झाली असे समजायला हवे. ब्रेक पॅडल बळकट वाटणे हे ब्रेक यंत्रणा चांगली असल्याचे लक्षण आहे. ब्रेक यंत्रणा खराब होण्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी ब्रेक यंत्रणेत हवा शिरणे, वॉशर्स खराब होणे, चुकीचे ऑईल भरणे, यंत्रणेत कचरा साठणे अशी अनेक

कारणे असू शकतात. या ब्रेक यंत्रणेत दोष निर्माण झाल्यावर ब्रेक पॅडल दाबल्यावर नरम लागतात. याकडे लक्ष देणे सहज शक्य आहे व मेकॅनिकला दाखवून त्यातला दोष दूर करणेही शक्य आहे. वाहनात निर्माण होणारे अनेक दोष हे वाहनाची योग्य निगा न राखल्यामुळे होतात. काही दोष वाहनाचा वापर करताना सहज लक्षात येतात, तर काही मेकॅनिकला दाखवल्यावर तो लक्षात आणून देतो.



१) स्टिअरींग सिस्टिम - यामुळे वाहन इच्छितस्थळी वळविले जाते. याचे सर्व सुटे भाग व सांधे यांची नियमित पाहणी महत्त्वाची आहे.

२) ब्रेकिंग सिस्टिम - यात कल, हायड्रॉलिक, एअर, एअर हायड्रोलिक असे चार प्रकार आहे. त्याबद्दल माहिती दिली आहे. या यंत्रणेची नियमित निगा राखायला हवीच.

३) इंधन यंत्रणा – ही यंत्रणा इंजिनाला योग्य हवा व इंधन यांचे मिश्रण पुरविते. यामध्ये इंधन पंप, फिल्टर इ. भाग येतात.

४) इलेक्ट्रिक सिस्टिम – बॅटरी स्टार्टर, कॉईल व दिवे इ. भाग यात येतात. याकडेसुध्दा देखभाल व पाहणीची नितांत गरज आहे.

५) ल्युब्रिकेशन सिस्टिम - या यंत्रणेच्या माध्यमातून घर्षण होणाऱ्या भागांना सतत ल्युब्रिकंट्स पुरविले जाते.

६) कूलिंग सिस्टिम - या यंत्रणेद्वारा पाणी, कुलंट यांच्या सहाय्याने इंजिनाचे तापमान नियंत्रित केले जाते, रेडिएटर, वॉटरपंप, फॅनबेल्ट, फॅन इ. चा सहभाग यात होतो. गाडीचे तापमान योग्यप्रकारे सांभाळले गेले तर वाहन सुस्थितीत राखण्यासाठी मदत होते.

याशिवाय ट्रान्समिशन, सिस्टिम, सस्पेन्शन सिस्टिम इ. अनेक यंत्रणांची योग्य देखभाल करता आली पाहिजे. मोटार वाहन कायदा १९८८ च्या १९० या कलमान्वये यांत्रिक दोष असलेले वाहन रस्त्यावर चालविणे हा गुन्हा ठरतो. जरी हा मुद्दा कायद्याचा असला तरी स्वतःच्या जिवाची काळजी, इतरांच्या जिवाची काळजी घेणे महत्त्वाचे. त्यामुळे गाडी बंद पडेपर्यंत वाट पाहण्यापेक्षा वेळच्या वेळी मेकॅनिकला दाखवून त्या गाडीची निगा राखणे हे कर्तव्यभावनेतून करायला हवे.

■ ■ ■

# गाडीतला बिघाड कसा ओळखायचा?

**गाडीची निगा राखण्यासाठी गाडीतला बिघाड ओळखता येणे शक्य आहे का? फक्त गाडीतून बाहेर पडणाऱ्या धुरावरून हे शक्य आहे का? याबाबत माझे अनेक प्रश्न आहेत, ते यथावकाश आपल्याला विचारणार आहे.**

गाडीतून बाहेर पडणाऱ्या धुरावरून गाडीत बिघाड झाला आहे हे सांगणे सरावानेच शक्य होईल. आपल्याला

खोकला, सर्दी झाल्यानंतर ताप येतो. त्यावेळी आपण खोकला किंवा सर्दी झाल्यावरच औषधोपचार करतो, तसाच गाडीतून बाहेर पडणाऱ्या धुराच्या बाबत निगा राखण्याच्या दृष्टीने बिघाड झाल्यास लगेच लक्षात येऊन योग्य ते रिपेअरिंग करून निगा राखू शकतो. इंजिन एरव्ही चांगले असते, तेव्हा किंचित काळसर करड्या रंगाचा धुर बाहेर पडतो. धुराचा रंग बदललेला दिसला की इंजिनामध्ये बिघाड आहे हे समजायला हवे. प्रत्यक्षात हा धुराचा रंग बदलायला कारणे असतात. ही कारणे म्हणजे इंजिनामधले बिघाड असतात. त्याबद्दल थोडक्यात सांगायचे तर जर पांढरा धूर निघत असेल तर त्याची कारणे पुढील प्रकारे असू शकतातः



डिझेलमध्ये जर पाणी मिसळले असेल तर अशा प्रकारचा पांढरा धूर निघतो. लायनर्स खराब अथवा फाटलेले असतील, सिलेंडर हेडला तडा गेला असेल तर. थोडक्यात सांगायचे तर कंबशन चेंबरमध्ये म्हणजेच इंजिनामध्ये पाण्याचा प्रादुर्भाव झाला असेल तर अशा प्रकारचा पांढरा धूर निघू शकतो.

एखादी गोष्ट जळताना आपण पाहतो व जळत असतानाचा धूरही पाहतो. हा धूर बहुतांशी काळा असतो, त्यामुळे जळताना धूर काळा निघतो हे म्हणता येईल, परंतु गाडीच्या

बाबत बोलायचे झाले तर गाडीतून काळा धूर निघणे म्हणजेच इंधनाचे ज्वलन अपुरे होणे आहे असे समजणे, यासाठीही कारणे आहेत.

त्यापैकी एक कारण म्हणजे जर गाडीत गाडीच्या निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक भार भरला तर गाडीतून काळा धूर निघतो. इंजिनाला हवेचा कमी पुरवठा होत असेल तर, काही वेळा धूर जेथून बाहेर पडतो, तेथील जागा चोंदलेली असेल किंवा निर्धारित आकाराचा एक्झॉस्ट पाईप बसविलेला असेल अर्थात चुकीच्या आकाराचा सायलेंसर बसविलेला असेल तर अशा प्रकारे काळा धूर निघू शकतो.

गाडीतून काही वेळेला निळा धूर निघतो. हा धूर इंजिनात इंधनाबरोबर ऑईल जळत असल्याचे दाखवतो. याची कारणे पुढील प्रकारे सांगता येतीलः काही वेळा लुब्रिकेटिंग ऑईलचे प्रेशर जास्त असते किंवा ऑईल टाकीत ऑईलची लेव्हल जास्त असल्यामुळे, लायनर्स झिजलेले असतील तर, काही वेळेला व्हॉल्व्ह खराब असतो, अशा रॉकर चेंबरमधील ऑईल इंजिनाच्या कंबशन चेंबरमध्ये येते. मग गाडीतून निळा धूर निघू शकतो.

गाडीतून बाहेर पडणाऱ्या धुराच्या रंगाच्या बदलण्यात गाडीतले अजूनही काही बिघाड वर सांगितले आहेत, त्यापैकी असू शकतात. फक्त गाडीची निगा राखताना अशा प्रकारचा धुराच्या रंगातील बदल निगा राखण्यासाठी किंवा गाडीतील झालेला बदल दूर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. प्रशिक्षित वाहन दुरूस्त करणाऱ्याकडे ते वाहन दुरूस्त करून घ्यायला हवे.

आपण आपले अनेक प्रश्न आहेत असे कळवता. आपण जरूर ते प्रश्न कळवा व या विषयाबाबत जास्त जाणून घ्यायचे असेल तर 'अपघात आणि आपण' हे योगेश बांग लिखित पुस्तक आपण अवश्य वाचा.

गाडीची निगा राखताना मात्र स्वतःच रिपेअरिंग करण्याची तयारी पूर्ण ज्ञान असल्याशिवाय करू नये. त्यामुळे वाहनाचे नुकसान होऊ शकते.

त्यामुळे निदानापुरते गाडीचे आजार पाहून गाडीच्या डॉक्टरकडे (गॅरेजमध्ये) लवकरात लवकर घेऊन जाणे श्रेयस्कर ठरू शकते.

■ ■ ■

# वाहन प्रदूषण चाचणी

**वाहनांची प्रदूषण तपासणी योग्यप्रकारे केली आहे हे सर्वसामान्यांना कसे कळू शकेल. वाहनांच्या प्रदूषण तपासणीबाबत योग्य पध्दत कशी आहे ?**

आपण म्हणता त्याप्रमाणे वाहनांची प्रदूषण चाचणी घेण्याची पद्धत सर्वसामान्यांना सहज कळू शकते. सध्या जी रूढ पध्दत आहे, त्यानुसार तपासणी यंत्राला जोडलेला एक पाईप असतो व तो वाहनाच्यासायलेन्सरमध्ये टाकण्यात येतो. शासनाने निर्धारित केलेल्या पातळीपेक्षा वायूची कमी पातळी नोंदली जाते व प्रमाणपत्र देऊन ग्राहकांकडून पैसे घेतले जातात. या पध्दतीची शास्त्रोक्त पध्दतीची माहिती देण्याचा प्रयत्न करणार आहे. मग ही पध्दत आपल्याला समजू शकेल.



पेट्रोल इंजिनची वायू प्रदूषण तपासणी ही गाडी न्युट्रल स्थितीत असताना केली जाते. त्यावेळी ॲक्सेलेटर अजिबात न देता गाडीचे इंजिन फक्त सुरू असते. वाहनाची तपासणी करताना हे वाहन रहदारीत किमान पंधरा मिनिटे चालविले असले पाहिजे. ज्या यंत्राने तपासणी करायची आहे ते मशिनसुध्दा तपासणी करण्यापूर्वी पंधरा ते वीस मिनिटे सुरू असले पाहिजे. तपासणीयंत्राचा पाईप सायलेन्सरमध्ये किमान ३०० मिलीमीटरच्या आत असायला हवा. असे जर केले नाही तर बाहेरची हवा त्या पाईपमध्ये जाऊन चुकीचे रीडिंग मिळू शकते. काही वाहने अशी असतात की, त्यांच्या सायलेन्सरमध्ये प्रदूषण तपासणी करण्याचा पाईप (प्रीब) जाऊ शकत नाही. अशा

वेळी सायलेन्सरवर रबरी पाईप बसवून प्रीबने रीडिंग घ्यावे लागते. प्रदूषण तपासणीचा पाईप नेहमी स्वच्छ असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्याला छिद्रे असता कामा नयेत, तरच प्रदूषणाचे रीडिंग योग्यप्रकारे होऊ शकते. पेट्रोलवर धावणाऱ्या वाहनांप्रमाणेच डिझेलवरील वाहनाची तपासणी आवश्यक असते. डिझेल वाहनांची प्रदूषण तपासणी करताना ती स्मोक मीटरने करण्यात येते. डिझेल वाहनाची प्रदूषण तपासणी करतेवेळी तपासणी पाईप सायलेन्सरमध्ये तीनपट आत असणे आवश्यक असतो. त्याचबरोबर स्मोक मीटर हे सायलेन्सरपेक्षा उंचावर असणेही गरजेचे असते. ते सम पातळीत किंवा खाली असता कामा नये. तपासणी करण्यापूर्वी वाहन किमान १० कि.मी. चालले पाहिजे व तपासणी करताना इंजिनाचे तापमान ८० सेल्सिअसमध्ये असले पाहिजे. वाहनाची तपासणी करण्यापूर्वी सहा-सात वेळा एक्सलेटर पॅडल पूर्ण दाबून सोडून सायलेन्सर मोकळा करायला हवा. तपासणी करीत असताना एक्सलेटर समान वेगाने वाढवत नेऊन दाबावा व एक्सलेटर पूर्ण दाबल्यावरच वाहनाची प्रदूषण क्षमता मोजली जाते. अशा किमान चार चाचण्या घेतल्यानंतर वायू पातळीतील फरक ०.२५ एम. पेक्षा जास्त नको.



तसेच उतरत्या क्रमाने या चार चाचण्या दर्शविता कामा नये. या चार वैध चाचण्यांचे सरसरी प्रमाण ही वाहनाची अंतिम वायू पातळी असते. शास्त्रोक्त पध्दत ही वायू प्रदूषणाची पातळी योग्यप्रकारे दाखवत असल्यामुळे वायू प्रदूषणावर योग्य उपाययोजना करता येऊ शकेल.

■ ■ ■

# पीयुसी आवश्यक

**पीयुसी करणे गरजेचे आहे का? प्रत्येक वाहनाची पीयुसी चाचणी वेगळी आहे का? पीयुसीबद्दल काही माहिती असेल तर द्या.**

प्रत्येक वाहनाच्या धुरामधून होणारे प्रदुषण नियंत्रित करण्याकरिता धुरामध्ये असणाऱ्या घटकांचे प्रमाण ठरलेले असते. या ठरविल्या गेलेल्या प्रमाणापेक्षा प्रदुषणाचे घटक जास्त आढळल्यास प्रदुषण केल्याचा गुन्हा ठरतो. यामुळेच स्वतःच्या वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे प्रदुषणाची पातळी ओलांडली जात नाही. असे प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र(PUC) मिळविण्याकरिता प्रदुषण चाचणी केंद्रावर वाहनाची तपासणी करून घ्यावी लागते. या प्रमाणपत्राची विधिग्राह्यता सहा महिन्यांची असते. प्रत्येक सहा महिन्यांनंतर वाहनाची तपासणी करून प्रमाणपत्र मिळवावे लागते. मिळविलेले प्रमाणपत्र वाहन चालविताना बरोबर ठेवावे लागते व तपासणी अधिकाऱ्याने मागणी करताच ते देता आले पाहिजे. तपासणीच्या वेळी प्रदुषण नियंत्रण नसल्यास सात दिवसांच्या आत वाहनाची तपासणी करून तशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळवून ते सात दिवसांत मागणी केलेल्या अधिकाऱ्यास सादर करावे लागते, अन्यथा सात दिवसांत जर प्रमाणपत्र सादर केले नाही तर वाहनाचे मालक-चालक यांना प्रत्येकी ५०० रू. तडजोड शुल्क भरावे लागते व वाहन निलंबितसुध्दा केले जाऊ शकते.



नवीन वाहनांकरिता मात्र एक वर्ष पूर्ण कालावधीपर्यंत प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. महानगरपालिका क्षेत्रात वाहनांमुळे प्रदुषणाचे प्रमाण ७ टक्क्यांच्या आसपास आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या जनहितार्थ याचिकेमुळे काटेकोरपणे वायुप्रदुषण तपासणी करण्यात येते. उच्च न्यायालयाने त्यासाठी काही निर्देशही दिले आहेत. त्या निर्देशांनुसार जर बनावट व चुकीचे प्रमाणपत्र देत असेल तर त्या केंद्राचे प्राधिकारण पत्र रद्द करून त्याच्याविरूध्द

फौजदारी गुन्हा दाखल केला जातो. वायुप्रदुषण तपासणीच्या दृष्टीने अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकदा तपासणी केल्याचे प्रमाणपत्र घेतल्याने जबाबदारी संपत नाही. तर ज्या वाहनातून आपण प्रवास करतो, त्या वाहनाच्या प्रदुषणाची पातळी नियमित नियंत्रित ठेवली पाहिजे. तपासणीच्या वेळी कोणत्याही वाहनातून होणारे प्रदूषण नियंत्रिति पातळीपेक्षा अधिक आढळल्यास वाहनाचे या अगोदर काढलेले विधिग्राह्य प्रमाणपत्र असून दंडात्मक व नोंदणी निलंबनाची कारवाई करण्यात येते. वाहनाच्या प्रदुषण तपासणीबाबत थोडक्यात सांगायचे झाले तर जर पेट्रोल वाहन असेल तर वाहनाला न्युट्रल स्थितीत कमीत कमी ॲक्सिलेटर देऊन इंजिन चालू राहील अशा स्थितीत ठेवून पेट्रोल इंजिन चालू केल्यानंतर पाच मिनिटे चालू ठेवून नंतर वाहनाची तपासणी केली जाते. डिझेल वाहनाच्या बाबतीत ॲक्सिलेटरमुक्त ठेवण्याची पध्दत वापरण्यात येते. इंजिन चालू केल्यानंतर इंजिनाचे तापमान ८० सें. होईल, त्यावेळी प्रदुषण तपासणी करावी. तपासणी करताना ॲक्सिलेटर एकसारखा वेगाने वाढवत नेऊन पूर्ण दाबावा. ॲक्सिलेटर पूर्ण दाबल्यानंतर वाहनाची प्रदुषणक्षमता मोजावी. डिझेल वाहनाची चाचणी घेताना एकूण पाच चाचण्या घ्याव्यात. त्या पाच चाचण्यांचे सरासरी प्रमाण अंतिम समजावे.

प्रदुषण चाचणी केंद्रावर काही बंधने व अटी आहेत. प्रदुषण चाचणी करून घेणाऱ्या आपल्यासारख्या ग्राहकांना ती माहिती असावी :

१) चाचणी केंद्राचे नूतनीकरण दरवर्षी व्हायला हवे. २) पेट्रोल यंत्राची मोजणी योग्यता दोन महिने किंवा हजार चाचण्या यांपैकी जे पूर्ण होईल तेव्हा करावे. ३) डिझेल यंत्राची मोजणी योग्यता दर तीन महिन्यांनी किंवा एक हजार चाचण्या यांपैकी जे पूर्ण होईल ते करावे. ४) प्रदुषण चाचणीत नापास झालेल्या वाहनांची माहिती २४ तासांच्या आत संबंधित आरटीओ कार्यालयात कळविणे बंधनकारक आहे. ५) चुकीचे प्रमाणपत्र दिल्यास केंद्र / मालकावर फौजदारी कारवाई होते. ही सर्व माहिती योग्य पध्दतीने समजून घेऊन योग्य पध्दतीने त्यावर अंमलबजावणी केली तर वायुप्रदुषण आपण टाळू शकू व आपल्या वाहनाची तपासणी कायदेशीर व फायदेशीर होईल.

■ ■ ■

# प्रदुषण कसे रोखाल?

**वाहनांच्या प्रदुषणामुळे काय परिणाम होतात? त्यावर उपाययोजना, याबाबत कृपया आपल्या या सदरात सांगा. जेणेकरून लोकांमध्ये थोडी तरी जाग रूकता येईल.**

आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर अनेकांना माहिती असण्याची शक्यता आहे; परंतु आपण म्हणता तसे जागरूकतेसाठी या प्रश्नाचे उत्तर आवश्यक आहे. वाहनामधून बाहेर पडणाऱ्या धुरामध्ये मुख्यत: कार्बन मोनॉक्साईड, हायड्रोजन, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, लेड ऑक्साईड, धूर असे घटक असतात व हे घटक हवेत मिसळल्यामुळे हवेचे प्रदुषण होते.



या प्रदुषणामुळे जीवसृष्टीवर अगदी सहज परिणाम होतो. फुफ्फुस, घसा व डोळे हे सहजासहजी विकारग्रस्त होतात. डोकेदुखी, दमा, भूक न लागणे, विसराळूपणा, अस्वस्थ होणे, थकवा, बैचेनी अशा प्रकारचे आजार बळावतात. लहान मुलांच्या वाढीवरदेखील या प्रदुषणचा परिणाम होतो.

फक्त माणसांवरच या प्रदुषणाचा परिणाम होत नाही तर वनस्पतींवरसुध्दा याचा परिणाम घडून येतो. वनस्पतींची वाढ खुंटणे, पाने गळणे, झाड जळणे, रोगराई वाढणे असे दुष्परिणाम हवा प्रदुषणामुळे घडत असतात.

हवा प्रदुषणावर अगदी थेट उपाययोजना म्हणजे ते पूर्ण थांबविणे आपल्या हातात जरी नसले ते कमी करणे निश्चितपणे आपल्या हातात आहे. वायू प्रदुषण नियंत्रणाकरिता वाहनांची काळजी पुढील प्रकारे घेता येऊ शकेल. (१)नियमित व अचूक पध्दतीने इंजिनचे ट्युनिंग करायला हवे. (२) वाहनाच्या देखभालीचे वेळापत्रक ठरवून नियमित त्याची दुरूस्ती करायला हवी. (३) वाहनांची सर्व्हिसिंग व देखभाल कंपनीने प्रत्येक वाहनासाठी आखलेली असते,

त्याप्रमाणे वेळा पाळाव्या. (४) ठरावीक मर्यादेपर्यंत गाडी चालविल्यानंतर (पंप, व्हॉल्व्ह, कार्बोरेटर, फिक्टर नोझल) यांची योग्य प्रकारे देखभाल करावी.

गाडी चालवताना ड्रायव्हर व मालकांनीसुध्दा काळजी घ्यायला पाहिजे. ही काळजी घेतल्यानेसुध्दा प्रदूषण कमी होऊ शकते. (१) अचानक ॲक्सिलेटर देणे, अचानक वेग वाढविणे किंवा अधिक वेगाने वाहन चालविणे अशा सवयी चालकांनी टाळाव्यात. (२) गाडी चालविताना क्लचवर पाय ठेवून गाडी चालवणे टाळावे. (३) वाहनाचा वेग नेहमी संतुलित ठेवावा व गिअरचा वापर योग्य वेगात असताना करावा. (४) ऑईल, इंधन व ग्रीस इ. वापर हा योग्य प्रमाणात करावा व या वस्तू प्रमाणित असतील तरच वापराव्यात. (५) चांगल्या मॅकेनिककडे किंवा चांगल्या गॅरेजमध्येच गाडीची देखभाल करावी, जेणेकरून ते वायूप्रदुषण टाळणाऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरवतील. (६) वाहनात अधिक बोजा भरू नये, त्याचबरोबर बेफाम पध्दतीनेसुध्दा वाहन चालवू नये. (७) भेसळयुक्त इंधनाचा वापर टाळावाच लागेल. कारण भेसळयुक्त इंधनामुळे हवेत अनेक घातक घटक सोडले जातात.



पेट्रोल वाहनाने कॅटलायटिक कन्व्हर्टर सुस्थितीत बसवायला हवा. पेट्रोल वाहनामध्ये सायलेन्सरच्या पुढील भागात हे उपकरण बसविण्यात येते. या उपकरणात मुख्यतः प्लॅटिनम, पॅलेडियम, रेडियम या धातूंचा वापर करून आतील भागात जाळीदार रचना असते.

उपकरणामुळे सायलेन्सरमधून बाहेर पडणाऱ्या धुरांतील कार्बन मोनॉक्साईड, हायड्रोजन ऑक्साईड या घटकांवर रासायनिक प्रक्रिया होऊन त्याचे कार्बनडाय ऑक्साईड, पाणी व नायट्रोजन या निरूपद्रवी घटकांमध्ये रूपांतर करण्यात येते.

शासकीय स्तरावर वायू प्रदुषणाची अंमलबजावणी होतेच आहे; परंतु आपण हवा प्रदुषणाचे परिणाम लक्षात घेतले व वाहन चालविताना थोडीशी दक्षता घेतली तर ही प्रदुषणाची पातळी निश्चित कमी करू शकू.

■ ■ ■

# वाहन विमा अत्यावश्यक

**वाहनाचा विमा काढणे गरजेचाच आहे का? वाहनाच्या विम्याचे काही प्रकार असतील तर त्याची माहिती द्या.**

सर्वप्रथम मी आपल्याला सांगेन की, कोणत्याही वाहनाचा विमा काढणे गरजेचेच आहे. वाहनाची विधिग्राह्य पॅलिसी असल्याशिवाय कोणीही व्यक्ती वाहन सार्वजनिक ठिकाणी चालवू शकणार नाही. अर्थात विमा पॉलिसी असल्याशिवाय वाहनाचा वापर करता येणार नाही. वाहनाचे विमा पॉलिसीचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत : १) थर्ड पार्टी विमा पॉलिसी, २) कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा पॉलिसी, ३) पब्लिक लायबिलिटी विमा पॉलिसी. वाहनाच्या विमा पॉलिसीच्या नावाकरून स्वरूप कळता येऊ शकेल. या पॉलिसींची माहिती थोडक्यात सांगता येईल.




१) थर्ड पार्टी विमा पॉलिसी - याला 'ए' पॉलिसी म्हणतात. या विम्यामध्ये वाहनाची नुकसानभरपाई मिळतेच; याव्यतिरिक्त इतर कोणत्याही मनुष्य किंवा संपत्तीच्या हानीचा समावेश या विमा पॉलिसीमध्ये असतो. वाहनाचा अशा प्रकारे विमा उतरविल्यावर नुकसानभरपाई करण्याची जबाबदारी विमा पॉलिसी दिलेल्या कंपनीची असते. परंतु यासाठी अपघाताच्या वेळी वाहनचालक, वाहन मालक यांनी लायसन्स, नोंदणी प्रमाणपत्र व परवाना अटींचे पालन केलेले असले पाहिजे.

२) कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा पॉलिसी - 'बी' पॉलिसी म्हणतात. या प्रकारातला विमा घेतल्यानंतर अपघात किंवा इतर कारणांमुळे वाहन पूर्णतः खराब झाल्यास किंवा अपघातात कोणत्याही प्रकाराची मनुष्यहानी, वित्तहानी झाल्यास संपूर्ण नुकसानभरपाईचा अंतर्भाव या प्रकारच्या विमा पॉलिसीमध्ये असतो.

३) पब्लिक लायबिलिटी विमा पॉलिसी - या प्रकारची विमा पॉलिसी घेतल्यावर जर वाहनाला अपघात झाला व काही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याचा अंतर्भाव या पॉलिसीमध्ये असतो. ज्वालाग्राही व स्फोटक पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना पब्लिक लायबलिटी विमा पॉलिसी घेणे बंधनकारक आहे.

उपरोल्लेखित विमा पॉलिसीपैकी कोणत्याही एका प्रकारची विमा पॉलिसी वाहनधारकाने घेणे कायदेशीर बंधनकारक आहे... फक्त पॉलिसी घेऊन वाहनधारकाने विसरून जायचे नाही तर तिचे सतत नूतनीकारक करणे आवश्यक आहे, कारण ती विधिग्राह्य नसेल तर ती पॉलिसी काढली गेली नाही असाच त्याचा अर्थ होतो. विम्याची सर्वसाधारणपणे मुदत साधारणतः एक वर्षाची असते व ही मुदत संपण्याअगोदर नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मोटारसायकलसारख्या वाहनांकरिता एकरकमी विमा पॉलिसीसुध्दा घेता येते. ही एकरकमी विमा पॉलिसी वाहनाच्या नोंदणी कालावधीसाठी असते. विमा कंपन्यांकडून विमा पॉलिसी प्रदान करण्याच्या अगोदर सुरुवातीला कव्हरनोट देण्यात येते, याची मुदत एक महिना असते. ही मुदत संपण्यापूर्वी विमा पॉलिसी प्राप्त करणे आवश्यक आहे. विम्याचे हस्तांतरण वाहनाच्या हस्तांतरणाबरोबर करता येते. मात्र मालकी बदलण्याची माहिती चौदा दिवसांच्या आत विमा कंपनीत देणे आवश्यक आहे. याकरिता नोंदणी प्रमाणपत्र व सह विमा पॉलिसी विमा कंपनीकडे सादर करून विमा पॉलिसीवर योग्य तो बदल करता येतो. विमा पॉलिसीची दुय्यम प्रतसुध्दा मिळू शकते. फक्त अधिकृत फी भरून ही दुय्यम प्रत घेतली जाते. वाहनाचा विमा एका व्यापक दृष्टिकोनातून दिला जातो. अपघाताच्या वेळी जोखीम कमी व्हावी हा त्यामागे विचार असला, तरी अपघात होऊ नये याचाच प्रयत्न करायला हवा व त्यातून अपघात टाळताच आला नाही तर मात्र विम्याचे छत्र आपल्यासाठी आहेच.

■ ■ ■



# सुखरूप प्रवासासाठी

**सुट्टयांच्या हंगामात अनेक मंडळी आपल्या स्वतःच्या गाडीने प्रवासाला निघतात. प्रवास सुखरूप होण्यासाठी कोणती काळजी घ्यावी ?**



गाडी चालविणाऱ्या प्रत्येकाला सुरक्षेविषयी माहिती असतेच; परंतु सर्वसाधारणपणे गाडी चालविणाऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी. याविषयी थोडक्यात. 'No one can perfect' हे वाक्य गाडी चालविणाऱ्यांबाबत महत्त्वाचे आहे. कारण गाडी चालविताना निष्णात चालकालाही आपघाताला सामोरे जावे लागते. इच्छित स्थळी जाण्यासाठी जेव्हा आपण वाहन सुरू करतो, तेव्हा वाहनातील सर्व यंत्रणा योग्यप्रकारे काम करीत आहेत की नाहीत ते पडताळून पाहायला हवे. सीट, आरसे, सीट बेल्ट, सीटची ॲडजेस्टमेंट योग्य प्रकारे आहे की नाही हे पाहायला हवे. वाहन चालविताना अडचणीचे होतील असे कपडे वापरता कामा नयेत. गाडी सुरू करतानाच इंधन आहे की नाही पाहावे. एक हात दरवाजावर किंवा गियरवर ठेवून एका हाताने स्टिअरिंग पकडण्याची सवय धोकादायक ठरू शकते. अजून काही टिप्स पुढील प्रकारे आहेत:

१ वाहन चालविताना स्वतःच्या मनावर पूर्ण नियंत्रण हवे. वाहन चालविण्याकडे पूर्ण लक्ष द्यावे.

२ रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांचा अचूक अंदाज घ्यावा.

३ वाहनाचा वेग हा मर्यादित व नियत्रंणासाठी योग्य असायला हवा. नवख्या गावात प्रवास करताना गाडी जपून चालवावी व तेथील रस्ता व वाहतुकीची माहिती करून घ्यावी.

४ मद्यप्राशन करून वाहन चालविल्यावर शारीरिक हालचालींचा वेग मंदावतो. त्यामुळे वाहन चालविताना धोका निर्माण होऊ शकतो.

५ अपघातसदृश परिस्थिती केव्हाही निर्माण होऊ शकते, याचा विचार करून सतत सावध राहायला हवे.

६ वाहनाचा अति वेग हा अनेक अडचणी निर्माण करू शकतो. वाहनाचा वेग वाढविताना रस्ता वाहतूक, नागरिकांची वर्दळ या सर्वांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः वळणरस्त्यावर वाहन सावधपणे चालवायला हवे. रस्त्यावरील वाहतूक चिन्हांचे पालन करावे.

७ वाहन चालविताना मोबाईल व अन्य गोष्टींचा वापर टाळावा. वाहन चालविण्याकडेच लक्ष केंद्रित असायला हवे.

८ कोणत्याही गोष्टीत बेफिकीरपणा टाळावा. उदा. रांगेत वाहन न चालवता सारखी लेन बदलणे, मागचे वाहन पुढे जाताच त्याच्याशी स्पर्धा करून त्याला मागे टाकणे, एखाद्या वाहनचालकाबरोबर, वाहनाबरोबर मस्ती करणे किंवा असे करणाऱ्या दुसऱ्या वाहनचालकाला प्रतिसाद देणे. यामुळे आपल्याबरोबर वाहनातील इतरांनासुध्दा धोका पोहोचू शकतो. काही वेळा गाडीला चिकटून दुसरी गाडी चालविली जाते. यामुळे समोरच्या वाहनाने अचानक ब्रेक दाबले तर अपघात होऊ शकतो. त्यामुळे दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर ठेवायला हवे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे सायकलस्वार, विशेषतः मोटारसायकलस्वार अचानक रस्ता बदलून वाहनासमोर येतात, त्यांना हॉर्न देऊन सावध करायला हवे. त्यांना आपल्या वाहनाने हूल देऊन घाबरविले तरीसुद्धा अपघात होण्याची शक्यता असते.

वाहन चालविताना सदैव सावध असायला हवे. आकाराने लांबलचक असलेल्या वाहनांना ओव्हरटेक करताना विशेष खबरदारी घ्यायला हवी. रस्त्यावर काही वेळा भटके प्राणी फिरत असतात. त्यासाठी योग्य ती सावधगिरी बाळगायला हवी. काही वेळा मोठी मालवाहू वाहने रस्त्यावरून जात असतात. अशा वेळी या वाहनांच्या व आपल्या वाहनाच्या दरम्यान सुरक्षित अंतर ठेवणे अत्यावश्यक आहे.

सरतेशेवटी एवढंच सांगायचं आहे की, वाहनांनी प्रवास करणे सुखद आहे. फक्त सावध राहायला हवे. त्यासाठी वाहनचालक, प्रवासी या सर्वांनी सुरक्षित प्रवास करण्याचा संकल्प सोडायला हवा.

■ ■ ■

# प्रवासासाठी चेकलिस्ट

***सुट्टयांमध्ये प्रवासाचे बेत आखले जातात. अशा वेळी आम्ही स्वतःच्या कारने प्रवास करण्याबाबतच्या अनेक बाबी विसरतो. त्याची काही चेकलिस्ट असेल तर कळवावी. 'कारसेवा' या सदरामार्फत ती अनेकांकडे पोहोचेल.***

सुट्टीचा आनंद, सहलीचा आनंद घ्यायला सर्वांनाच आवडतो, परंतु आपण ज्यावेळी सहलीचे आयोजन करतो, त्या वेळेला आपण वाहनाबाबतचे नियम काटेकोरपणे पाळतो का ? कोणती स्थळे पाहायची, काय खाणे-पिणे कारायचे याबरोबर वाहनात काही बाबी आहेत की नाही, यासंदर्भात आपण सतर्क राहायलाच हवे. गाडीचे काय स्टार्टर मारले की सुरू होते, परंतु इतरही अनेक बाबी गाडीबाबत आहेत, ज्यांच्यामुळे वाहन रस्त्यात थांबू शकते, बिघडू शकते आणि पर्यायाने सहलीचे मनसुबेसुध्दा कोसळून पडू शकतात. या आगोदरसुध्दा 'कारसेवा' सदरातून या संदर्भात लिहिले आहे. परंतु आपण चेकलिस्टबद्दल विचारणा केली आहे, तर मला सांगायला आवडेल व ही चेकलिस्ट कायमस्वरूपी उपयोगी पडू शकेल.

सहलीला निघताना–प्रवासाला सुरुवात करताना काही बाबी तपासायला हव्या आहेत :

१ गाडीत बसण्यापूर्वी गाडीचे टायर सुस्थितीत आहेत की नाहीत, गाडीबरोबर जॅक व इतर टूल किट घेतले आहे की नाही ते पाहणे महत्त्वाचे आहे.

२ गाडीत पुरेसे इंधन आहे की नाही याची खात्री करून आवश्यक इंधनाची गरज ठरवायला हवी व इंधनासाठी आवश्यक पैसे अथवा क्रेडिट कार्ड किंवा पेट्रो कार्ड सोबत घ्यायला हवे.

३ इंजिन ऑईल, ब्रेक ऑईल तपासणे महत्त्वाचे आहे.

४ रेडिएटरमधील पाणी / कुलंट तपासून घेणे महत्त्वाचे आहे.

५ बॅटरी पूर्ण चार्ज आहे असे वाटले तरी त्यातील पाण्याची पातळी तपासणे महत्त्वाचे आहे.

६ वायपर, हॉर्न, इंडिकेटर, हेडलाईट, पार्किंग लाईट इ. सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यायला हवी.

७ फॅनबेल्ट योग्यप्रकारे काम करतात की नाहीत हे तपासून घ्यायला हवे.

८ प्रवास जर लांबवर करायचा असेल तर आपल्यासोबत स्पार्क प्लस, पेट्रोल फिल्टर, पॉइंट बल्ब इ. गोष्टी लांबच्या प्रवासाला जास्तीचे गरजेचे सुटे भाग म्हणून सोबत घ्यायला हवे.

९ डॅश बोर्डवरील सर्व मीटर बरोबर योग्यप्रकारे चालतात की नाहीत याची खात्री करून घ्यायला हवी.

१० गाडीच्या सर्व काचा स्वच्छ ठेवायला हव्यात. विशेषतः गाडीची समोरची काच योग्यप्रकारे काळजीपूर्वक स्वच्छ कारायला हवी.

११ गाडीचे आरसे हे महत्त्वाचे असतात. दोन्ही बाजूचे आरसे, रिअरव्ह्यिू इ. आरसे त्याचबरोबर मोठ्या गाडयांना गाडीच्या मागेसुध्दा आरसा असतो, त्याची स्थितीसुध्दा तपासून घ्यायला हवी. जर आरसे फुटलेले असतील तर बदलून घ्यायचा कंटाळा करायचा नाही.

१२ गाडीतून प्रवासाला निघताना प्रथमोपचाराचे साहित्य सोबत असायला हवे. टायर बदलताना अथवा मुलं-बाळं खेळताना त्यांना दुखापत वगैरे होणे स्वाभाविकच असते.

आपल्याला वाटणाऱ्या सुरक्षेच्या दृष्टीने गाडीत अनेक गोष्टी आवश्यक असतील त्याप्रमाणे जरूर ठेवाव्यात. उदा. दोर, बॅटरी इ. सुरक्षित प्रवासात या सर्व बाबी बरोबर घेण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत, तसेच कायद्याने बंधनकारक असलेली कागदपत्रेसुध्दा सोबत बाळगणे बंधनकारक आहे. पुढील दिलेली कागदपत्रे नेहती सोबत ठेवायला हवीतः

१)आर.सी (बुक रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट), २) टॅक्स बुक, ३) विमा प्रमाणपत्र, ४) प्रदूषण नियंत्रण दाखला (पी.यू.सी.). व्यवसायिक वाहन असेल तर त्याच्याबरोबर योग्यता प्रमाणपत्र व परमिट (परवाना) सोबत असणे गरजेचे आहे. या कागदपत्रांबरोबर ड्रायव्हिंगचे लायसन्स ड्रायव्हरने सोबत ठेवायलाच हवे आहे.

सहलीचा आनंद सुरक्षित प्रवासासाठी सर्वांनी योग्य दक्षता घेतली तर तो अधिक द्विगुणित होईल.

■ ■ ■

# जनावरांच्या वाहतुकीचे नियम

**मालवाहतूक करणाऱ्या वाहनातून जनावरे नेताना काही वेळा दिसतात. या संदर्भात काही नियम आहेत का? त्याचबरोबर मालवाहतूक करणाऱ्या वाहनातून माणसांची वाहतूक कायद्याने योग्य आहे का?**



मालवाहतूक करणाऱ्या वाहनातून जनावरे नेण्यासंदर्भात निश्चित नियम आहेत. आपण प्रवास करताना एका विशिष्ट गाडीच्या रचनेप्रमाणे उभे प्रवासी व बसलेले प्रवासी यांची संख्या ठरवलेली असते. त्याचप्रमाणे जनावरांची मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांच्या संदर्भात आहे. जनावरांच्या सुरक्षित वाहतुकीकरिता वाहनात सुविधा असणे आवश्यक आहेत. त्याचबरोबर गाडीचे आकारमान, कोणत्या प्रकारच्या जनावरांची वाहतूक केली जाणार आहे, याचे आकारमान निश्चित केलेले आहे. त्यानुसारच जनावरांची वाहतूक करता येते.

शेळी, मेंढी, डुक्कर यांच्याकरिता प्रत्येक ०.२० चौ. मी.जागा असायला हवा, तसेच इतर प्राण्यांकरिता गाय, घोडा, म्हैस, बैल यांच्याकरिता प्रत्येकी 2X1 चौ.मी. जागा असणे आवश्यक असते. काही वेळेला वाहनातून हिंस्त्र प्राण्यांची वाहतूक केली जाते. (उदा. एका प्राणिसंग्रहालयातून दुसऱ्या प्राणिसंग्रहालयात) त्यासाठीसुध्दा योग्य पिंजऱ्याची सुविधा ज्यात जनावरांना योग्य वावरता येईल, अशी करणे आवश्यक आहे. जनावराचे पाय लोखंडी तळावरून

निसटू नये, यासाठी वाहनांच्या आत लाकडाचा तळ असायला हवा. त्यांना योग्य प्रकारे हवा, प्राणवायू मिळेल यासाठीसुध्दा दक्षता घ्यायला हवी व वाहतुकीच्या दरम्यान त्यांना इजा होणार नाही याकडे लक्ष पुरविले गेले पाहिजे. मालवाहतूक करणाऱ्या वाहनांनी जनावरांची वाहतूक करताना वाहनांची कमाल वेगमर्यादा ताशी २४ किमी इतकी ठेवणे बंधनकारक आहे. या सर्व नियम व अटींचे पालन केल्यास जनावरांची वाहतूक करताना वेगळा परवाना मिळण्याची आवश्यकता नसते.

आपण विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर 'होय' आहे, परंतु त्या संदर्भातही नियम आहेत. त्यानुसार मालवाहू वाहनातून कामाच्या संबंधित कामगारांचीच वाहतूक करता येते. ९९० कि.ग्रॅ पेक्षा कमी नोंदणीकृत वजन असलेल्या वाहनात जास्तीत जास्त तीन, तर मध्यम व जड वाहनांतून जास्तीत जस्त सात कामगारांची वाहतूक करता येते.

अशा प्रकारची कामगारांची वाहतूक मात्र एका राज्यातून दुसऱ्या राज्यात मालवाहतूक करणारी वाहने, एका शहरातून व दुसऱ्या शहरात जाणारी मालवाहतूक वाहने, टँकर अशा वाहनांना करता येत नाही. या अशा प्रकारच्या नियमांना, अटींना डावलून जर वाहतूक करायची असेल तर राज्यशासनाची परवानगी आवश्यक आहे.

मालवाहतूक करणाऱ्या वाहनांबाबत राष्ट्रीय परवानाधारक मालवाहू वाहनात दोन ड्रायव्हर असणे आवश्यक आहे. याचबरोबर प्रत्येक मालवाहतूक करणाऱ्या ड्रायव्हरला एक मदतनीस असला पाहिजे.


ड्रायव्हरच्या संदर्भात असलेले नियम मालवाहतूक करणाऱ्या वाहनांनी जनावरांची वाहतूक करण्याच्या संदर्भातील नियम योग्य प्रकारे पाळले, तरच ही वाहतूक कायदेशीर योग्य वाहतूक ठरते. अन्यथा नियमभंग व कायद्याचा भंग केल्याने ओघानेच येणाऱ्या दंडात्मक कारवाईला तोंड द्यावे लागते.

■ ■ ■

# “ट्रॅक्टर ट्रेलर” चे वाहतूक नियम

**शेतीसाठी वापरले जाणारे “ट्रॅक्टर ट्रेलर”वाहनाला लागू असणाऱ्या नियमात बसतात का? त्यांना कर भरावा लागतो का? सवलतीत कर किंवा करमाफी आहे का? “ट्रॅक्टर ट्रेलर”ला वाहतुकीचे नियम पाळावे लागतात का?**

ट्रॅक्टर ट्रेलरबद्दल विचारलेल्या काही प्रश्नांपैकी आपला पहिला प्रश्न जो आहे, त्याचे उत्तर ‘होय’ असे आहे. कारण ट्रॅक्टर एक वाहन म्हणून वापरले जाते, तेव्हा मात्र त्याला वाहनाचे नियम लागू पडतात. ट्रॅक्टर ट्रेलरच्याबाबत सांगता येईल की, १४-१-९७ पूर्वी शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रेलरची नोंदणी भाडोत्री वाहनवर्गात येत होती. आता म्हणजे १९९७ नंतर ती



खाजगी वाहन म्हणून करण्यात येते, परंतु १९९७ पूर्वीच्या ट्रॅक्टरने खाजगीवर्गात नोंदणी करून घेणे आवश्यक आहे, खाजगी वाहन म्हणून ट्रॅक्टर ट्रेलरची नोंदणी होत असल्याने त्याला योग्यता प्रमाणपत्र व वाहतूक परवान्याची आवश्यकता नाही. सर्वसाधारणपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या ड्रायव्हर्सना ट्रान्सपोर्टचे लायसन्स लागते, परंतु शेतीसाठी ट्रॅक्टर ट्रेलर वाहने चालविण्यासाठी ट्रान्सपोर्ट लायसन्सची गरज नाही. मात्र ही विशेष वर्गात मोडत जाणारी वाहने असल्यामुळे ट्रॅक्टर व ट्रेलर या दोहोंसाठी नॉन -ट्रान्सपोर्ट लायसन्स घेणे आवश्यक आहे.

आपण करमाफीबाबत विचारले आहे. त्याबद्दल आपल्याला असं सांगता येईल की, ज्या ट्रॅक्टर वाहनांचा वापर पेरणी, नांगरणी, मळणी, कोळपणी अशा शेतीच्या मशागतीच्या कामांसाठी करण्यात येतो, त्यांना शेतीचे ट्रॅक्टर संबोधले जाते. त्यांना करमाफी देण्यात येते.

परंतु शेतीशिवाय इतर कामांकरिता म्हणजे ऊस वाहतूक किंवा इतर शेतीमालाची वाहतूक, बांधकाम साहित्य इ. साठी ट्रॅक्टरचा वापर होत असेल तर मात्र ट्रॅक्टरला करमाफी देता येत नाही.


शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या ४५०० कि. ग्रॅ. वजनापर्यंतच्या ट्रेलर वाहनांना करमाफी देण्यात येते. इतर सर्व ट्रेलर वाहनांवर १-४-२००१ पासून कर आकारण्यात येतो. ट्रॅक्टर व ट्रेलर संदर्भात नियम आहेत व त्याचे पालन करणे गरजेचे आहे. त्यासंदर्भातले नियम पुढीलप्रमाणे आहेतः (१) ट्रेलर जोडून ट्रॅक्टर जेव्हा चालवला जाईल, तेव्हा ट्रॅक्टरचा वेग ताशी १० कि.मी. पेक्षा जास्त असणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. (२) ट्रॅक्टरने अनेक वेळा पाच-सहा ट्रेलरची वाहतूक होताना दिसते. नियमानुसार ट्रॅक्टरने तीनपेक्षा जास्त ट्रेलरची वाहतूक करायची नाही. (३) ट्रेलरची वाहतूक करताना ट्रेलरच्या पाठीमागे सावधान! ज्यादा लांबीचे वाहन हा फलक प्रदर्शित करायला हवा. (४) ट्रेलरच्या पाठीमागील बाजूस पांढऱ्या रंगावर लाल रंगाने 'TX' मोठ्या अक्षरात लिहायला हवे. (५) ट्रॅक्टरबरोबर ट्रेलरची वाहतूक करताना एक मदतनीस असावा व त्याचे वय वीस वर्षांपेक्षा कमी नसावे. (६) ट्रेलरच्या पाठीमागील बाजूला नियमानुसार परावर्तक लावायला हवेत. (७) ट्रेलरच्या पुढील बाजूस सुध्दा परावर्तक लावले पाहिजेत. ट्रॅक्टर ट्रेलरच्या पाठीमागील बाजूस एक लाल दिवा असला पाहिजे. या सर्व नियमांबरोबर ट्रॅक्टर व ट्रेलरला वाहतुकीचे नियम लागू पडतातच. रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनाचे नियम व शिस्त पाळणे अपघात टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. ट्रॅक्टर व ट्रेलर या नियमांपासून मुक्त नाहीत.

■ ■ ■



# कंडक्टरसाठी नियमावली...

**मला एस.टी. ने गावी जाताना, मुंबईत बसने प्रवास करताना ' कंडक्टर ` कडून अनेक वेळा त्रास होतो. आर.टी.ओ. चे नियम या कंडक्टरना लागू आहेत का? जर असलेतर माझा प्रश्न आहे की, मला, माझ्या कुटुंबा शेजारी व अनेक मित्रांना कंडक्टरचा वाईट अनुभव आलाय. त्यासाठीचे काही नियम असले तर सांगा. जेणेकरून आम्हांला ते कंडक्टरना दाखवता येईल व कॉलेजला जाताना आमचा प्रवास सुखकर करता येईल.**



कंडक्टरला बॅज मिळविण्यासाठी लायसन्स ॲथोरिटी म्हणजे आर. टी. ओ. कडे यावे लागते. हा बॅज देताना जी चाचणी घेतली जाते, त्या चाचणीत कंडक्टरला कर्तव्ये, कार्य व स्थानिक भाषेच्या ज्ञानाविषयी घेतलेल्या चाचणीत समाधानकारकरित्या उत्तीर्ण व्हावे लागते. कंडक्टरच्या चाचणीकरिता आवश्यक माहिती व बॅजचे नियम पुढे देत आहोत. हे नियम कंडक्टरला लागू आहेत. जर या नियमांचा भंग होत असेल तर 'डेपो मॅनेजरकडे` एक तक्रारीची प्रत व दुसरी प्रत संबधित आर.टी.ओ. कडे देऊ शकता. नियम खालीलप्रमाणे आहेत –

(१) कामावर असताना स्वच्छ गणवेश घालून छातीच्या डाव्या बाजूस बॅज लावणे आवश्यक आहे.

(२) कामावर असताना पान, तंबाखू याचे सेवन करता कामा नये.

(३) गाडीच्या आसन क्षमतेइतकेच प्रवासी घेणे.

(४) प्रत्येक प्रवाशास नियमानुसार तिकीट दिले पाहिजे.

(५) प्रवाशांबरोबरची वागणूक नम्रतेची असायला पाहिजे.

(६) गाडीमध्ये धूम्रपान करण्यास मनाई आहे, तरी एखादा प्रवासी धूम्रपान करत असेल तर नम्रतेने त्याला समजवावे व तो न ऐकल्यास गाडी जवळच्या पोलीस ठाण्यावर न्यावी.

(७) गाडीत स्फोटक द्रव्ये घेऊ नयेत.

(८) प्रवाशासोबत १५ किलोपेक्षा जास्त बोजा असेल तर त्याचे अंमलात असलेले भाडे घ्यावे.

(९) गाडी रस्त्यात बंद पडल्यास व लवकर दुरूस्त होण्याची शक्यता नसल्यास प्रवाशांना दुसऱ्या गाडीतून पाठवून देण्याची व्यवस्था करावी व तसे शक्य नसल्यास प्रवासाचे भाडे वजा करून बाकी रक्कम परत दयावी.

(१०) जेथे अधिकृत हमाल नसतील तेथे कंडक्टरने सामान उतरविण्यास मदत करावी.

(११) गाडीत कोणत्याही प्रकारचे प्राणी घेऊ नयेत.

(१२) गाडीची घंटा दोनदा वाजवून गाडी चालू करण्याचा व एक वेळा वाजवून गाडी थांबविण्याचा इशारा द्यावा.

(१३) प्रवासी गाडीत सामान विसरल्यास ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून तशी पावती घ्यावी.

(१४) प्रवाशास एका रुपयापेक्षा जास्त सुटे पैसे देण्याचे बंधन नाही. मात्र सुटे पैसे देण्याचा प्रश्न आल्यास सुटे पैसे नसल्यास जेवढे पैसे त्यास देणे असतील त्याची नोंद तिकिटावर करावी.

(१५) गाडीत कोणतेही वाद्य वाजविण्यास, गाणी गाऊन गोंगाट करण्यास मनाई करावी.

(१६) गाडीला अपघात झाल्यास जखमींना प्रथमोपचार करावे. गाडी चालू स्थितीत असेल तर जवळच्या दवाखान्यात जाऊन जवळच्या पोलीस स्टेशनला अपघाताची वर्दी देऊन डेपोस कळवावे.

प्रवाशांना कंडक्टरचे असलेले नियम माहीत व्हावेत, या अनुषंगाने वरील नियम दिले आहेत. आदर्श नागरिकासारखी वर्तणूक ठेवली असतानासुध्दा जर कंडक्टर नियमांचा भंग करत असेल तर अवश्य तक्रार करावी व तक्रारीसोबत आपण ज्या गाडीतून

प्रवास केला तो मार्ग, वेळ व तिकिटांची झेरॉक्स जोडावी, ज्यामुळे कारवाई लवकर करणे सोपे होईल.

*कार ड्रायव्हिंग लायसन्स मिळविण्यासाठी मोटार ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रवेश घ्यायलाच पाहिजे का ? त्याशिवाय काही अडचणी येतात का ? टुव्हिलर चालवायला शिकवण्याचे स्कूल आहे का ? असल्यास कृपया कळवावे.*

हा एक चुकीचा समज आहे की, मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये प्रवेश घेतल्यावरच लायसन्स मिळते. शिकाऊ लायसन्स घेतल्यानंतर आपण पक्के लायसन्स मिळवू शकता. आपली स्वतःची गाडी असेल तर आपण योग्य आणि चांगल्या प्रकारे गाडी चालविता येणाऱ्या व्यक्तीकडून गाडी शिवू शकता. आपल्याला गाडी शिकविणाऱ्या व्यक्तीकडे मात्र पक्क्या स्वरूपातले लायसन्स असायला हवे. गाडीच्या दर्शनी भागावर व मागच्या भागावर 'L' असे चिन्ह लावायला हवे, जेणेकरून रस्त्यावरील गाडी चालविणाऱ्या अन्य लोकांना आपण गाडी शिकत आहात याचा बोध होऊ शकेल. तुम्हाला गाडी योग्यप्रकारे चालवायला आली की, त्यानंतर मात्र आपण राहत असलेल्या परिवहन कार्यालयात जाऊन पक्क्या लायसन्ससाठी फॉर्म भरू शकता व त्यानंतर परिवहन अधिकारी आपली चाचणी घेतील व त्यात आपण उत्तीर्ण झालात तर आपल्याला पक्के लायसन्स मिळते. चाचणी देण्यासाठी जी गाडी आपण घेऊन जाल, त्या गाडीची सर्व कागदपत्रे आपल्यासोबत ठेवावीत.



मोटार ट्रेनिंग स्कूलमधून प्रशिक्षण घेण्याचा एक फायदा असू शकतो, तो म्हणजे गाडी शिकणाऱ्यांपैकी अनेकजण आपल्याभोवती असतात. आलटून-पालटून गाडी चालविण्याची संधी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला मिळत असल्यामुळे प्रत्येकाच्याचुका आपल्याला कळतात व त्या

चुका आपल्याला टाळता येतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोटार ट्रेनिंग स्कूलच्या ज्या गाड्या आहेत, त्या केवळ प्रशिक्षण देण्याच्या हेतूने बदल करून घेतलेल्या असतात. उदाहरण द्यायचे तर या गाड्यांना दोन क्लच, दोन ब्रेक्स असतात, ज्यामुळे एखादी चूक प्रशिक्षण घेणाऱ्याकडून झालीच तर प्रशिक्षक पटकन ब्रेक दाबून गाडी थांबवू शकेल व पुढील अनिष्ट प्रसंग टाळला जाऊ शकतो. या व्यतिरिक्त मात्र आपण आत्मविश्वासाने गाडी शिकलात तर मात्र मोटार ट्रेनिंग स्कूलची गरज आपल्याला भासणार नाही.

*दुचाकी चालविण्याची खरंच अशा प्रकारची स्कूल ठिकठिकाणी हवी, परंतु मोटार शिकविण्यासाठी जो प्रतिसाद मिळतो, तो प्रतिसाद दुचाकी चालविण्यासाठी मिळत नाही. कारण जो-तो आपल्या मित्र-मैत्रिणींकडून ते शिकतो.*

अशा प्रकारचे दुचाकी प्रशिक्षण काही ठिकाणी दिले जाते, परंतु त्याचे पत्ते या क्षणाला देता येणार नाहीत.

महिलांसाठीसुध्दा खास महिलांकडूनच दुचाकीचे प्रशिक्षण काही ठिकाणी दिले जाते. पण त्याचा पत्ता उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही, परंतु आपल्याला किंवा वाचकांपैकी कोणाला जर माहीत असेल तर आपण या कॉलममधून ते प्रसिध्द करू शकू. त्यामुळे इतर वाचकांना त्या माहितीचा उपयोग करता येईल.

दुचाकी चालवायला शिकतानाच आपण हेल्मेट वापरायची सवय लावलीत तर हेल्मेटची सवयसुध्दा होईल आणि दुखापतसुध्दा होणार नाही.

■ ■ ■

